

# सारथी

इ-कॉपी विशेषांक



दिवाळी २०१२






# Seattle Maharashtra Mandal Picnic

**SMM Members Speak…**

" SMM has been a blessing for us and our children" , " मंडळाने आम्हाला आमची मराठी अस्मिता दिली..." , " एक हक्काची जागा दिली ", " नवीन लोकांच्या ओळखी दिल्या " , "SMM ने आम्हाला कार्यक्षेत्र दिले " , " Hosting BMM was the greatest achievement of the mandal, I made many friends working together " , " गेल्या काही वर्षांमध्ये SMM ची वाढ फारच छान झाली' आहे "

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| मनोगत | *केतकी रानडे* | ६ |
| अजिंठा येथील लेणी, तेथील अनोखी प्रेमकहाणी ! | *भालचंद्र भोपटकर* | ९ |
| जगणं शिकवत येते | *कादंबिनी धारप* | ११ |
| उन्हाळी दुपार | *प्रमोद कारुळकर* | ११ |
| माझी माय | *अनु आमलेकर* | १३ |
| देवदर्शन | *प्रमोद कारुळकर* | १३ |
| शाळेतली आठवण | *अश्विनी देवधर* | १४ |
| तुझे हसणे | *प्रमोद कारुळकर* | १६ |
| दशकं आयुष्याची | *प्रसन्न जोशी* | १६ |
| अस्वस्थ संवाद | *ऋग्वेदिता पारख* | १८ |
| Test Taking | *राजस आगाशे* | १८ |
| प्राणी | *प्रसन्न जोशी* | १८ |
| अमेरिकेतला फेरफटका | *विभावरी गलांडे* | १९ |
| कालचक्र | *अनु आमलेकर* | २१ |
| ज्येष्ठ नागरिक : सुख दुःखे | *बिंदुमाधव जोशी* | २२ |
| चुटका | *महेश लोटलीकर* | २४ |
| निष्ठूर सुंदरी | *अभय बिंदुमाधव जोशी* | २५ |
| प्रेमाची भाषा | *अभिजीत जोशी* | २५ |
| म्हातारपण | *कादंबिनी धारप* | २६ |
| असे कसे असतात बाबा, हे कोण मला सांगणार? | *सुभग ओक* | २६ |
| आम्ही मायदेशी, मुलं परदेशी | *उषा थत्ते* | २७ |
| गणपती उस्तव - काल आणि आज | *मुग्धा गलांडे* | २९ |
| निवृत्तीच्या उंबरठयावर | *शीतल पटवर्धन-बापट* | ३१ |
| आला मास श्रावणाचा | *कादंबिनी धारप* | ३२ |
| गुरु आणि मित्र | *बाळ ठाणेदार* | ३६ |
| चारोळी | *अभिजीत जोशी* | ३७ |
| सुख | *प्रसन्न जोशी* | ३८ |
| राजीनामा | *विरेन पाटील* | ३८ |
| A Laugh For Posterity - | *सारंग जोशी* | ३९ |
| सियॅटलला हिमवर्षाव झाला | *अनु आमलेकर* | ४४ |
| आख्यायिका | *भालचंद्र भोपटकर* | ४५ |
| उपरतीचा क्षण | *अरुण निसरगंड* | ४७ |
| आमचे कलापूर्ण सियॅटल | *अनु आमलेकर* | ५२ |
| आजचा दिवस असा जाईल | *अरुण खेळकर* | ५७ |
| पुणे तिथे काय उणे! | *अभय बिंदुमाधव जोशी* | ६३ |
| सभासदांची नावे (२०१२) | | ७० |

सारथी २०१२



## २०१२ कार्यकारिणी समिती

जयंत भोपटकर, मोहित चिटणीस, सचिन कर्णिक, शीतल पटवर्धन-बापट, सुप्रिया पिंपरकर, केतकी रानडे, श्रद्धा देवधर-ओक, विद्या अंगोळकर, मनोज गडकरी, रितेश देसाई, सुबोध कीर्तने

सारथी २०१२

## सियॅटल् महाराष्ट्र मंडळ
## दिवाळी अंक २०१२

---

संपादक: संजय रानडे
सह-संपादिका: डॉ.सौ. मुग्धा गलांडे-जोशी
सह-संपादिका: डॉ.सौ. ऋग्वेदिता पारख
मुखपृष्ठ (छायाचित्र): डॉ.सौ. ऋग्वेदिता पारख
अंकरचना: प्रसन्न जोशी
आतील सजावट: डॉ.सौ. मुग्धा गलांडे-जोशी

---

## सियॅटल् महाराष्ट्र मंडळ
## कार्यकारिणी समिती २०१२

अध्यक्ष: केतकी रानडे
उपाध्यक्ष: श्रद्धा देवधर-ओक
चिटणीस: सुबोध कीर्तने
कोषाध्यक्ष: मोहित चिटणीस
सभासद व्यवस्था: विद्या अंगोळकर
खाद्यसेवा: सुप्रिया पिंपरकर
व्यवस्थापन: सचिन कर्णिक, मनोज गडकरी
सांस्कृतिक सल्लागार: जयंत भोपटकर
ध्वनी/प्रकाश योजना: शीतल पटवर्धन-बापट
इंटरनेट व्यवस्था: रितेश देसाई

---

या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र मंडळ, संपादक, किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कृपया परवानगी शिवाय या अंकातील साहित्य पुनःप्रकाशित करू नये ही विनंती.

---

*सर्व हक्क राखीव, सियॅटल् महाराष्ट्र मंडळ २०१२*

## संपादकीय

प्रिय वाचकहो,

सस्नेह नमस्कार आणि दिवाळीच्या शुभेच्छा !

'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' या समर्थांच्या उक्तीप्रमाणे, ग्रंथ प्रकाशनाविषयी काहीही माहिती किंवा अनुभव नसताना, मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी या 'सारथी' प्रकाशनाची धुरा हातात घेतली, आणि सांगायला आनंद वाटतो की केवळ ४ आठवडयांमध्ये यशस्वीपणे पारही पाडली.

ह्या वर्षीच्या मंडळाने खूप नव-नवीन गोष्टींची सुरुवात केली आहे, त्याला अनुसरून, अननुभवी मंडळीनी केवळ जबर इच्छेच्या जोरावर हे काम पत्करून सिद्धीस नेण्याची 'सारथी' च्या इतिहासातली ही पहिलीच वेळ असावी.

सियॅटल् मधील विविध साहित्यिकांचे लेख, कविता आणि इतर साहित्य आम्ही आपल्यापुढे सादर करत आहोत, ते आपल्याला आवडतील याची खात्री आहे. ह्या साहित्यिकांचे, आणि जाहिरातदारांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. अंकातील रंगीत छायाचित्रे सतीश पिंपरकर ह्यांनी टिपली आहेत. आणि मुख्य म्हणजे, माझे मदतनीस मुग्धा, ऋग्वेदिता आणि प्रसन्न ह्यांनी दिवस-रात्र मेहनत घेऊन, अंकाचे काम चोख केल्याबद्दल, त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

असावे. चूक भूल द्यावी घ्यावी.

आपला स्नेहांकित,
संजय रानडे

सारथी २०१२

## हितगुज, गप्पा-टप्पा, सुसंवाद.......

नमस्कार मंडळी,

सियॅटल् महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीतर्फे मी सर्व सभासदांना, हितचिंतकांना आणि आप्तेष्टांना दिपावली आणि नूतन वर्षानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा अर्पण करते.

सांगायला खूप अभिमान आणि आनंद वाटतो की आमच्या मंडळाने या वर्षी अनेक नव्या गोष्टींचा पायंडा पाडून एक नवा विक्रमच निर्माण केला आहे. दर महिन्याला एक दर्जेदार कार्यक्रम आयोजित केला; 'BMM' च्या एप्रिल वृत्तात, सियॅटल् वर पहिल्यांदाच लेख छापून आणला; नाटक–गायनाचा मिलाफ करणारा दोन दिवसांचा 'Mega Event' ही पहिलाच; प्रत्येक कार्यक्रमाला गरमागरम आणि स्वादिष्ट असा मोफत चहा सुरु केला; पिकनिकला काढलेला 'group photo' ही पहिलाच; 'senior' पाहुणे मंडळींसाठी पहिला-वहिला 'summer get-together' योजला; या मासिकातून साहित्यिकांचे फोटो छापण्याची कल्पनाही पहिलीच; 'सा रे ग म' स्पर्धेची सुरुवात ही केली; आणि सर्वात मुख्य म्हणजे नवीन सभासद भरती करून निर्माण केलेलं २५० जणांचे 'membership record', हे ही पहिलच बर का !

डिसेंबर २०११ मध्ये आमच्या समितीने मंडळाची सूत्रे हातात घेतली, आणि ताबडतोब १४ जानेवारी २०१२ ला संक्रातीच्या कार्यक्रमाने जोरदार सुरुवात झाली. नेमक्या याच दिवशी सियॅटल् च्या पहिल्या वहिल्या हिम वर्षावाचे आगमन झाले आणि जरा धास्ती वाटली की कार्यक्रमाला कमी प्रतिसाद मिळतोय की काय? पण म्हणताम्हणता २०० लोकांचे सभागृह हौशी जनसमुदायाने तुडुंब भरून गेले. खाद्यपदार्थांची लयलूट होती. Musical chair, नव्या कार्यकारिणीची ओळख, नवीन सभासदांशी परिचय, आणि विजेत्या vendors ना पारितोषिक वाटप अशा विविध गोष्टींनंतर, हा नव्या वर्षाचा शुभारंभ, प्रचंड उत्साहात, हसत-खेळत आणि दणक्यात साजरा झाला.

मराठी मंडळ म्हणजे 'नाटक' आलेच. फेब्रुवारीत सियॅटल् च्या हौशी कलाकारांनी 'आसू आणि हसू' नाटक सादर करून, रसिकांकडून दाद मिळवली. कार्यकारिणीने , भारतीय परंपरेला शोभेल अशी, स्वादिष्ट आणि गरमागरम 'मोफत चहा' ची व्यवस्था करून उपास्थितांची वाहवा घेतली. मार्च महिन्यात, 'Redmond Senior Center' मध्ये नाच, गाणी, आणि अभिनव 'stand up comedy' झाली, आणि त्याचबरोबरच Portland (OR) च्या 'नाट्यरंग' troupe ने पु. ल. देशपांड्यांचे 'सदु आणि दादु' हे नाटक सादर करून रसिकांकडून भरपूर हशा आणि टाळया मिळवल्या. त्यानंतर उपस्थितांनी गरमागरम पुरणपोळ्यावर, साजूक तूप घालून, भरपूर ताव मारला. एवढ्या खाण्या-पिण्यानंतर शरीराची जरा हालचाल व्हायलाच पाहिजे, त्यामुळे पुढचा कार्यक्रम ठरला, एप्रिल चा 'Sports Day' चा. Table tennis, carom, foosball, billiards, cards, basketball आणि chess अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घ्यायला सगळ्यांना भरपूर वाव मिळाला.

नंतरचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम झाला तो ५ आणि ६ जून चा Mega Event - 'जुगल मिलाफ'. श्रीधरजी फडकेंच अप्रतिम संगीत गायन आणि दिलीपजी प्रभावळकरांचे हृदयस्पर्शी नाटक 'वाह गुरु' या जुगलबंदीवर तमाम प्रेक्षकवर्ग बेफाम फिदा झाला होता. टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात कलाकारांना मानवंदना दिली गेली.

पुढचा आगळा-वेगळा प्रयोग होता तो जून मधला 'Zodiac - Journey with Pragati Despande'. ग्रहतारे, ज्योतिष-शास्त्र, पत्रिका, राशी, राशिभविष्य अशा आकर्षक विषयांवर त्यांनी अत्यंत सुलभतेने आणि मनोरंजकपूर्वक माहिती देवून प्रेक्षकांना तासभर खिळवून ठेवले.

जुलैची 'वार्षिक सहल' अत्यंत खेळीमेळीत साजरी झाली. सुरुवातीला आकाशात जरा मळभ आले होते पण सहलीची वेळ होईपर्यंत सूर्यदेवाने मुक्तहस्ते सूर्यकिरणांची देणगी उधळून लोकांच्या उत्साहाला उधाण आणले. जवळ जवळ १०० उपस्थितांनी भेळ, इडली, कलिंगड आणि पन्हे यांचा आस्वाद घेतला. युवा मंडळाने गुलाबजाम आणि आईस्क्रीमची सोय करून आणखी मजा आणली. क्रिकेट, फुटबॉल, ब्याडमिंटन अशा विविध खेळांमध्ये खेळाडूंनी भाग घेतला आणि नंतर गप्पागोष्टी आणि हास्य-विनोदाला अगदी ऊत आला होता. यावेळचे एक वैशिष्ट्य म्हणजे 'group photo'. भारतातून आलेली पाहुणे मंडळी तर या आदरातिथ्याने आणि लाघवेपणामुळे इतकी भारावून गेली होती की त्यातल्या एका व्यक्तीने मुद्दामहून एक छोटे भाषण देवून सियॅटल् महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीचे आवर्जून कौतुक केले.

या वर्षीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, senior citizens साठी आयोजित केलेले 'summer get-together'. अप्रतिम काव्यवाचन, मनोरंजक मुलाखत, आणि फडके गुरूजींनी खेळकर शब्दात सांगितलेले संस्कार आणि सणांचे महत्व हे सर्व ऐकून मानाने आणि वयाने थोर अशी वृद्धमंडळी अगदी भारावून गेली. त्यांच्याकडून कौतुकाचे चार शब्द ऐकले आणि पुढचे काम करायला आणखी हुरूप आणि उत्साह आला.

दर वर्षीप्रमाणे श्री गणरायांचे आगमन २२ सप्टेंबरला धूम-धडाक्यात झाले. 'संजय रानडे' गुरुजींनी श्री गणेशाची मनोभावे आणि पारंपारिक पूजा करून भाविक मंडळींकडून दाद मिळवली. ४०० जणांचे सभागृह तुडूंब भरले होते . बाल कलाकारांनी आणि युवा कलाकारांनी नाटक, गाणी, नाच असे भरगच्च प्रयोग अप्रतिमपणे पेश करून उपस्थितांची भरपूर करमणूक केली. सर्वात शेवटी 'सुपरमॅन' नाट्याने आणि आम्रखंडाच्या रुचकर जेवणाने कार्यक्रमाची सांगता झाली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लौकर या' च्या घोषात श्री गजाननाला निरोप दिला गेला.

'बृ.म.म.' तर्फे आयोजिलेल्या 'सा रे ग म' स्पर्धेचा शुभारंभ १३ ऑक्टोबरला इतका अप्रतिम झाला की २५० जणांचे सभागृह, सियॅटल् , पोर्टलंड आणि व्यानकुवर मधल्या सर्वश्रेष्ठ गायकांच्या स्वर्गीय स्वरांनी बेफाट धुंद झाले, मंत्रमुग्ध झाले. बऱ्याच जणांनी हा कार्यक्रम 'सर्वोत्कृष्ट' झाला अशी ग्वाही दिली आणि दर वर्षी असाच चालू राहावा अशी आशा व्यक्त केली. त्यानंतरचा 'कोजागिरी'चा उत्सव, गरम मसाला दुध, रंगी-बेरंगी पोशाख, आणि 'दांडिया' च्या मधुर नादांमध्ये जल्लोषात साजरा झाला.

मंडळी, आता येत्या दिवाळीचा उत्सव, 'ती फुलराणी' या नाटकाने संपवला की आम्ही आपला निरोप घेऊ. वर्षभर आम्हाला सक्रीय पाठींबा दिल्याबद्दल प्रत्येक सभासदाचे, हितचिंतकाचे आणि युवा मंडळाचे मी मनापासून आभार मानते. एक गोष्ट नमूद करावीशी वाटते कि माझ्या सहकाऱ्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आधारावारच हे वर्ष यशस्वी झाल. प्रत्येक committee member ने अत्यंत तळमळीने आणि निस्वार्थपणे वर्षभर मनापासून काम केल आणि त्याचबरोबर प्रत्येक कार्यक्रम enjoy ही केला. 'झाले बहु, होतील बहु, परंतु या सम हीच' अशी ही आमच्या मंडळाची कमालीची यशस्वी कारकीर्द संपवून ही सूत्रे नव्या मंडळाच्या स्वाधीन करण्यात मला खूपच समाधान वाटत आहे.

धन्यवाद,
सौ. केतकी रानडे
(अध्यक्ष, सियॅटल् महाराष्ट्र मंडळ, इसवी सन २०१२, शालिवाहन शके १९३४)



सारथी २०१२


























**अजिंठा येथील लेणी, तेथील अनोखी प्रेमकहाणी !**


***श्री. भालचंद्र भोपटकर***

भारतामध्ये, औरंगाबाद शहराच्या जवळ सुमारे १०० किलोमीटर अंतरावर जगप्रसिद्ध अजिंठा लेणी आहेत. जगाच्या इतिहासाचा महत्वाचा ऐतिहासिक वारसा असलेली ही लेणी, ख्रिस्तपूर्व ३०० वर्षे आणि ख्रिस्ताब्दीनंतर ३०० वर्षे, अशी एकूण ६०० वर्षे ह्या कालावधीमध्ये (म्हणजेच 300 years before Jesus Christ was born and 300 years after the Christian Era) कलावंतांनी अतिशय कोरीव काम करून निर्माण केलेली आहेत.

भगवान गौतमबुद्धांचा जन्म ख्रिस्तपूर्व ५०० वर्षे होता. बुद्धशिष्य आणि अनुयायी कलावंतांनी ही लेणी दगडांमध्ये गौतमबुद्धांच्या स्मरणार्थ कोरलेली आहेत. ह्या लेण्यांमध्ये त्या काळच्या कलावंतांची सौंदर्यदृष्टी, चित्रांतील रंगकाम, त्याकाळचे अलंकार, वस्त्रे, वगैरे असे अनेक बारकावे कोरलेले पाहायला मिळतात. तसेच येथील लेण्यांमध्ये भगवान गौतमबुद्धाच्या आयुष्यातील अनेक प्रसंग चितारण्यात आले आहेत. जेव्हा बुद्धधर्म भारतातून हद्दपार होऊन चीन, जपान, इत्यादी देशांमध्ये गेला, त्यावेळी ह्या अभूतपूर्व लेण्यांकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले. त्या लेण्यांमध्ये पावसापाण्यामुळे लहान दगड, माती, विटा, उंदीर, सर्प, ह्यांनी प्रवेश केला आणि गुंफातील जागा भरून गेल्या. हा परिसर निर्मनुष्य झाला आणि काळाच्या ओघात ही लेणी अज्ञात राहिली.

परंतु, १८१९ मध्ये कप्तान जॉन स्मिथ नावाचा (Captain John Smith ), इस्ट इंडिया कंपनीचा ब्रिटीश अधिकारी वाघाच्या शिकारीच्या निमित्ताने येथे आला आणि सर्वात मोठी आणि मध्यावर असलेली (सध्याची लेणी क्रमांक दहा) बाहेरील छतावरील भव्यदिव्य उंच कमान त्याला दिसली आणि त्याचे चित्त हरपले.

त्याने ह्या लेण्यासंबंधी इस्ट इंडिया



कंपनीच्या अधिका-यांना इंग्लंडमध्ये कळवले. त्या काळी हा परिसर निजाम संस्थानाच्या हद्दीत येत होता. त्यानंतर त्यांनी (British officers of East India सीओ.) निजामाला विनंती करून तेथील दगड, माती, विटा, सर्व दूर करण्यासाठी पुढे १६ वर्षे लागली आणि सुमारे १८४१ ह्यावर्षी हा परिसर आणि ही लेणी जनसामान्यांना पाहण्यासाठी मुक्त झाली.

ब्रिटीशांनी हा भारतीय कलेचा अमूल्य ठेवा इंग्लंडमध्ये नेण्याची योजना आखली आणि त्यानुसार १८४४ ह्या वर्षी, मूळचा चित्रकार असलेला आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या मिलीटरीमध्ये मेजर असलेला “रॉबर्ट गिल” ( Major Robert Gill - Age 24 years ) ह्याची, त्या लेण्यातील चित्रे काढण्यासाठी नेमणूक केली. “रॉबर्ट गिल” हा लंडन येथील रॉयल एशियाटिक सोसायटीचा “क्वालिफाईड आर्टिस्ट” होता, आणि योजनेनुसार रॉबर्ट हा घोड्यावरून सैन्यातील बंदूकीसह (with Gun ) अजिंठा इथे पोहोचला.

अजिंठा गावापासून १२ मैलांवर असलेल्या "समर पॅलेस" ह्या हॉटेलमध्ये तो बराच काळ राहिला, आणि तेथून दररोज चित्रे काढण्याकरता तो घोड्यावरून अथवा बैलगाडीतून अजिंठा येथे जात असे.

तेथे "पारू"नावाची (वय वर्षे १४) ही बंजारा समाजातील आदिवासी तरुणी त्याला भेटली. तिचे दैवत "गौतमबुद्ध" असल्यामुळे रॉबर्ट



गिल हा चित्रे काढीत असताना, त्याला ती मदतनीस म्हणून राहिली. अजिंठ्यामधील चित्रे कॅनवासवर आखण्यासाठी आलेल्या रॉबर्ट गिलला पारुने सर्वतोपरी मदत केली. ह्या चित्रांसाठी रंग आणि कॅनवास लंडनवरून येणार असतात, परंतु ते सामान वेळेवर येत नाही. तेव्हा गिलमधली चित्रकाराची होणारी घालमेल पाहून "पारू" त्याला नैसर्गिक रंग बनवून देत असे. त्याला कॅनवास ही बनवून देई. पारूला वाटत असे की हा चित्रकार इतक्या दूरच्या देशातून आपल्या देशात (भारतात) आला आहे. भगवान बुद्धाचा संदेश जगभर पोहोचविण्यासाठी रॉबर्ट येथे आला आहे. बुद्धदेवांचा संदेश जगभर पोहोचावा हीच पारूची तळमळ होती. पारुच्या ह्या प्रेरणेमधून अजिंठा येथील चित्रे निर्माण झाली.

भाषा, प्रांत, संस्कृती, धर्म, देश ह्यांची बंधने ओलांडून त्या दोघांच्या प्रेमकहाणीला सुरुवात झाली. समाजाचा आणि गावक-यांचा खूप विरोध झाला. परंतु रॉबर्ट गिलच्या बंदूकीच्या धाकामुळे विरोध विरून गेला, आणि १८५० मध्ये दोघांचा विवाह झाला. विवाहबंधनात पडलेल्या पारूला रॉबर्ट गिलपासून १८५२ ह्यावर्षी एक मुलगा झाला, परंतु दुर्दैवाने एक वर्षाच्या आत साथीच्या रोगाने त्या लहान मुलाचा अंत झाला.

रॉबर्ट गिल ह्या चित्रकाराने अजिंठा लेण्यामधील एकूण ३० चित्रांच्या प्रतिकृती आपल्या कॅनवासवर चित्रित केल्या, आणि त्या प्रतिकृती इंग्लंडमध्ये प्रदर्शनासाठी नेल्या. त्यावेळी त्याची पत्नी पारू अजिंठा इथे एकटीच होती. परंतु त्या दरम्यान तिचा साथीच्या रोगाने २३ मे १८५६ रोजी अंत झाला. इंग्लंडहून परत आल्यावर दु:खी झालेल्या रॉबर्टने आपल्या पत्नीची - मृत पारूची - समाधी अजिंठ्याच्या गावसीमेवर बांधली. मृत पारूच्या समाधीवर पुढील शब्द कोरलेले आढळतील.

To the memory of - My Beloved - 'Paroo', who died on 23rd May 1856. - Robert Gill.

नंतर रॉबर्ट गिलने भारतातच भुसावळ येथे वास्तव्य केले आणि तेथेच त्याचाही अल्पकाळातच १८६४ ह्यावर्षी अंत झाला. ही



अनोखी प्रेमकहाणी - ब्रिटीश ऑफिसर रॉबर्ट गिल आणि आदिवासी तरुणी "पारू" यांची, ज्या प्रेमाला भाषा, काळा/गोरा रंग, धर्म, संस्कृती, आणि देश ही सारी बंधने अडवू शकली नाहीत.



## जगणं शिकवत येते
*कादंबिनी धारप*


श्वासांना जाळत येते
काळजाला फाडत येते
झाशीच्या राणीसारखी
तलवार परजत येते

निशेला उसवत येते
निद्रेला जागवत येते
उधाणल्या स्वप्नातून
भरारी मारत येते

शब्दांना ओवत येते
अर्थाला गोवत येते
लसलसणाऱ्या कोंबासारखी
अस्तित्वातून तरारून येते

निरंतर योग्यासारखी येते
स्वच्छंदी भोग्यासारखी येते
निधड्या दानवीरासारखी
त्याग लेऊन येते

रंगणाऱ्या कथेतून येते
जाळणाऱ्या व्यथेतून येते
अनपेक्षित अनुभवांसारखी
कविता जगणं शिकवत येते



**मिहीर बडवे**
*BMM, मराठी शाळा*



## उन्हाळी दुपार
*प्रमोद कारुळकर*

वेडी वाकडी दुपार होती
मध्यान्हीची उन्हे तळपती
वाटा पायाखाली जळती
धरतीची नस रगे करपती

पोरे अति घामाने भिजती
ऐसपैसचा डाव खेळती
माठा भवती मस्ती करती
सगळ्यांना ओलेते करिती

वडिलधारे जरी ओरडती
माजघरी अंधारी परतती
पायचेपिला सर्व लागती
पै पावल्या हाती खेळती

पुन्हा पुन्हा कानोसा घेती
बर्फाच्या गाडीस तिष्ठति
घंटा ऐकून जिभा लोंबती
सप्तरंगी बाटल्या खुणवती

गोळ्यावरती डोळे खिळती
किसता जरी घामाला टिपती
थंड स्वर्ग क्षणभरी अनुभवती
रोगराईची भीती न धरती

नव्या युगाची झाली घाई
वाडा गेला लपणे नाही
अंगण गेले खेळ ही नाही
माजघर गेले आजी नाही

आजी कधी ओरडली नव्हती
वाटी पन्ह्याची संपत नव्हती
दिवस उन्हाळी असेच जाती
टुकळा मजला अजुनी लावती

खेळ मनाचे सर्व लपवति
मात्र उभा मी सदा युगांती
ए सी मधले दिस कलाबुती
परत कधी का कुणी ना घेती

सारथी २०१२
























**माझी माय**

***अनु आमलेकर***

उन्हातान्ही होरपळली, पावसाने झोडपली
थंडीवारे काकडली, तरी चालत राहिली
माझी माय

घातली मायेची पाखर, केली सेवा अपरंपार
कधी नाही केली कसर, प्रेमामध्ये तसूभर
माझी माय

नव्हती सखी शेजारीण, सदा सासूरवाशीण
नव्हती जवळ मायबहीण, नशिबी सदा एकटेपण
माझी माय

नाही चिडली तापली, नाही रडली भेकली,
नाही कण्हली कुंथली, नाही कधी घाबरली
माझी माय

ठिगळे लावले नेसुला, कोंडा मिळाला भुकेला
पोते होते निजायला, तरी पाहुणचार केला
माझी माय

घास ओठीचा दिला काढून, नाही कधी म्हटले नाय
झोपे उपाशी तशीच, पोटी घेउनिया पाय
माझी माय

हसू ओठी येत नाय, आसवं घरंगळून जाय
तिचं खरबरीत हात, मऊ दुधाची साय
माझी माय

दिस मास तप सरलं, गेली सोडून कपिला गाय
कुठं शोधू करू काय? जात नाही तिची सय
माझी माय माझी माय





**देवदर्शन**

***प्रमोद कारुळकर***

एक सुंदरी, उभी मंदिरी,
घेउनी तबका मध्ये मंजिरी
वळती नजरा सर्व बाजुनी,
जशी अप्सरा आली भूवरी

कांती गोजिरी, तनु लाजरी,
साडी गर्द अंजिरी (गर्दजरी)
काठ भरजरी, सोन्याच्या सरी,
कमरबंद रुपेरी
नमस्कार तिजला नर करती,
विभ्रम होवून क्षणभरी

ब्रम्हानंदी टाळी लागे,
घंटा नादे दचकती हरी हरी
विश्वामित्र रुपावरी घसरे,
स्वर्गातून आल्यावर नारी

नरकवासी भस्मासुर झाला,
विष्णू मूर्ती अति गोजिरी
सगळे पामर मांस मातीचे,
नसती कधी कधी शुद्धीवरी

तूच घडविले देवा यांना,
माफ करी रे कसे तरी
सदा विसरतील तुजला देवा,
उभी जोवरी पुढे सुंदरी
सुहास्य वदना किती धाडशील,
आता परीक्षा पुरे करी



**शाळेतली आठवण**
***अश्विनी देवधर***

परवा कशावरून तरी एकदम आमच्या शाळेची आठवण झाली. आठवणींची पण कशी गम्मत असते पहा....त्या हळूच पाय न वाजवता येतात...आणि एकदा यायला लागल्या की पाणलोटासारख्या येतात. एकातून दुसरी अशी माळ लागल्यासारख्या. त्याला काही फार मोठं निमित्त लागतं असं नव्हे. लहानपणापासून अनुभवलेले रंग, गंध, स्पर्श, नाद, इतके आपल्याच नकळत आपला एक हिस्सा झालेले असतात.

मला कधी कधी चालताना एकदम बकुळीच्या फुलांचाच वास येतो. आता इथे कुठे आली आहेत बकुळीची फुलं? भारतात तरी आता मिळतात की नाही कुणास ठाउक? बकुळीला त्यातला त्यात जवळचा असा व्हाईट जिंजर असा एक सुगंध आहे खरा पण त्याचं फूल काही मी अजून बघितलं नाही. मिळेल कधीतरी. मागे दिल्लीला गेलो असताना आमच्या ट्रीप मध्येच ओळख झालेल्या एका बाईनी अचानक ओंजळभर फुलं हातात ठेवली. बकुळीचं तिथलं झाड पाहून मी हरखून गेले होते खरी. पण तिथे सांडलेली फुलं गोळा करून मला द्यावी असं कसं वाटलं त्यांना? कोणाला कुठली गोष्ट मनापासून आवडेल हे कळायला तसं अवघडच.

तर परवा अशीच शाळेची आठवण झाली. भारतात जाते तेव्हा एकदा तरी शाळेच्या परिसरात चक्कर होतेच. परत एकदा बालपणीचे पंख लाभले असं वाटतं. शाळेचं मैदान, इमारत बघून खरंच बरं वाटतं. मुलांना पण दाखवून आणते शाळा. शाळेच्या आत कधी जायला मिळालं तर तोच तो चिरपरिचित वास येतो. आठवणींच्या पाय-या चढत असतानाच एकदम भान आलं की भरकन वास्तवाच्या घसरगुंडी वरून जमिनीवर.

आपल्याच लक्षात आलेलं नसतं की आपण जिथे जिथे वावरलेले असतो तिथल्या किती खुणा आपल्या आत उमटलेल्या असतात. कुठे कुठे काय काय झालं, केलं, हसलो, खेळलो, धडपडलो, भांडलो, रडलो, आनंदलो, गहिवरलो सगळं सगळं आपल्या लक्षात असतं. अगदी काल घडल्यासारखं. आत्ता मला आठवली ती शाळेतली एक जादू भरी खोली ..जी आता पर्यंत विस्मरणात गेल्यासारखी झाली होती. त्या खोलीत आमच्या शाळेच्या नाटकांना लागणारा कपडेपट होता!!

आमच्या शाळेला मोठ्ठा hall होता. ज्याचा मला फार अभिमान आहे. इतका मोठा शाळेचा hall मी तरी पूर्वी बघितला नव्हता. अगदी शिशुवर्गात असल्यापासून काही ना काही कार्यक्रमाच्या निमित्ताने त्या hall शी जवळीक निर्माण झाली होती. आमच्या तालमी सुद्धा त्या स्टेजवरच होत असत. इतक्या मोठ्या सभागृहात समोर शेकडो खुर्च्या असताना, मग तेव्हा त्या रिकाम्या का असेनात, तालीम करायची सवय शाळेतच लागली होती.

कधी कधी स्टेज च्या लाकडी फळयामध्ये चकचक सांडलेली असे. ती बोटावर गोळा करायला सुद्धा मज्जा यायची. स्टेज च्या मागच्या बाजूला मोठ्या ग्रीन रूम्स होत्या आणि त्यांच्या मधून मागे उतरायला एक जिना. तिथून शाळेच्या मजल्यावरच प्रवेश. त्या जिन्याच्या उजव्या बाजूला ही खोली होती.

कपडेपट !! अर्थात तेव्हा त्याला काय म्हणतात ते माहीत नव्हतं. त्याची व्यवस्था बघणारे एक शिंदे म्हणून होते. दिसायला एकदम कडक. पण नेहमी हसतमुख. चापून चोपून बसवलेले केस. शिडशिडीत अंगकाठी. बारीक मिश्या. कायम पांढरे सफेद कपडे अंगावर. आणि खिशाला पेन अडकवलेले.

आमचं नाटक करायचं ठरलं की त्या खोलीत जायला मिळणार ह्याचाच केवढातरी आनंद व्हायचा. मग आम्ही सगळी नाटकातली "पात्र" तिथे जाणार. मग शिंदे आम्हाला त्या खोलीच कुलूप उघडून देणार आणि मग आमचा परीराज्यात...जादूनगरीत प्रवेश होणार.....

आत गेलं रे गेलं की कपड्यांचा ठेवणीतला मिश्र वास नाकात शिरायचा. ती खोली म्हणजे आमच्या साठी अलिबाबाची गुहाच होती. आधी नुसते पेटीतले कपडे काढून त्यावर हात फिरवायलाच कित्तीतरी बरं वाटायचं. आमच्या भोवती रंगांचा, स्पर्शाचा एक खजिनाच उघडलेला असायचा. प्रत्येक कापडाचा स्पर्शही वेगळा. सॅटीन, मखमल, जोर्जेट, सगळे प्रकार.

वेगवेगळ्या रंगांचे, ऐतिहासिक, पौराणिक नाटकांना, नृत्यांना लागणारे विविध कपडे. सॅटीन चे पितांबर, अंगरखे, झोलणे, कुर्ते, सलवारी, घागरे, परकर पोलके....

गर्द हिरवे, लाल, मोरपंखी, गुलाबी, केशरी, पिवळे, पांढरे म्हणाल तो रंग हजर. त्याला जरीचे काठ, चुण्या. मग मखमालीचे जरीची लेस लावलेले लाल, निळे, हिरवे, केशरी कंबरपट्टे, बाजूबंद, मनगटबंद....सोनेरी पुठ्याचे, खडे लावलेले मुकूट, मोजड्या, रंगीबेरंगी झगमगत्या खड्यांच्या, मोत्यांच्या माळा, कानातली कुंडले, ख-या वाटणाऱ्या खोट्या तलवारी, त्यांची म्याने... ओढण्या तर किती परींच्या... इंद्रधनुषी रंगांच्या, सुळसुळीत, झिरझिरीत, रेशमासारख्या...जरीचे काठ असलेल्या, खडीचे बुंदे पेरलेल्या, कधी कधी टोचणा-या सुद्धा. त्या ओढण्या केवळ ओढण्या म्हणून न वापरता त्यांचा उपयोग कमरेला शेला म्हणून, उपरणे म्हणून, ढाल बांधायला म्हणून कसाही होत असे.

ढगांच्या कापसात विमान जसं लपेटून जातं ना...तसेच आम्ही ह्या सगळ्या पसा-यात हरवलेले.....ह्या सगळ्या ढिगातून हे घे, ते घे, हे पांघर, ते ओढ असं करत करत खुसू खुसू हसत, स्वत:ला आरशात पाहत, आपल्याला साधारण बसणारे पोशाख शोधायचे. नाहीतर बाईच भराभरा काढून द्यायच्या. अर्थात ते आपल्याला आवडलेलेच मिळतील ह्याची खात्री नसली तरी ते घ्यावे लागायचेच. पण ती क्षणभराचीच नापसंती. कारण त्याच्या आधीचा सगळा आनंद मनात शिगोशिग भरलेला असायचा ना!

मग पुन्हा ते पोशाख घालून बघेपर्यंत आम्ही केव्हाच जे काय असू ते ते झालेले असायचो. म्हणजे...राजपुत्र, राणी, राजा, देव, परी....काहीही. नाटक सुरु होण्याच्या आधीच आम्ही त्यात पार बुडलेले. संवाद, पाठांतर..त्याची काळजी अर्थातच बाईंना. त्या खोलीत एकदा शिरलं की बाहेरचं जग बाहेर. गणिताच्या सरांचा दुष्टपणा, खेळताना खरचटलेले, पुस्तक हरवलेले, असे कठोर जगाचे दुखरे भान विसरायला झालेले असायचे. आमच्या भोवती हेच विश्व. जादूचं. काही केल्या त्या खोलीतून बाहेर पडू नये असंच वाटत राहायचं. डोळे घट्ट मिटून एकदम अदृश्यच व्हाव असं वाटायचं. पण अर्थातच काम झालं की आमची तिथून हकालपट्टी. पाय निघता निघत नसे.

कारण एकदा सगळ्या गोष्टी ठरवून झाल्या की मग ते कपडे एकदम रंगीत तालमीच्याच दिवशी घालायला मिळणार. त्यामुळे आम्ही अगदी जड मनाने तिथून निघत असू. एखाद्या सुंदर स्वप्नातून जाग आल्यासारखे. पण तेव्हा त्या क्षणांचा तो निरागस आनंद..तो कधीच विसरला जाणार नाही हे नक्की !!

असेच तर साठत असतात ना आठवणींचे आनंदक्षण?



## तुझे हसणे
*प्रमोद कारुळकर*

सौंदर्याचे रहस्य तुझिया दडले आहे स्मितहास्यी
प्रफुल्लतेने दुनिया भरते दिसता खळी गालावरची

क्षणभर हसण्याने तुझिया लागण होते आनंदाची
आणि विरून जाती सगळी दुर्धर जाळी ताणाची

दुख्खे सगळी पळुनी जाती मंद्स्मिता असता साथी
आणि हसण्या माहित नाही वाट कधी आजाराची

तू हसल्यावर सावरतो मी असेल गेला कितीही तोल
यौवन फिरूनि रसरसते वरी ओढ वाढते जगण्याची

मुस्कानीने होते नांदी आशावादी नव्या युगाची
गर्द ढगांना छेदुन जाते एक शलाका आशेची

अखंडसुंदरी हो तू राणी जतन करी स्मित हास्याला
आणि अनायास इथे रुजू दे बीजे नंदनवनाची






## दशकं आयुष्याची
*प्रसन्न जोशी*

वय वर्ष दहा
तिच्याकडे फक्त पहा
वय वर्ष वीस
तिच्या विना जीव कासावीस
वय वर्ष तीस
घेतला तिचा रोज किस
वय वर्ष चाळीस
दिलं तिला माझं काळीज
वय वर्ष पन्नास
तिच्यामुळे जीवनात राहिला उल्हास
वय वर्ष साठ
खरंच पक्की होती लग्नाची गाठ
वय वर्ष सत्तर
सापडले सगळ्या प्रश्नांचे उत्तर
वय वर्ष ऐंशी
तरी आम्ही हौशी
वय वर्ष नव्वद
तरीही घेतो तिला कुशीत अलगद
वय वर्ष शंभर
आता मेलो तरी बेहत्तर



*आधुनिक म्हण: **ही वाट** दूर जाते पण वाटचाल जवळ नेते*

सारथी २०१२


























## अस्वस्थ संवाद

*ऋग्वेदिता पारख*

शब्शब्दांची पकड की पकडून ठेवलेले शब्द ?
आदिम कालापासूनची भाषा की भाषेचा
आदिमपणा ?
पहिला शब्द की शब्दाची व्याख्या?
भावनेचा हुंकार की अस्वस्थ व्याकूळ संवाद ?
संवादाचा अर्थ की अर्थपूर्ण संवाद ?
वादाचे प्रयोजन की प्रयोजनान्ति वाद ?
विषयाला धरून चर्चा की चर्चेचा विषय ?
दोन बिंदुंमधून केवळ एकच रेषा काढता येते ;
पण ती रेषा अनेक बिंदुंना सामावून घेते.
पण त्या अनंत अवकाशाचे काय ?
जो साऱ्याच बिंदुंना सांभाळून घेतो.
मग कोणतीही चर्चा दिशाहीन कशी म्हणता येईल;
ती स्वैर असेल पण
स्वैर ही देखील अस्तित्वाची स्वतंत्र दिशाच नाही
का?



अमेय साठे,
BMM, मराठी शाळा



## Test Taking

***Rajas Agashe***

The teacher delivers out the long tests,
To confident students who did prepare.
The students set their pencils to contest,
While the teacher is lounging in his chair.

Time ticks and only a few minutes left.
Pencils quickly scribble and accomplish.
Eyes scan the paper for mistakes with deft.
An excellent score is what students wish.

The tests are back and tension fills the air.
Smiles droop to frowns and A's snake into B's.
Even when the topics were learned with
care,
Silly mistakes take the grade undersea
Since students fall short with dedication, tests
are not the best evaluation



## प्राणी

*प्रसन्न जोशी*

कोकिळा घेते छान तान
कर्कोच्याची बारीक मान
हत्तीचे सुपासारखे कान
जिराफाची उंच मान
डुकराची फारच घाण
माकडाचे हरपले भान
गेंड्याची शेपटी फारच लहान
उंटाला लागतच नाही तहान
सिंहाची असते भारीच शान
आमची गाय सगळ्यात महान

*आधुनिक म्हण: Starbucks मध्ये शिरला बोका त्याला पाहिजे white chocolate (mocha) मोका*



**अमेरिकेतला फेरफटका**
***विभावरी गलांडे***

जून २०११ साली लेकीला भेट देण्यासाठी अमेरिकेत पहिल्यांदा संध्याकाळी सात वाजता पाय ठेवला. मात्र jet-lag मुळे आणि वातावरणात उजेड असल्यामुळे मला सकाळचे ७ वाजले आहे असेच वाटत होते. Jet-lag हा शब्द अनेकदा कानावर पडला होता. पण त्याचा खरा अर्थ कळण्यासाठी पुढचे १० दिवस जावे लागले. अमेरिकेच्या भव्य तेजाच्या व संपन्नतेच्या खाणाखुणा रस्त्यावर घरी पोहोचेपर्यंत नजरेत येत होत्या. विकसित पाश्चात्य राष्ट्र - त्यातील " नंबर एक "चे राष्ट्र म्हणजेच अमेरिका व विकासाच्या वाटेवर असलेला भारत (इंडिया) देश यातील फरक ,मला अगदी दुसऱ्या दिवसापासून clearly दिसत होता.

आमच्या घराशेजारी एक Shelter-Home होते. तिथे बेकार (बेरोजगार) लोकांना अन्न-धान्य, फळे ,भाजी ,इ. आवश्यक गोष्टी मिळत असत. सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत तो उपक्रम चालत असे. लाभार्थी कोण तर चांगले सूट- बूट घातलेले ,गोरेपान मजबूत शरीरयष्टी असलेले लोक! मला आपल्या भारतातले बेकार असलेले - काळेकुळे ,कमरेला फडके गुंडाळलेले, लाचार, थकले-भागलेले असे माझे देश बांधव आठवत असत.

अमेरिकेतील रुंद ,खाचखळगे नसलेले, दुहेरी, तिहेरी जोडरस्ते, फ्लाय-ओव्हर, रस्त्यावर ठिकठिकाणी असलेले direction बोर्ड्स व त्यावरून एकदाही हॉर्न न वाजवता अत्यंत शिस्तबद्ध अशा आपापल्या लेन्स मधून धावणाऱ्या आलिशान गाड्या ,पार्किंग साठी असलेली खास जागा व शिस्तीत होणारे पार्किंग ,ठिकठिकाणी उभे असलेले कर्तव्यतत्पर पोलीस पाहून सार्वजनिक शिस्तीचे महत्व समजले.

१५-२० वर्षापासून आपल्या भारतातही खुली अर्थव्यवस्था झाल्यापासून अनेक पाश्चात्य बनावटीच्या आलिशान गाड्या रस्त्यावरून धावू लागल्या. परंतु त्यासाठी रुंद खाचखळगे नसलेले महामार्ग हवेत. त्याचप्रमाणे वाहतुकींच्या नियमांची योग्य अंमलबजावणी होणे किती गरजेचे आहे. ह्याचे आकलन भारतीयांना कधी होणार?

Seattle मध्ये माझा मुक्काम जून ते नोव्हेंबर असा होता. ऑगस्ट आणि सप्टेंबर मध्ये रात्री ८-९ वाजेपर्यंत रेंगाळणारा उजेड हवाहवासा वाटत असे. पण ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात मात्र सकाळचे ७-८ वाजले तरी सूर्याचा पत्ता नसल्यामुळे बोचरी थंडी आणि भुरभुरता पाऊस ,यामुळे वातावरणात साचलेला कुंदपणा अनुभवून ,भारतातील स्वच्छ सूर्यप्रकाश, निरभ्र, मोकळी हवा ,व पक्ष्याची किलबिल घेऊन येणारी प्रसन्न हसरी सुप्रभात आठवत असे.

तरीही Seattle मधल्या sculpture पार्कव र संध्याकाळी आम्ही फिरायला जात असू. तेव्हा महाकाय स्वच्छ सुंदर अशा pacific महासागराचा विशाल किनारा ,त्यावर झुलणारी महाकाय जहाजे ,आकाशामध्ये क्षणार्धात दिसेनाशी होणारी विमाने ,आगगाडी येण्याची सूचना देणारा घंटानाद ,मला मंदीरात होण्याऱ्या संध्याकाळच्या आरतीची आठवण करून देत असे. बग्गीतून फेरफटका मारणारे कुटुंबवत्सल अमेरिकन्स, सायकलीवरून क्षणार्धात दिसेनासे होणारे तरुण व स्केटिंग करणारी मुले पाहून ती संध्याकाळ मन प्रसन्न करीत असे हे मात्र नक्की.




Sports Day
















GAMESROOM

सारथी २०१२



**कालचक्र**

*अनु आमलेकर*

पहाटेच्या धुक्यात आळसावलेलं आकाश
तडफडून पळत सुटतं, सूर्यकिरणांच्या प्रहाराने धुके
झुगारत
सूर्य संतापाने फुलत असतो आणि पाहता पाहता
प्रखर उन्हाचा पडतो अस्ताव्यस्त डेरा

कितीही गच्च मिटले डोळे तरी भगभगणारा प्रकाश
कमी होत नाही
एक सुन्न बधिरता वळवळत जाते नसानसातून मेंदूकडे
**आणि उद्या उजाडतो**

'गुड मॉरनिंग' 'हाउ आर यु?' 'फाईन' 'थँक यु'
कठपुतळ्या सगळ्या मुखवटे चढवून
नाटक करायला सज्ज असतात

कॉम्प्युटर, फोन, कॉफी, फाईल्स उत्साहाने तरंगतात
अवतीभवती
सूर्य मात्र हसत असतो खदखदा
आसुरी आनंदाने या साम्राज्यात गुलामांवर कोरडे ओढत

अमानुष मनें आसमंतात भरलेल्या
लाखो भुकेल्या जीवांचे टाहो दुर्लक्षित
भरल्या पोटी पैसे मोजत असतात
नवी कार नवी घरे घेण्याकरिता
हा नाटकाचाच एक भाग आहे का?

हा खेळ खेळून सूर्यही कंटाळतो
त्याला दुसऱ्या साम्राज्याचा वेध लागतो
इथली प्यादी कोलमडून पडली असतात

तो आपले आसूड उगारत दिशा बदलतो
मांजराच्या पावलाने सायंकाळ येते जीवनाची
सोबत यम सावल्यांना घेऊन
त्या पाठोपाठ रात्रीची राणी येते काळोखाची शाल घेऊन

काही गुलामांनी दम तोडला असतो, काही प्यादे
मुखवट्या सहित गोठले असतात,
उरलेले शोधू पाहतात स्वतःचे अस्तित्व रात्रीच्या
काळोखात
झापड भिरकावून टक्क डोळे उघडून
सगळ्यांना नसते मुभा ह्या राज्यात,
डोळे मिटून स्वप्ने पाहण्याची
आणि काही नशीबवान डोळे मिटतात कधी न
उघडण्यासाठी

सूर्य खदखदा हसत असतो
दुसऱ्या साम्राज्यात तेजाने तळपत
आजचा उद्या करण्याकरिता


**चारोळ्या**

**प्रेम - डोक्याला Shot !**

शब्दाने होते सुरुवात प्रेमाची
स्पर्शातून जाणवते गोडी प्रेमाची
सहवासातून होते अभिव्यक्ती प्रेमाची
दुराव्यातूनच होते खरी प्रचीती प्रेमाची

**लग्नाची बेडी, जमली आमची जोडी**

जोडीने आम्ही जेवतो,
जोडीने आम्ही फिरतो,
जोडीने आम्ही झोपतो,
आणि खरं सांगायचं म्हणजे
जोडीनेच आम्ही एकांत देखील भोगतो



## ज्येष्ठ नागरिक : सुख दुःखे

श्री. *बिंदुमाधव जोशी*

ज्येष्ठ नागरिकांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा ठरेल असा हा विषय आहे. 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे'; सारे मानवी जीवनच या एका अभंगात साकार झालेले असताना ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात यापेक्षा वेगळे काय आढळणार आहे? तरी पण ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनाचा वेगळेपणा निरखून पाहण्यास काही हरकत नसावी.

सुखदुःखांचा विचार करताना शारीरिक आणि मानसिक हे दोन ढोबळ भाग पडतात व त्यातही निसर्गनिर्मित (वयोमानानुसार), परिस्थितीजन्य, व मानवनिर्मित असे पोटभाग पडतात. या सर्वांचा एकत्र साकल्याने विचार करण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

ज्येष्ठ नागरिकाचे पहिले प्रमुख सुख म्हणजे कामातून आणि अर्थार्जनाच्या जबाबदारीतून सुटका; लवकर उठायला नको, आंघोळीची गडबड नको; 'अहो, लवकर आवरा, दहा वाजले, चार घास गिळा आणि पळा ऑफीसला' असा बायकोचा ससेमिरा नको. सूर्याचे ऊन अंगावर आल्यानंतर, आरामात आळोखे पिळोखे देत उठावे, चहा घेत घेत आरामशीर पेपर चाळावेत, दोन दोन कप चहाचे ढोसावेत आणि आरामात बाथरूमकडे मोर्चा वळवावा. दिनक्रम कसा निवांत, आरामात; अगदी स्वप्नासारखा. पण हे सुख जेमतेम ४/५ महिने. त्यातूनच निघते कंटाळ्याचे 'बोअर झालो बुवा' हे दुःख.

आपणापैकी बहुतेक जण उच्च पदावरून निवृत्त झालेले असतात. कोणी Executive Engineer, Divisional Engineer, कोणी बॅंकेतले अधिकारी, कोणी अधिक्षक, डेप्यूटी कलेक्टर, इन्कम टॅक्स अधिकारी असे सरकारी पदाधिकारी, माझ्यासारखे कोणी प्राध्यापक/प्राचार्य. नोकरीमध्ये असताना डाव्या हाताला शिपाई, समोर सहीसाठी कागद घेऊन पुढे असलेला कारकून किंवा स्वतःच्या खात्यातून पैसे काढण्यासाठी स्लिप घेऊन थांबलेला खातेदार किंवा तास संपताच बाहेर भोवती 'सर सर' करत घोळका करणारे विद्यार्थी, असा शब्द झेलण्यासाठी गर्दी करणारा माणसांचा परिवार असतो, आता कोणीच नसते, वेळ जाता जात नाही; कोण्णी विचारत नसतं, लक्ष देत नसतं. आयुष्य एकदम कंटाळवाणं होऊन जातं. ३०/३५ वर्षे जे काम केलं त्याशिवाय काहीही येत नसल्यामुळे एकदम रिकामं रिकामं, भकास, ओसाड, आणि उदास वाटतं. सुखाचं पर्यवसान असं एकदम दुःखात होतं. तीस पस्तीस वर्षे अशी खुर्चीत बसून व तोंडाला आवडेल तसे खाऊन पोटाचा घेर वाढलेला असतो; गुडघे उठबस करायला कुरकुरु लागतात. एखाद्या दिवशी तोल जाऊन पडायला होतं. डॉक्टर म्हणतात, 'मधुमेह झालाय, आता सगळंच जपून.' एखाद्या दिवशी थकल्यासारखं वाटतं, डॉक्टरला आपण म्हणतो, 'एखादं शक्तीवर्धक टॉनिक द्या हो लिहून.' ते म्हणतात, 'आता कसलं टॉनिक घेताय? बी.पी.वाढलंय! व्यायाम करा रोज.' गुडघे दुखतात, दात राम राम म्हणतात, केस भुरुभुरु उडून जातात कायमचे. फिरायची मजा नाही, खाण्याची चैन नाही, आरशात बघायची सोय नाही. सारे अवयव बंड केल्यासारखी तक्रार करू लागतात. सकाळी उठावं तर काही ना काही दुखंत असतं आणि हे म्हणे निवृत्तीचे जीवन. पु. लं. विनोदात सांगून जातात, 'ज्या दिवशी उठल्यानंतर काहीही दुखत नसेल त्या दिवशी समजा आपण मेलो.' केवढे विदारक सत्य!

या शारीरिक दुःखात मानसिक दुःख भर घालतं. आयुष्यभर कसं रुबाबात जीवन गेलेलं

असतं. सूटबूट घालून ऑफीसात गेल्यावर शिपाई सलाम करून झुकते दार उघडून देतो. ऑफीसातले कर्मचारी 'येस सर, येस सर' करत झुकत असतात. शेकडो माणसे रोज भेटायला येतात आणि आपले काम करा म्हणून आर्जवे करतात. हाताखालचे नोकर नुसत्या सहीसाठी अदबीने कागद पुढे करतात. घरी आले की पत्नी गरम चहाचा कप घेऊन सुहास्य वदनाने स्वागताला उभी असते. आपण चहा घेत असताना पायाशी बसून बुटाचे बंद सोडते किंवा टायची गाठ सैल करते. डॅडी आले असं कळल्यावर मुले चिडीचूप होतात. धाकटी चिमुरडी गळ्यात हात घालून आपल्यासाठी आणि दादासाठी रदबदली करत असते - आणि आता?

ऑफीसची माणसे रस्त्यात भेटली तरी दुर्लक्ष करतात किंवा जुलमाचा रामराम करतात. पत्नी नातवात गुंतलेली असते आणि सूनबाई अर्ध्या तासाने कोमट चहाचा कप घेऊन पुढे येते. वृद्धपणात सर्वात मोठे दुःख असते ते असे उपेक्षेचे. आपण कोणाच्याही खिसगणतीत नसतो आणि बऱ्याच वेळा सर्वांना नकोसे असतो. हे फार मोठे दुःख असते. माझ्या ओळखीच्या एका वृद्ध दांपत्याची कहाणी मोठी करूण आहे. एकुलत्या एका मुलीच्या आग्रहामुळे घरदार शेती सर्व विकून ते दोघे मुलीकडे अमेरिकेत रहावयास गेले आणि सहाच महिन्यात मुलीने आणि जावयाने त्यांना निष्कांचन अवस्थेत परत पाठवले. त्यांचे भारतात फार हाल झाले. माझा तो प्राध्यापक मित्र आता शिकवण्या करून कसाबसा उदरनिर्वाह करतोय. एका मुलाने व सुनेने गोड बोलून आईबापांची सर्व धन दौलत हडप केली व मुलीकडे रहावयास पाठवले. मुलीच्या ओढगस्ती जीवनात त्यांचे फार हाल झाले. त्यांच्या अंतिम वेळी व अंत्ययात्रेलासुद्धा ते दोघे हजर राहिले नाहीत. अर्थात या टोकाच्या केसेस आहेत पण त्या बोलक्या आहेत. उपेक्षेचे दुःख हे वृद्धांचे, विशेषतः भगिनींचे बोचरे दुखणे आहे. बऱ्याच वृद्धांची आर्थिक परिस्थिति चांगली असते.

निवृत्तीवेतनही दोघांना पुरेल एवढे मिळते. NRI मुले आपल्या आईवडिलांची 'अथश्री' सारखी व्यवस्था करतात, पण खुर्चीत असताना भागणारी मोठेपणाची भूक, आपली विचारपूस कोणीतरी आस्थेने प्रेमाने करावी ही मनाची तळमळ भाडोत्री माणसे पुरी करू शकत नाहीत. आणि मग मन आक्रंदून उठते -- 'याच साठी केला होता का जीवनभर अट्टाहास?'

'अथश्री'मधल्या वृद्धाशी गप्पा मारताना, वृद्धाश्रमातील वृद्धांशी बोलताना, अगदी फ्रान्स-अमेरिकेतील वृद्ध आईबापाशी हितगुज करताना हे जाणवले की एकाकीपणाचे, आपल्याच मुलांना आपली गरज नसल्याचे त्यांचे दुःख विदारक आहे, स्थलकालातीत आहे. त्यांच्या चेहऱ्यावरील केविलवाणे कारुण्य त्यांची व्यथा सांगून जाते. अर्थात याला काही अपवाद आहेत. काही भाग्यवान आईबाप आहेत ज्यांना या दुःखाची जराही झळ लागलेली नाही; त्यांची मुले समजूतदार आहेत आणि आपल्या पालकांना प्रेमाने सांभाळतात. पण असे अपवाद फार थोडे आहेत आणि ते नियमाला बळकटी देतात. Exception only proves the rule.

या सुखदुःखांचे विवेचन करताना डॉ. सरदेसाईनी मांडलेला एक विचार मला फार आवडला. ते म्हणतात, "माणसाची एक आध्यात्मिक प्रकृती असते." या कल्पनेचा उहापोह करताना त्यांनी श्रीमद्भगवतगीतेतील सर्व मार्गांचा -- ज्ञानमार्ग, तंत्रमार्ग, भक्तीमार्ग आणि कर्ममार्ग -- यांचा परामर्श घेतलेला आहे. यापैकी प्रत्येकाने कोठल्यातरी मार्गाचा अवलंब करावा असे आवाहन केले आहे; कारण त्याशिवाय मनःशांती लाभणार नाही.

दुःखाच्या मुळाचा शोध घेताना डॉ.सरदेसाई

म्हणतात,"आपला अहंकार दुखावला जातो हे मानसिक दुःखाचे खरे मूळ आहे. आपण आपली एक Image मनात करून ठेवलेली असते; मी हुशार, विद्वान, देखणा, कर्तव्यदक्ष, ... वगैरे वगैरे. वृद्धत्वात शारीरिक, मानसिक असहायतेमुळे या 'इमेज'ला धक्का बसतो आणि आपण दुःखी होतो."

आपली आध्यात्मिक प्रकृती जर सुदृढ असेल तर हे दुःख आपणास स्पर्श करू शकत नाही.

आपली आध्यात्मिक प्रकृती या सुखदुःखाच्या प्रश्नांवर मात करणारी एकमेव गुरुकिल्ली आहे. परमेश्वरावर श्रद्धा ठेवून दुःखाना तोंड देण्याची शक्ती अध्यात्म देते. श्रीरामकृष्ण परमहंसाना घशाचा कॅन्सर झाला होता. देवी कालीमातेला विनंती करून त्यातून मुक्त होणे त्याना सहज शक्य होते. पण त्यांना भक्तांना हे दाखवायचे होते की भक्ती ही दुःख टाळण्यासाठी नसते, ते सहन करण्याची शक्ती मिळण्यासाठी असते. दुःख कोणालाच टाळता येत नाही; ते अटळ असते; श्रध्देने ते फक्त सुसह्य होते.

बांधवांच्या सर्वनाशाचा विषाद पचवण्यासाठी भगवान श्रीकृष्णानी अर्जुनाला युध्दक्षेत्र सोडून जाण्याची परवानगी नाही दिली तर क्षत्रिय धर्माचे पालन करण्यास सांगितले. श्रीमद्भगवतगीता आपल्या अहंकारावर बोट ठेवते. गीता सांगते, 'म्हटलं तर तू कोणी नाहीस, म्हटलं तर तू स्वतः परमेश्वराचा एक अंश आहेस. एका बाजूला अहंकार करण्यासारखे तुझ्याजवळ काही नाही; दुसऱ्या बाजूला तुला कोण तुच्छ लेखणार? तू त्या मोठ्या तेजाचा एक स्फुल्लिंग आहेस.'

आयुष्याच्या एवढ्या अनुभवानंतर ही आध्यात्मिक प्रकृती निर्माण व्हायला हवी. धर्मग्रंथांच्या अभ्यासाने, परिशीलनाने ही प्रकृती सुदृढ होते. अर्जुनाच्या विषादावर जे औषध तेच आपणा वृद्धांसाठी -- कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ... आणि हे कर्म कसे करायचे? "सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ!"





**चुटका**
**महेश लोटलीकर**

रावणाला त्याच्या कुकर्मांबद्दल पश्चाताप वाटू लागला. त्याने रामाची माफी मागायचं ठरवलं. त्याने मंदोदरीला तसं सांगितलं आणि त्या दोघांनी रामाच्या घरी जायचं ठरवलं.

ते दोघं रामाच्या घरापाशी पोचले आणि दारावरची बेल वाजवली. रामाने दरवाजा उघडला पण रावण काहीही न बोलता शांतपणे उभा राहिला. मंदोदरीने हळूच विचारलं, "काय झालं?" त्यावर रावण म्हणाला, "अगं, कुठल्या तोंडाने माफी मागू मी?"



**निष्ठूर सुंदरी**
***अभय बिंदुमाधव जोशी***

किटली हातात घेउनि निघालो मी दुधाला असा
रोजचेच कपडे अन मुद्रेवर स्वप्नांचा ठसा
सूर्याच्या एंट्रीचा समय तो पदर सावरे उषा
घरोघरी फ्लशचे आवाज आणि वाजती कपबशा

रस्त्यावर पब्लिक रोजचंच बाळूकाका अन कुत्रा
जोश्यांचा सदानंद अन बहीण त्याची ती खतरा
'हाय, काय' करीत निघालो मी वाढवित थोडी गती
पुढच्याच चौकात दहाच फुटांवर दिसली मला 'ती'

श्रीदेवी की खजुराहोची अप्सरा, कोण बरे ही बाला
मादक तिची ती फिगर पाहुनी घाम फुटला मला
साईन वेव्हच असे कर्व्हज्! तिचे ते उफाळणारे यौवन

पावलागणिक करी ती माझे अंतःकरण विदीर्ण
'फ्रंट व्ह्यू' दावी एकदा, घाली देवा मी सांकडे
अहा! थांबली पहा ती, वळून पाही मजकडे
हुडहुडी भरली मजला असून महिना ग्रीष्माचा
घुबडाचाही खूप बरा असा चेहरा होता तिचा !!



**प्रेमाची भाषा**
***अभिजीत जोशी***

प्रेमाच्या भाषेला
Compiler का नसतो?
कितीही debug केली तरी
हार्टचा reference nullच का असतो?

प्रेमाच्या भाषेत
कितीतरी error
Code run झाला की मात्र
Everything इज fair

प्रेमाच्या भाषेच्या
Warnings लई भारी
Head-er not found तरी
Execution जारी

प्रेमाच्या भाषेत
सगळा nativeच code
Just Managed code लिहिला की
म्हणेल "जमत नाही तर सोड"

प्रेमाच्या भाषेला
माणुसकीचा support
शत्रूला देखील जिंकून
Zero bugs report !!

*आधुनिक म्हण: Facebook वरची मैत्री, म्हणजे पाऊस विना छत्री*

सारथी २०१२



## म्हातारपण

*कादंबिनी धारप*

कोण म्हणतं म्हातारपण दुबळं असतं?
सुरकुत्यात सामावलेलं अनुभवांचं आकाश असतं
पिकल्या केसात विसावलेलं चित्ताचं शांतवन असतं

कोण म्हणतं म्हातारपण निराधार असतं ?
थरथरणाऱ्या हातातही सावरण्याचं बळ असतं
कापऱ्या स्वरात ओथंबलेलं मायेचं आगर असतं

कोण म्हणतं म्हातारपण विक्षिप्त असतं?
मुलांच्या कर्तृत्वात निथळणारं समाधानी हृदय असतं
नातवांच्या बालपणात नीज शैशव शोधणारं मन असतं

कोण म्हणतं म्हातारपण निरस असतं?
आजोबांच्या कथात दडलेलं रम्य कल्पनांचं जग असतं
आजीच्या हातचं जेवण म्हणजे अमृताचा नग असतं.





## असे कसे असतात बाबा, हे कोण मला सांगणार?

*सुभग ओक*

माया असते भर-भरून, प्रेम असतं अपरंपार,
डोळ्यात तरीही धाक त्यांच्या आणि जीभ
धारदार. आयुष्यभर पैसे साठवण्याची धडपड,
भविष्याचा विचार,जगणं राहून जाते एकीकडे,
डोक्यावर जीवनाचा कारभार.
असे कसे असतात बाबा, हे कोण मला सांगणार?

मुलांची स्वप्ने आणि त्यांच्या इच्छा करण्यासाठी
साकार, अविरत कष्ट, दुप्पट श्रम आणि मनाचा
निर्धार. असे कसे असतात बाबा, हे कोण मला
सांगणार?

स्वतःचे दुःख झाकून , मुलांचे सुख पहाणार,
त्यांच्यासाठी जगणार ..... त्यांच्यासाठीच
मरणार,
असे कसे असतात बाबा, हे कोण मला सांगणार?

मी आणि माझे बाबा, दोस्त होणार,
बोलणार एकमेकांशी .... एकमेकांचे ऐकणार
असे कसे असतात बाबा, हे मी त्यांनाच
विचारणार?

असेच असतात बाबा, हे, माझे बाबाच मला
पटवणार.असेच असतात बाबा, हे, माझे बाबाच
मला दाखवणार



## आम्ही मायदेशी, मुलं परदेशी'

*सौ उषा थत्ते*

साठी ओलांडलेल्या, भारतात एकटे राहणा-या, अनेक मध्यम वर्गीय जेष्ठ नागरिकांमध्ये 'आम्ही मायदेशी, मुलं परदेशी' अशी परिस्थिती अधिकाधिक आढळते. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती, त्यामुळे आपली मुलं शिकून मोठी होऊन नोकरी व्यवसायानिमित्त कुटुंबापासून दूर परगावी गेली, तरी त्यांची अनुपस्थिती व उणीव तितक्या तीव्रतेने जाणवत नसे, व त्यामुळे पालकांच्या आयुष्यात मोठी पोकळीही निर्माण होत नसे. तसेच बरेचदा, कुटुंब प्रमुखाच्या किंवा कर्त्या दांपत्याच्या निवृत्तीनंतरही, कुटुंबावर अवलंबून असलेल्या काका, काकू, मामा, मामी, आत्या,मावशी यापैकी एखाद-दुस-या अन्य़ व्यक्तींचीही देखभाल योग्य त्या मान सन्मानाने होत राही. व ह्या वयस्कर व्यक्तीही कुटुंबातील आपापली भूमिका जबाबदारीने पार पडत असत. हळू हळू देशांर्तगत प्रदेशांच्या व नंतर देश-विदेशामाधल्या सीमारेषा पुसट होत गेल्याने जागतिकीकरणाचा प्रभाव समाजाच्या सर्व स्थरांवर, विशेषत: बुद्धीजीवी म्हणणाऱ्या उच्च्य मध्यमवर्गावर पडू लागला. "जोडूनिया धन उत्तम व्यवहारे, उदास विचारे वेच करी " या उक्तीला अनुसरून, अनेकदा दोघेही नोकरी करणारे सुशिक्षित आई-वडील, त्यांचा आटोपशीर संसार सांभाळून, मुलांना उच्च शिक्षण देऊ लागले. परिणामी, सामान्य कुटुंबातील अनेक मुलांची हुशारी बहरली. भारतातील I.I.T, medical colleges, अशा मान्यताप्रत संस्थातून, स्वकर्तृत्वाने प्रवेश मिळवून, यशाच्या पायऱ्या भराभर चढायला लागली. १० वी १२ वी नंतर उच्च तांत्रिक शिक्षण घेतलेली ही मुलं, त्यांना उत्तोमउत्म संधी उपलब्ध होवू लागल्याने, नामांकित परदेशी संस्थांतून परदेशी विद्यापीठांचे उच्च पदवीधर होऊन बाहेर पडू लागली. त्यांचे मध्यमवर्गीय आईवडिलही आपल्या मुलांच्या यशोगाथा मोठ्या अभिमानाने सांगू लागले, त्यांच्या अलौकिक यशाने सुखावू, हुरळू लागले.

हळूहळू काळ जसा पुढे सरकत गेला तशी परिस्थिती खूपच बदलली. आपल्या सक्रीय व्यवसायातून निवृत्त झालेल्या जेष्ठ आई वडीलांना एकटेपणाची जाणीव अधिक प्रखरतेने होऊ लागली. परदेशातील शिक्षणक्रम संपवून मुले स्वदेशी परततील अशा आशेवर त्यांच्या वाटेकडे ते डोळे लावून बसले. पण! एक मोठ्ठा पण इथे उभा राहिला. उच्च शिक्षण घेतल्यावर भारतीय मुलांच्या कर्तृत्वाची शिखरं उंचावली व भारतात असलेल्या संधी त्यांना फारच निकृष्ट व तोकड्या वाटू लागल्या. परिणामी, शिक्षणाकरिता युरोप, अमेरीका, ऑस्ट्रेलिया अशा परदेशी गेलेली मुले तिथेच स्थिरावली. काहींनी भारतात येऊन आपला जोडीदार निवडून नेला किंवा काहींनी परदेशीच जोडीदार मिळवला. ही मुलं परदेशातच पाय रोवून, घरदार करून कायम स्वरूपी स्थिरावली. आपली मुलं म्हातारपणी आपली देखभाल करतील ह्या भारतातील त्यांच्या पालकांच्या आशा कधीच मावळल्या. ही मुलं केवळ भौगोलिक अर्थानेच दुरावली नाहीत तर हळूहळू मानसिक पातळीवरपण परदेशीय विचारसरणीचा त्यांच्या मनावर पगडा पडून, अनेक सामान्य, मध्यमवर्गीय, हुशार मुले, सर्वार्थाने हजारो कोस आपल्या आई-वडीलांपासून दुरावली. सुरवातीच्या विद्यार्थी दशेत, निदान एक दोन महिन्यात येणारी पत्रे किंवा १५-२० दिवसांनी येणारा एखादा फोन ह्यांची जागा आता

विज्ञानातील नव्यानव्या शोधांनी साकारलेल्या e-mail, किंवा skype वरील संभाषणांनी घेतली, नातवंडे, सुना, मुलं skype वर दिसू लागली. त्यांच्याशी खूप वेळ बोलता येऊ लागले. परिस्थिती थोडी सुसह्य होऊ लागली. तरीपण दुधाची तहान ताकाने भागते का? आपल्या नोकरी धंद्याच्या धागधुगीत आपल्या मुलांच्या सहवासात घालवायचे राहून गेलेले क्षण आपल्या नातवंडाना कलेकलेने वाढतांना अनुभवू ही मनातली आशा मनातच राहिली. तरुणपणी, एकत्र कुटुंब असल्यामुळे एकमेकांच्या सहवासात एकांतात राहण्याची पालकांची आस कधी पूर्ण झाली नाही, तर आता म्हातारपणी दोघंच दोघं घरात! वृध्द जोडपे एकमेकांशी काय सारखं बोलणार? आमच्या बरोबरच्या काही ज्येष्ठांची अपत्ये त्यांच्या जवळच आहेत पण मुलगा, सून दोघंही नोकरी करीत असल्याने , किंबहुना नवरा बायको दोघांनीहि अर्थार्जन करणे ही हल्लीच्या काळाची गरजच असल्याने, साहजिकच नातवंडाची देखभाल कुटुंबातील निवृत्त, ज्येष्ठांकडे आली आहे.

खाजगीत माझी एक मैत्रीण विनोदाने म्हणते, " आम्ही म्हातारपणी लेकुरवाळे झालो आहोत. नातवंडे आहेत ना गळ्यात. म्हातारपणी पण कुठे जाता येत नाही." पण भारतात एकटेपणाने राहणा-या, मुले व नातवंडे दोहोंच्याही सहवासास दुरावलेल्या आजी आजोबांची व्यथा त्यांना काय कळणार ? एक ग्रामीण म्हण आहे ना , 'एकपुती पण रडे व सातपुती पण रडे'. मनुष्य स्वभावच शेवटी कुरकुरणारा व असंतुष्ट आहे हे खरे! बरं, मुलांच्याकडे परदेशात कायमस्वरूपी जाऊन राहावे तर सगळ्यांनाच वैद्यकीय विमासंरक्षण व मदत मिळतेच असे नाही. आणि वयस्कर लोकांचे करायला तरी कोण मिळते तिकडे? भारतातील आई वडील दोघं जोडीने असतात तेव्हा एकमेकांच्या सहवासात त्यांचे जीवन सुसह्य होते, पण दुर्दैवाने यथावकाश त्यांच्यापौकी एकट्यालाच जीवन जगण्याची वेळ येते तेंव्हा तर ह्या आयुष्याच्या संध्याकाळी सुखद संध्याछाये ऐवजी गडद अंधःकारच पसरतो.

वैद्यकीय शास्त्रातील आधुनिक प्रगतीमुळे पूर्वीपेक्षा सरासरी वयोमान वाढले आहे, पण त्याबरोबरच असंख्य दुर्धर रोगांची भर पडली आहे. कॅन्सर, अर्धांगवायू, विस्मरण, अशा दुर्धर रोगाने जर दोघांपैकी एकाला ग्रासले तर म्हातारपणी शरीराने तसेच आर्थिक दृष्टीनेही आपल्या जोडीदाराला सांभाळणे केवळ अशक्य होते. आपला काम धंदा सोडून मुलंही फारकाळ मदतीला येऊ शकत नाहीत. ह्या परिस्थितीत मग ज्येष्ठ पालकांना राहण्यास 'वृद्धाश्रम' हा एक आशेचा किरण दिसतो. तिथे समवयस्क, समदु:खी अशा माणसांच्या सहवासात जीवन थोडे सुसह्य बनते. तात्पर्यी, स्वत:ला कुढल्यातरी समाज उपयोगी कामात झोकून देणे, आपल्याच दुखा:त बुडून न राहता कुणाचे तरी दु:ख थोडेतरी सुसह्य करण्यास आपण हातभार लावू शकतो का ते पाहणे अधिक योग्य! ग. दि. माडगूळकरांनी 'गीतरामायणात' म्हटले आहे ना, 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा'. ज्याप्रमाणे दोन ओंडक्यांची होते सागरात भेट, पण ती पुनः गाठभेट न होण्यासाठीच दूर जातात, तसेच, प्राप्त परिस्थितीत, आपला व आपल्या मुलांचा सहवास अल्पकालीनच होता, आपले जीवन हे आता दुस्ऱ्या कुणाकरीता तरी आहे हे सत्य आपलेसे करावे. प्रत्येक क्षण - दु:खी कष्टी न होता - परके सुद्धा आपले मानून त्यांच्या

करीताच जगायची शिकवण मनाला द्यावी, त्यांच्यात रमावे - म्हणजे एकाकीपणाचे मानगुटीवर बसलेले भूत विलीन होऊन जाईल. ज्येष्ठांनी होईल तेवढी शारीरिक व आर्थिक मदत आपल्यासारख्याच परिस्थितीत असलेल्या इतर ज्येष्ठांना, त्यांच्या परिस्थितीची जाणीव ठेवून आपणहून करावी. हेच औषध व तोडगा ह्या परिस्थितीवर आहे.



### गणपती उत्सव काल आणि आज

*मुग्धा गलांडे*

स्वातंत्र्यपूर्व काळात समाज प्रबोधनासाठी लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला उत्सव म्हणजे गणेश उत्सव. या उत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील विविध जातीचे लोक एकत्र येत. १० दिवस चालू असलेल्या या उत्सवात सकाळी श्री गणेशाचे पूजन तर संध्याकाळी संगीत, मोठ्या नेत्यांची भाषणे होत व सर्वसामान्य लोकांना आपण पारतंत्र्यात असल्याची जाणीव करून स्वातंत्र्यासाठी तयार होण्याचे आवाहन केले जात असे. महाराष्ट्रात सुरू झालेला हा उत्सव आता भारताबाहेर म्हणजेच - भारत देशाची सीमा ओलांडून जिथे जिथे मराठी लोक आहेत तिथे साजरा होत आहे. इंग्लंड , अमेरिका, ऑस्ट्रेलिया हे प्रमुख देश.

गणेश उत्सवाच्या निमित्ताने आजकाल विविध activities, उदा - गाणी, छोट्या स्किट्स, नाच - हे मुलांचे कार्यक्रम होतात. लहानपणापासून आमच्या घरात गणपतीचे आगमन होत असे. त्यावेळी मोदकापुरताच हा उत्सव माझ्या लक्षात होता. पण आता अमेरिकेत या उत्सवाचे माझ्याशी असलेले नाते उमजू लागले आहे. गणपती उत्सवाच्या निमित्ताने आम्ही मित्र-मैत्रिणी एकत्र येतो. एकमेकांच्या घरी जातो, गप्पा होतात, मराठी मंडळाचा गणेश उत्सव एकत्र साजरा करतो. यामुळे भारतापासून, मातृभूमीपासून मी सातासमुद्रा पलीकडे असले तरीही या उत्सवाच्या निमित्ताने सगळे भारतीय एकत्र येतात, एकमेकांशी अतूट नाते निर्माण करतात. हे लोकमान्य टिळकांसारख्या नेत्याला १०० वर्षापूर्वीच उमजले होते, याची आज मला जाणीव होते. लोकमान्य टिळक यांना माझे शतकोटी प्रणाम.




## Cura

**NRI & Property Management Services, Pune**

Founded by ex-NRIs from Seattle, we provide reliable services in:

1. **Managing property in Pune** – renting, basic furnishing, restoration and caretaking and selling properties in Pune
2. **Utility Bills:** payments and changes
3. **Income Tax:** returns and PAN card
4. **Insurance:** overseas travel, health and home insurance.

Contact us at: info@mycuraservices.com
Visit us at: www.mycuraservices.com
Phone: +91-8888861566 / 8888861567

सारथी २०१२




Best in Class™
Education Center
Give your child the gift of a lifetime
•Math & Writing
•Develop Critical Thinking
•Build Analytical Skills
•Designed for Grades K-12
•Tailored to individuals
•Weekly Evaluation
ENRICHMENT PROGRAM
•For Ages 3-5
•Letter Recognition
•Number Concepts
•Shape Recognition
•Hand Writing
•Confidence Building
BEGINNERS IN CLASS
•1 to 1 attention
•Standardized Test Prep
•SAT/ACT Prep
•Study and Organization
•College Planning
•Variety of Topics
PRIVATE TUTORING
Bellevue - 425.453.9532
13427 NE 20th St, Ste 150
Lynnwood - 425.741.3000
16911 Hwy 99, Ste #106
Renton - 425.333.7333
4820 NE 4th St, A107
Woodinville - 425.368.3008
13317 NE 175th St, Ste G
Northgate - 206.801.6688
11030 5th Ave NE, Ste A
Redmond - 425.292.1818
16701 Cleveland St, Ste B
Bothell - 425.368.3069
20806 Bothell-Everett Hwy, Ste 101
Issaquah - 425.272.1328
1505 NW Gilman Blvd, Ste 6
Seattle - 206.341.9914
2100 E Spruce St
BestInClassEducation.com
1.888.683.8108



**निवृत्तीच्या उंबरठयावर.....**

***शीतल पटवर्धन-बापट***

आयुष्य म्हंटल की चिंता काही संपत नाही. जीवनाच रहाटघाडग कुणासाठी थांबत नाही. कधी कधी प्रश्न पडतो की आयुष्याची एवढी वर्ष खर तर अर्ध्याहून अधिक आयुष्यच ज्या चांगल्या कामात घालवले त्याचा आस्वाद शेवटपर्यंत का बर घेता येत नाही? आणि मग अचानक खाडकन झोपेतून कुणीतरी उठवाव असा एक शब्द डोळ्यासमोर उमटतो, 'नियम' (Rules). ते म्हणतात ना 'नियमाला अपवाद नसतो'. संसार, नोकरी आणि स्वाभिमान या त्रीकुटांचा मेळ घालून, सातत्याने २०, ३० किंवा ४० वर्ष स्वतःला एका सत्कार्यात झोकून देऊन प्रत्येकच व्यक्ती कधी ना कधी एका वेगळ्या आणि गूढ अश्या निवृत्तीच्या शेवटच्या टप्प्यात उभी असते. आपली सर्व सुख दुःख वाटत, अनेक संकटांवर मात करत आजवर ज्या व्यक्तीनी अतोनात कष्ट केले अश्या निवृत्तीच्या उंबरठयावर असलेल्या, असणाऱ्या तुमच्यातल्या प्रत्तेक आईला, मावशीला, आजीला, बाबांना, मैत्रिणीला माझा हा लेख मी अर्पण करते.

स्त्रिया आपल पूर्वाश्रमीच आयुष्य स्मरणात ठेवून लग्न करून सासरी येतात. पूर्वी जिद्दीच्या बळावर घेतलेल शिक्षण नंतर आयुष्यात इतक उपयोगी पडेल ह्याची तेव्हा कुणालाच कल्पना नसते. बरेच वेळा आपण घेतलेलं शिक्षण आणि नोकरी ह्याचा संबंध नसतो. पण नोकरीतही वेगळे अनुभव येतात आणि ते जे काही शिकवून जातात ते कुठल्या पाठ्यपुस्तकात वाचयला मिळत नाहीत. पुढे नोकरीव्यतिरिक्त ज्याला जितपत जमेल तो बरोबरीने सामाजिक क्षेत्रांतही काम करतो. आयुष्याच्या दीर्घ कालावधीत नोकरी करणारा प्रत्येक जण आयुष्यात जे काही मिळवतो, घडवतो ते स्वतःच्या हुशारीवर आणि अर्थातच आईवडीलांच्या संस्कारांच्या बळावर. एखाद्या नावाची खरी ओळख इतरांनी वाखाणल्यावरच सार्थ ठरते. तिच ओळख सार्थ ठरवत प्रत्तेक व्यक्ती स्वतःच अस एक वेगळ स्थान निर्माण करते, अनेक लोकांची शाबासकी मिळवते. आपल्या कामावर मनापासून प्रेम करत स्वतःच्या चिल्यापिल्याना बाहेरच्या स्पर्धायुगात स्वतःची जागा निर्माण करून देते.

आज २१ व्या शतकात स्त्रीपुरुष एकमेकांना पूरक आहेत. एकमेकांच्या यशात त्यांचा समान वाटा आहे. एका यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते अस म्हणतात. हिच म्हण आता थोडी बदलली तर? आज प्रत्तेक स्त्रीच्या यशात पुरुषांनी दिलेल्या प्रोत्साहन, पाठींबा आणि साथीचा मोलाचा सहभाग आहे. आज इथे Seattle मध्ये असणाऱ्या कुणाची न कुणाची आई, बाबा, काका, मावशी, आजी, मुलगा, सून, नातू नोकरीच्या ह्या चक्रातून गेले असतील. त्यांनी अनेक लोकांना घडवले असेल. इतकी वर्ष नोकरी करणारी ह्यातली प्रत्तेक व्यक्ती केव्हा न केव्हा ह्या retirement नावाच्या अजब कोड्यात सापडली असेल. एरवी office la जाताना घाईघाई असतानाही कोशिंबीर, आमटी, पोळी, भात, गोड एवढ सगळ करणारी कुणाची तरी आई आता उद्यापासून पंचपक्वान्नांची पंगतच मांडेल बहुधा! आयुष्यभर दगदग करत स्वतःच्या मुलांसाठी धडपडणारे कुणाचे तरी बाबा उद्यापासून घरीच असतील कदाचीत.

रोज बस मध्ये, ट्रेन मध्ये, रस्त्यात भेटणारे, नातालागान पेक्षाही अधिक जवळचे

वाटणारे सहकारी रोज नाही भेटणार आता, पण मला खात्री आहे कि त्या माणसांच्या आठवणीत कुणाची तरी मावशी नक्की असेल! मला खात्री आहे की शाळेतून १५ ऑगस्टच गाणं ऐकू येईल तेव्हा एखाद्या आजीचे डोळे नक्की पाणावतील, अश्रुनी नाही तर आजवर शाळेत शिकवलेल्या गीतांनी आणि प्रामाणिकपणे केलेल्या सेवेच्या समाधानानी! आज इतकी वर्ष अमुक एक वाजता निघायचं, अमुक एक लोकल पकडायची, तमुक एक वाजता मधली सुट्टी, ठराविक वेळेला चहा अस रुटीन असायच ते नसेल आता बहुतेक पण खात्री आहे मला की आयुष्यात ज्या गोष्टी करायच्या राहून गेल्या आहेत, ज्या गोष्टी आत्तापर्यंत छंद म्हणून जपल्या गेल्या आहेत त्या नक्कीच केल्या जातील. ज्या व्यक्तीला स्वतःच असा कुणीच नाही ती कदाचित वृद्धाश्रमात सेवा करेल,अनाथ मुलांची काळजी घेईल किंवा परमेश्वरा चरणी लीन होईल. मी तर ८० वर्षाचे आजोबा स्वतःला सामाजिक कार्यात झोकून देताना पाहिलेत. शिवाय, Music, टिव्ही, फिरणे, व्यायाम, स्वयंपाक, परदेशी दौरा, आपले कुटुंबीय, सामाजिक कार्य, नातवंड अश्या असंख्य गोष्टी त्या रुटीनला तोडीस तोड असतीलच की. कल्याण ते दादर, सदाशिव पेठ ते निगडी, कर्जत ते अंधेरी, किंवा Bellevue ते Seattle हा प्रवास थांबेल कदाचित, पण संपणार नाही. वाट बघत असेल प्रत्येकाच खर 'Retired लाइफ' ज्यात दडली असेल सुखासमाधानाची एक क्षणभर विश्रांती आणि पुन्हा सुरु होईल नवनवीन गोष्टी करण्याचा धडाडीचा प्रवास!



## आला मास श्रावणाचा

***कादंबिनी धारप***

खेळ उन पावसाचा
आला मास श्रावणाचा
वाऱ्यावर पसरला
गंध ओल्या मृत्तिकेचा

येते शिरवे क्षणात
सरसरून नभात
क्षणी पाझरे उन्हाचा
सडा ओलेत्या पानात

इंद्रधनूची कमान
जसा मदनाचा बाण
गगनाचे धरतीला
आवेगाने आलिंगन

धरतीच्या देही असा
फुले मयूर पिसारा
आलिंगनात नभाच्या
नाचे जगाचा पसारा

श्रावणाच्या तालावर
झुले मन झुल्यावर
नाचे मोरपीस जसे
अलगद वाऱ्यावर

सरीवर येते सर
थुई थुई नाचे मन
संगे डोले आसमंत
कोकिळेच्या सुरावर

दारी पडले गं सडे
झाली हिरवी गं झाडे
फुटे मनाला पालवी
वेडे आभाळाला भिडे



सारथी २०१२

# मराठी शाळा





फोटो आवडले ना? ही आहे आमची बाल विहार मराठी शाळा.
दर शनिवारी भेटतो आम्ही. आणि खूप खूप मजा करतो.
अभ्यास सुद्धा करतो बरं का !
गाणी, गोष्टी, वाचन आणि क्राफ्ट सुद्धा.
शाळेत आमच्या येते गम्मत
आणि दिवाळीला आमची अंगत पंगत!!

काका नि मावश्या शिकवतात आम्हाला,
लिहायला आणि वाचायला आणि बोलायला.
सकाळीच उठून जातो आम्ही, कुण्णी कटकट करत नाही.
खाऊच्या सुट्टीत आम्ही खाऊ खातो,
आणि...खूपच मस्ती केली तर ओरडा सुद्धा !
या ना कधीतरी भेटायला आम्हाला !!
आमच्यासोबत अ आ इ गिरवायला !!!!







# MAY MEGA EVENT


























सारथी २०१२


































## गुरु आणि मित्र

*बाळ ठाणेदार*

चांगला शिक्षक हा खऱ्या अर्थाने मित्र असतो. आणि चांगला मित्र हा खऱ्या अर्थी शिक्षक असतो, मग तो कोणत्या शाळेत शिकवत असेल किंवा नसेल. मी आता तुम्हाला अशा एका शिक्षिकेची घडलेली गोष्ट सांगणार आहे.

तिचे नाव श्रीमती जयश्री रॉय. शाळेच्या पहिल्या दिवशी ती तिच्या पाचवीच्या वर्गासमोर उभी राहून बाकीच्या शिक्षकांसारखीच "मुलांनो तुम्ही मला खूप प्रिय आहात. " असे बोलून गेली.

पण ते खरे असणे शक्यच नाही. पुढच्याच रांगेत पहिल्या बाकावर एक मुलगा "राकेश" खाली मान घालून बसला होता. श्रीमती रॉय, मागचे सबंध वर्ष पाहत आल्या होत्या की राकेश अगदी घाणेरडे कपडे घालून शाळेत येत असे. कोणाशीही बोलत नसे. घुम्यासारखा नुसता बसून रहात असे. ते त्यांना काही आवडणारे नव्हते. त्यामुळे श्रीमती रॉयकडून त्याच्या सर्व परीक्षेत त्याला मोठ्ठ्या लाल अक्षरात शेरे मिळाले होते.

शाळेच्या सुरवातीला सर्व शिक्षक/शिक्षिका त्यांच्या वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पूर्वीच्या रेकॉर्डसचा अभ्यास करत. तसा त्या शाळेचा नियमच होता. पण श्रीमती रॉयनी मुद्दामच राकेशाचे प्रगती-पत्र शेवटी ठेवले होते; त्यांना त्याच्याबद्दल काहीच कुतूहल नव्हते. परंतु जेंव्हा त्यांनी त्याचा रिपोर्ट वाचायला सुरुवात केली तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्याच्या पहिलीच्या शिक्षिकेने लिहिले होते की "राकेश हा अतिशय हुशार, हसरा मुलगा आहे. त्याला चांगले वळण आहे आणि तो अभ्यासात चलाख आहे. " त्याच्या दुसरीच्या शिक्षिकेने लिहिले होते "राकेश उत्तम विद्यार्थी आहे. त्याच्या वर्गातील मित्र-मैत्रिणींचा आवडता आहे." पण त्याची आई अंथरुणाला खिळून असल्यामुळे दु:खी आहे. त्याच्या तिसरीच्या शिक्षकाने लिहिले होते की "राकेशच्या बाल मनावर त्याच्या आईच्या मृत्यूमुळे बराच मोठा आघात झाला आहे. वडिलांचे दुर्लक्ष असल्यामुळे, शाळेत त्याच्याकडे लक्ष देणे अत्यंत जरुरीचे आहे; नाहीतर तो शाळेत मागे पडेल." चौथीच्या शिक्षकाचा शेरा होता "राकेश अंतर्मुख बनत आहे. आणि त्याचे शाळेत लक्षच नाही. " हे सर्व वाचून श्रीमती रॉय यांना आपल्या स्वत:चाच राग आला.!

नंतर जेव्हा नाताळ आला तेव्हा त्या अधिकच भारावल्या गेल्या. सर्व मुलांनी रंगी -बेरंगी कागदातून गुंडाळलेल्या वस्तू त्यांना भेट दिल्या, पण राकेशची भेट रद्दीच्या कागदात गुंडाळलेली. श्रीमती रॉय सर्व भेटी उघडता-उघडता मध्येच राकेशची भेट उघडू लागल्या. ती भेट पाहून काही मुले गालातल्या गालात हसू लागली. ते एक खड्यांचे ब्रेसलेट होते आणि एक अर्धी-मुर्धी भरलेली अत्तराची बाटली ! परंतु श्रीमती रॉय यांनी " किती छान " असे म्हणून ब्रेसलेट हातात घातले आणि अत्तर हाताला लावले. त्या दिवशी राकेश शाळेत उशिरापर्यंत थांबला आणि हळूच जाताना त्यांना म्हणाला "आज तुमच्या अंगाला माझ्या आईसारखाच वास येतो आहे. " त्या दिवशी सर्व मुले गेल्यानंतर श्रीमती रॉय एकट्याच एक तास ओक्साबोक्शी रडत होत्या. त्या क्षणापासून त्यांनी फक्त लेखन-वाचन आणि गणित शिकवायचे थांबविले आणि खऱ्या अर्थाने मुलांना शिकवायला सुरवात केली.

आता त्या राकेशकडे जास्त आपुलकीने

लक्ष देऊ लागल्या. राकेश हळू हळू खुलू लागला. त्याचे मन अभ्यासात रमू लागले. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनाने त्याची जादा प्रगती दिसू लागली. वर्षाखेरीस राकेश वर्गात सर्वात हुशार म्हणून चमकला. श्रीमती रॉय ह्यांचा राकेश आता सर्वात लाडका विद्यार्थी बनला.

एक वर्षानंतर श्रीमती रॉय ह्यांना त्यांच्या दाराखाली एक चिठ्ठी सापडली. ती राकेशने लिहिली होती आणि त्यात त्याने लिहिले होते की "माझ्या आयुष्यात सर्वात उत्तम शिक्षिका तुम्हीच मला लाभल्या." नंतर सहा वर्षांनी त्यांना परत राकेशकडून चिठ्ठी आली. त्यात लिहिले होते की "तो हायस्कूल मध्ये उत्तमपैकी उत्तीर्ण होऊन वर्गात तिसरा आला; आणि त्याची ठाम समजूत आहे की त्याच्या आयुष्यात त्याच उत्तम शिक्षिका त्याला लाभल्या. " नंतर चार वर्षांनी श्रीमती रॉयना राकेशचे पत्र आले. त्यात लिहिले होते की तो लवकरच कॉलेजमधून चांगल्या श्रेणीत पास होईल; आणि अजूनही त्याला वाटते की त्याला त्याच्या आयुष्यात श्रीमती रॉय ह्याच उत्तम शिक्षिका लाभल्या आहेत. नंतर अजून चार वर्षे गेली आणि त्यांना परत राकेशकडून एक पत्र आले. त्यात लिहिले होते की "Bachelor डिग्री मिळाल्यावर त्याने अजून पुढे शिक्षण घ्यायचे ठरविले आहे आणि त्याच त्याच्या आयुष्यातील सर्वात आवडत्या शिक्षिका! " पत्राखाली सही होती राकेश अ. गोरे M. D.

गोष्ट येथेच संपत नाही. साधारण काही महिन्यांनी त्यांना राकेशचे अजून एक पत्र आले. त्यात लिहिले होते की तो एका मुलीला भेटला आहे आणि आता ते लवकरच लग्न करणार आहेत. दोन वर्षांपूर्वीच त्याचे वडील स्वर्गवासी झाले. आई-वडील दोघेही नसल्याने त्याने श्रीमती रॉयना वराच्या आईचा मान घेण्याची विनंती केली. आणि काहीही आढेवेढे न घेता त्यांनी ती स्वीकारली. लग्नाला राकेशने दिलेले ब्रेसलेट रॉय घालून गेल्या आणि त्याने दिलेले अत्तरही त्यांनी न विसरता लावले होते. त्यांना बघून Dr. राकेशने आनंदाच्या भरात कडकडून मिठी मारली आणि कानात हळूच पुटपुटला " माझ्यावरचे तुमचे प्रेम, आणि विश्वास ह्याबद्दल तुमचा मी खूप आभारी आहे. माझ्या यशाचे कारण माझ्यावरील तुमचा नितांत विश्वास ! " श्रीमती रॉय ह्यांचा डोळ्यात टचकन पाणी आले. डोळे पुसता पुसताच त्या हळूच म्हणाल्या "खरे म्हणजे तूच मला कसे शिकवायचे हे शिकवलेस. तुला भेटण्यापूर्वी मला माहित नव्हते की खऱ्या अर्थी विद्यार्थ्यांना कसे शिकवायचे ते ! "



## चारोळी

***अभिजीत जोशी***

आज इथे जोराचा पाऊस पडला
समुद्रच उपसून जमिनीवर पडला
धरित्रीची तहान पाहून
जणू ढगच रडला
~~~~~~~~~~

प्रेमाला अपेक्षांचे पथ्य आहे
लग्नाला त्यागाची आहुती आहे
रुसव्याला क्षमेची आस आहे
तसे समाधानाला देवाचे अनुसंधान आहे
~~~~~~~~~~

सारथी २०१२



## सुख

*प्रसन्न जोशी*

सुख म्हणजे काय असतं
shower मधलं गरम पाणी असतं
त्रागा म्हणजे काय असतं
टबमध्ये घसरून पडणं असतं

सुख म्हणजे काय असतं
काही न घेता कोठा साफ होणं असतं
त्रागा म्हणजे काय असतं
toilet paper च्या जागी रिकामा पुठ्ठा असतं

सुख म्हणजे काय असतं
बायकोच्या हातचा उत्कृष्ट चहा असतं
त्रागा म्हणजे काय असतं
त्याच चहाचा डाग,
नुकत्याच आणलेल्या शर्टावर पडणं असतं

सुख म्हणजे काय असतं
office ला जायला स्वतःची गाडी असतं
त्रागा म्हणजे काय असतं
garage चा दरवाजा न उघडणं असतं

सुख म्हणजे काय असतं
बायकोच्या हातचं चटकदार जेवण असतं
त्रागा म्हणजे काय असतं
सुटलेल्या पोटाकडे बघून तिने तक्रार करणं असतं

सुख म्हणजे काय असतं
अश्या त्राग्यामधली गम्मत बघणं असतं
त्रागा म्हणजे काय असतं
असली कविता वाचून न हसणं असतं.



## राजीनामा

*विरेन पाटील*

एक होता आर आर , होता साधा हवालदार
त्याला भेटला शरद पवार, त्याने दिला आधार
उघडले राजकारणाचे दार, झाला गरीबांचा तारणहार

पण कधी कोणास ठाऊक,
त्याची बुद्धी झाली भ्रष्ट
जमवली माणसे नतद्रष्ट,
केली इज्जत नष्ट

कोणालाच कळले नाही,
आर आर चे कधी झाले आबा
जनता थकली मारून बोंबा,
म्हणाली आबा आतातरी थांबा

पण आबांनी न ठेवली जनाची, न मनाची
म्हणे मोठ्या शहरात छोट्या गोष्टी होत असतात
म्हणून काही आबा राजीनामा देत नसतात





## A Laugh For Posterity Monologue

SARANG JOSHI

*[Lights up. The outline of a bus is visible in the background. There is a set of steps SR leading to the platform in front of the bus. TONY walks in from R. He has a shoulder-bag. He climbs the steps, takes out a pass from his bag and flashes the pass at the driver. TONY continues walking down the aisle of the bus and sits in a seat facing the audience. Noises are heard (in the background) of a bus starting. After a few seconds, he combs his hair and takes out a video camera from his shoulder bag. He points the camera at himself and presses a button.]*

**TONY**

*(Enthusiastically)* Hello once again audience! This is Tony Braafheid - the Braafheid that matters - your favorite video blogger! And this is Braafheid Today, the place where you ... uh... find out about your favorite video blogger! Anyway, here I am, in the public bus, with people staring at me weirdly,

*(gestures left and right)*

on my way to the hospital to check up on my sis, you know, to make sure she still remembers me. You know why? Because it's her birthday! Wish her happy birthday, audience. Every little wish counts in the big picture...

*(Nods knowingly.)*

Anyway... so another hour has passed since I last blogged and nothing has changed. It's still the same day, it's still cloudy, it's still boring, and it's still Seattle. "What has this world come to?" I ask myself. Don't you ask yourself the same thing, audience? Well, I do. I mean, in the olden days, history was made every day. One day you invented the telephone, and the next day you discovered aliens in outer space! But all of that was in the olden days – you don't see much of it here, in this modern world. I mean - *(leans close)* - this bus has been around for the last 8 years! And I still ride it. *(Sniggers, leans back)*

Anyway – *(beep sound)*

Oh, darn, I'm running out of memory space! Remind me to delete some of my less awesome videos when I reach home, audience. Thanks for that. Anyway, that seems like enough intelligent content for one video. So, catch you in a bit, keep in touch, and keep watching!

Tony goes out.

*(Turns off video camera and puts it back inside. Turns to person to his left)*

I'm a You-tube celebrity, you see. I have to work to stay famous, unlike some other famous people I know. I have to act stupid, like I don't know anything, just to get comments like "Ha ha ha ha that was hilarious!" and stuff like that. People don't realize that I'm actually pretty smart. I'm Tony, Tony Braafheid, by the way.

*(Extends hand for a handshake)*

Ever heard of me?

*(Small pause)*

No?!

*(Retracts hand, slightly agitated)*

Seriously? What age do you live in? The Stone Age or something? I bet you know the president's name, don't you? Jeez, I tell you. The priorities some people have.

*(Shakes head)*

*(Pauses, gives a small laugh. Looks straight ahead again.) (To no-one in particular :)*

It's amazing how one simple action can mean so much. One laugh, so many interpretations.

*(Looks up, reads)* "5 minutes to Overlake Hospital"... *(Long pause)* My sister... My sister had the most beautiful laugh you could imagine. It was like ... like a waterfall, tinkling lightly over the stones and the ground. It was like a balm, smoothing the roughly hewn stones, crafting them into beautiful shiny pebbles. I wanted to just sit in front of her all day, taking in that ... that beautiful piece of unintentional music, and letting it wash over me and cleanse all the heavy burdens I had piled up on my own irresponsible shoulders.

*(Pause. Slightly agitated.)* Wait. "Had"? "Was"? Why do I keep saying that? She still laughs. She still smiles. She still makes the sun shine for me, even when it's late night. Why do I keep using the past tense then?

*(Pause. Calms down somewhat)*

It's because she's left me. Just like that, out of the blue, she loses herself, and the only foundation that keeps me running, the only thing that inspires me to look forward to a new day, crumbles to pieces – pieces that just can't be put together.


It's almost like Alisha's memory card ran out of space and was reduced to inaccessible smithereens. It's a good thing that doesn't happen to real memory cards. Even today, two years on, when almost all hope is lost, I can't bring myself to accept the truth. She doesn't know who I am. She doesn't know who she is. *(Small pause)* She doesn't know how much she means to me. She was my "olden days". She made history for me every day. *(Long pause)* But her laugh stayed. That, thankfully, wasn't stolen from her by the Fate. "A laugh for posterity," that's what that is. *(Smiles. Turns around and looks out the window)* There it is, Overlake Hospital. *(Small pause)* I walk up to her, on my visits, with a bouquet of her favorite flowers and she says, "Why thank you! You're so kind, coming every week to give me flowers! Should I know you?" And then she laughs, because she didn't really mean that question. It takes all my courage not to tear up, right there. I smile and try to play along. And once in a while, occasionally, she gives that wonderful, eternally gorgeous laugh of hers.

*(Pause. Looks up, as if having a revelation.)*

Then again... Maybe she's happy. Isn't that what a laugh is all about?
An expression of happiness? A sign, that you aren't an inanimate object, that you're a human, a human that can feel, that can enjoy, and so can laugh. I see it now. I've been selfish, blinded by what she means to me... Why am I moping so much if she's happy where she is? What's good for her is good for all of us, right? Even though I accept that, I can't bring myself to move on. I know I can move on. I just need a catalyst.
Maybe ... I dunno... the love of my life, possibly, to carry me away, even for a little while. Romance might possibly save me. *(Laughs.)*
*(Screeching of tires is heard as bus comes to a halt. TONY looks up, and out the window again)*
Well... Here I come, Alisha; here I come. Maybe today's my day. Maybe today you'll embrace your Tony like you used to. Maybe today you'll see how much of my broken heart my lost little sister still owns. Just maybe.
*(Walks off stairs. Pauses mid-stride)* I should've recorded that. *(Small pause)* Oh, whatever. Tony out. *(Exit SR. Lights fade.)*

~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

*(Winner of the Best Monologue Award at Drama-fest 2012 at Redmond High School, Redmond)*



अनिका दिगडे,
BMM, मराठी शाळा
~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~~

indi bite wishes you a Happy Diwali!

indi bite
INDIAN GRILL

Visit us @ Crossroads Mall, Bellevue

Enjoy Curries,Tikkas, Dosas, Wraps, Biryanis, Idlis & Samosas!

And savor every weekend

Sabudana Vada, Pav Bhaji, Ragda Pattice and Tava Pulav

at our mirchi@indibite Chaat Corner

Contact:

For Chaat menu orders: mirchi@indibite.com

For regular indibite menu: orders@indibite.com

Sonal JEWELRIES

.....You are special

May the festival of lights brighten up your life with success, prosperity and happiness.

HAPPY DIWALI

Sonal Jewelries
22Kt Gold,Silver Pooja Articles & Coins (Silver and Gold).
OnegmJewelry
Intergem Vendor, Costume Jewelry

www.sonaljewelries.com
www.facebook.com/sonaljewelries
Ph: 425-830-2263

One gm JEWELRY

.....You are special

सारथी २०१२

# सियॅटल महाराष्ट्र मंडळ











सारथी २०१२

# कोजागिरी






# दांडिया














सारथी २०१२



## सियॅटलला हिमवर्षाव झाला

**(क्वचित येणाऱ्या हिमाला अभिवादन)**

*अनु आमलेकर*

नोव्हेंबर गेला, डिसेंबर गेला, जानेवारीही अर्धा गेला
तेव्हा कुठे येतो येतो म्हणता म्हणता हा आला
सियॅटल मध्ये एकदाचा हिमवर्षाव झाला

सगळ्या गाफील लोकांना वाटले हाही हिवाळा पार पडला
संक्रांतीचा मुहूर्त साधून ह्याने भ्रमाचा भोपळा फोडला
गेल्या दिवसांचा एकदमच वचपा काढला
सियॅटल मध्ये अचानक हिमवर्षाव झाला

सियॅटलला सवय रिमझिम पावसाची, अधूनमधून येणाऱ्या वाऱ्या वादळाची
काळोख्या रात्रींची अन सुन्न ओल्या रस्त्यांची
छत्र्यांनी केलेल्या लगबगीची, निष्पर्ण फांद्यांच्या रिपरिपण्याची
अचानक आसमंत उजळून गेला
सियॅटलला सुंदरसा हिमवर्षाव झाला

टेकड्यांची झाली मस्त घसरगुंडी, सगळ्यांची उडाली एकदम घाबरगुंडी
सरळ वळणाच्या गाड्यांचे देखील पाय घसरले
आणि राजरस्त्यांचे रणांगण झाले
जाऊ नये त्यांचा तोल गेला बसू नये इतके झटके बसले
पाहू नये व ऐकू नये ते घडले नको ते सर्वांना कळले
नाकासमोर पाहून ताठ मानेने चालणारे खाली मान घालून जपून चालू लागले
संक्रांतीचा असा खरा तडाखा बसला
सियॅटलला जेव्हा लोकहो हिमवर्षाव झाला

ईशान्येच्या परिचितांनी नाक मुरडले
एवढ्याशा बर्फाचे काय कौतुक म्हणून उडवून लावले
दक्षिणेतले मित्र मात्र घाबरून गेले, फोन करकरून भंडावून सोडले
आम्हाला काय आम्ही पण गाजावाजा केला
सियॅटलला खरच खूप हिमवर्षाव झाला

शाळेला सुट्टी म्हणून सगळी मुले आनंदली
मोठ्यांनाही ऑफिसला बुट्टी मारावी लागली
विमानांनी धावपट्टी मुळीच नाही सोडली
प्रवाशांनी मग मिळेल तिथेच बैठक मारली
सगळ्यांची अतोनात तारांबळ उडाली
सर्वत्र याने धुमाकूळ घालून सर्व कारभार ठप्प केला
सियॅटलमध्ये पहा कसा हिमवर्षाव झाला

सायंकाळी संक्रांतीचे साज उलगडत गेले
निष्पर्ण झाडे हलव्यांच्या दागिन्यांनी नटली
रस्ते आणि पदपथावर शुभ्र रांगोळी घातली
घरे पांढरी शाल पांघरून सजली, रात्र सारी अभ्रकाने चमचमली
प्रेमी युगुलांनी बर्फात आपली नावे रेखाटली
सौंदर्याचे वाण लुटवत हा आला
सियॅटलला खुलवणारा हिमवर्षाव झाला

अशी विविध रूपे घेऊन आलेला हा पाहुणा चार दिवसात कंटाळला
नेमेची येणारा पाउसही परत आला आणि पाहता पाहता हा नाहीसा झाला
सियॅटलच्या हिमवर्षावाचा असा शेवट झाला



**आख्यायिका**

***श्री. भालचंद्र भोपटकर***

(१) कोणतेही नवीन काम हाती घ्यायला वयाचे बंधन नाही ! पंडित माधवराव सातवळेकर ( राहणार वाई, एकूण आयुष्य १०५ वर्षे ) यांना वयाच्या शंभरीतही बाल-वाङ्मय लिहिण्याचा उत्साह होता. त्यांनी वयाची शंभरी पूर्ण केली म्हणून त्यांना भेटण्यासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे, त्यांच्या घरी वाई (जि.सातारा)- येथे गेले. घरामध्ये पंडित सातवळेकर हे एका टेबलाजवळ उभे राहून हातामध्ये त्यांच्या लिखाणाची छापील प्रुफे तपाशित होते. ते पु. ल. देशपांडे ह्यांना म्हणाले, “ पुरुषोत्तमा, तू बैस. माझ्या हातातील ही प्रुफे तपासून झाली की नंतर मी तुझ्याशी बोलेन.”

सुमारे अर्ध्या तासानंतर, पंडित सातवळेकर हे खाली खुर्चीवर बसले आणि म्हणाले, “पुरुषोत्तमा, आत्तापर्यंत मी वेद-वाङ्मयावर लिखाण केले. आता बाल-वाङ्मयावर लिखाण करण्याची माझी इच्छा आहे. ह्या लिखाणाला आणखी ७/८ वर्षे लागतील. तू बाल-गोपाळांच्या सान्निध्यात असतोस म्हणून मला तुझी मदत हवी आहे. त्यावर, पु.ल. देशपांडे मनात म्हणाले, “ शंभरीवयातही केवढा हा उत्साह! अजून ७/८ वर्षे जगण्याचा आणि बालवाङ्मयावर लिहिण्याचा त्यांचा मानस आहे. “

पंडित माधवराव सातवळेकर ह्यांचे त्यांच्या वयाच्या १०५ व्या वर्षी वाई इथे निधन झाले

(२) माणुसकी ही सर्वात मोठी

मुंबईतील सायन हॉस्पिटलच्या डीन डॉ. स्नेहलता देशमुख बालरोग-चिकित्सा व शल्यविशारद ( Pediatric Surgeon ) आहेत . (लहान बाळावर शस्त्रक्रिया करणा-या डॉक्टर.)

१९८० ह्या वर्षी श्री गणेशचतुर्थीचा दिवस होता, आणि सकाळी १० वाजण्याची वेळ होती. मुंबईच्या उपनगरात विलेपार्ले येथे राहणाऱ्या सायन हॉस्पिटलप्रमुख डीन डॉ. स्नेहलता देशमुख आणि डॉ. श्यामराव देशमुख ह्यांच्या घरी श्री गणपतीची पूजा करण्याची तयारी चालू होती. तेवढयात त्या घरामध्ये टेलीफोन वाजला आणि पलीकडून आवाज आला की डॉ. स्नेहलताबाईना urgent telephone call आहे. त्यांच्या असिस्टंट डॉक्टरांनी सांगितले की परगावी राहणारा एक माणूस सहा महिन्यांचे बाळ - मुलगा - घेऊन हॉस्पिटलमध्ये आला आहे, आणि त्या बाळावर तत्काळ शस्त्रक्रिया (operation) करण्याची जरुरी आहे.त्यावर पतिराज डॉ. श्यामराव देशमुख म्हणाले, “ स्नेहलता, तू शस्त्रक्रियेसाठी सायन हॉस्पिटल येथे ताबडतोब जा. श्री गणपतीची पूजा मी एकट्याने करेन. “

ताबडतोब मोटारगाडीने डॉ. स्नेहलता देशमुख सायन हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्या आणि त्या सहा महिन्यांच्या मुलावर, ५/६ तास खर्च करून त्यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली. त्या दिवशी दुपारी ४ वाजता त्या घरी परत आल्या. त्यावेळी घरची सर्व मंडळी पूजा करून उकडीचे मोदक खाऊन, स्वस्थ गाढ निजली होती. डॉ. स्नेहलताबाईनी, श्री गणपतीला नमस्कार केला आणि त्यांनी मोदक पुन्हा गरम करून प्रसाद घेतला.

सुमारे २१ वर्षानंतर, २००१ ह्यावर्षी, नाशिक येथून एक टेलिफोन आला की डॉ. स्नेहलताबाईना एका ‘five-star’ हॉटेलचे उद्घाटन करण्याचे आग्रहाचे आमंत्रण आहे.

सारथी २०१२

उद्घाटनाचे आमंत्रण आहे. त्यांनी टेलिफोनवरून उत्तर दिले की " माझा व्यवसाय डॉक्टरचा आहे. म्हणून मेडीकलविषयी काही अडचण असेल तर सांगा". परंतु, टेलिफोनवरून त्यांना परत परत आग्रहाची विनंती केल्यानंतर, त्या नाशिक येथे हॉटेल उद्घाटनासाठी जाण्यास तयार झाल्या.

नाशिक येथे गेल्यावर त्या हॉटेल मालकाने डॉ. स्नेहलताबाईना सांगितले "२१ वर्षांपूवी ज्या सहा-महिन्यांच्या मुलाचे तुम्ही ऑपरेशन केले, तोच मी येथे जिवंत असलेला एक हॉटेल मालक आहे. तुम्ही मला तेव्हा जीवदान दिले, म्हणून आता मी ह्या हॉटेलचा मालक होऊ शकलो. "

हॉटेलचे उद्घाटन करताना, डॉ. स्नेहलाताबाई, हॉटेल मालक आणि उपस्थित मंडळी, ह्या सर्वांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. ही खरी माणुसकी आहे.





**उपरतीचा क्षण**

***अरुण निसरगंड***

पडल्या पडल्या विंदा कालचे भाषण मनात घोळवत होता.

"... ब्यूट मॉन्टॅनामध्ये डीप मायनिंग केलेल्या एका जुन्या खाणीचे मोठे तळे झाले आहे. मैलभर खोल आहे. चार-पाच स्क्वेअर मैल. खाणीतले तांबे संपले आहे. खाण कधीच बंद पडली आहे. पण आता जमिनीतले पाणी वर यायला लागून खाण भरायला लागली आहे. दहा-बारा वर्षात ती ओव्हरफ्लो व्हायला लागली की खाणीत सर्रास वापरलेल्या अर्सेनिकमुळे विषारी झालेले ते पाणी पसरून पॅसिफिक नॉर्थवेस्ट मधल्या सगळ्या नद्या पोल्यूट होतील. त्यातल्या सॅमन माशांचा, ते पाणी दिलेल्या पिकांचा सत्यानाश होईल.

आपल्या कोलंबिया रिव्हरमधे शंभर वर्षांपूर्वी इतके सॅमन मासे असायचे की अमेरिकन इंडियन्स नदीत नुसता हात घालून सॅमन पकडायचे.

तेवढ्यात त्याचे लक्ष दारातून डोकावणाऱ्या नंदाकडे गेले होते. मान थोडीशी हलवून "आता आटपा " अशी तिने डोळ्यांनी केलेली खूण बघून त्याने भाषण संपवत आणले होते.

"मनुष्य प्राण्याला जर जगाचा नाश करायचा नसेल तर आपणा सर्वांना निसर्गाची, प्राणीमात्रांची काळजी घ्यायला हवी. आपल्या रामायणात, सीताहरणाने शोकाकुल झालेल्या रामाने रानातल्या पक्ष्यांना, झाडांना 'माझी सीता दिसली का?' असे विचारलेले आहे. रामाला ते सर्व मनुष्य प्राण्यासारखे सजीवच होते. आडवा येतो म्हणून समुद्राला अस्त्र मारून कोरडे करायला निघालेल्या रामाने, सागराच्या 'माझे काहीही होवो पण माझ्या पाण्यात राहणाऱ्या प्राणीजातीचे काय?', अशा प्रार्थनेला मान देऊन सेतू बांधायचे ठरवले. तोच आदर्श आपण ठेवायला हवा. तशीच उपरती आपल्याला व्हायला हवी.

Otherwise my friends, The end is near!"

प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या. प्रेक्षक म्हणजे महाराष्ट्र मंडळातली नेहमीचीच मंडळी होती. ओळखीची. त्यांना टाळ्या वाजवणे भाग होते. तरीपण कालच्या टाळ्या उत्स्फूर्त वाटल्या.

ब्लाइंड्स वर केल्याचा आवाज आल्यावर त्याने डोळे उघडले.

"ए मुली, इकडे ये. Listen to this." त्याने नंदाला जवळ बोलावले.

"थांब जरा आता. चहा हवा म्हणालास ना? चौथा का पाचवा हा? अजून दुपारचे बारा सुध्दा नाही वाजले." खाली जाता जाता ती म्हणाली.

"सिऍटल टाईम्स" चाळत तो ती वर यायची वाट बघत बसला.

हातात ट्रे घेऊन ती वर आली. ट्रे मधे दोन कप बघून त्याला बरे वाटले. दोन कप म्हणजे ती जवळ बसून चहा घेणार होती. लाल नाईट गाऊन तिच्या अंगाला चिकटत होता. गोरे दंड आणि बराचसा गळा दिसत होता.

"हूं...." तिच्याकडे टक लावून बघत त्याने आवाज केला.

"काय बघतोयस? कालच झालय सगळं साग्रसंगीत. आता काही नाही हं." तिने दटावले.

"धर जरा" हातातला कप त्याच्याजवळ देऊन दोघांच्या पायांवरचे ब्लँकेट नीट करून वर सरकून बसत ती म्हणाली, "दिवस असाच आळस करत वाया घालवणार आहेस का?"

"तू जवळ असल्यावर दिवस वाया कसा काय जाणार?" जवळ सरकून लगट करत तो म्हणाला. "ही बातमी ऐक".

"बातमी बितमी काही नसेल. नेहेमीसारखाच काही तरी पांचटपणा असणार."

"हे बघ टाईम्समधे पोलीस ब्लॉटरमधे काय आहे."

"काहीतरी चावटपणा असणार झाले. नाहीतर तुझे लक्ष जाईलच कसे तिकडे?" ती म्हणाली.

"ऐक मुकाट्याने" त्याने सुरुवात केली.

Friday: A Snoqualmie City police officer discovered a young couple making love on the grass at the base of the Snoqualmie Falls. The officer reminded them that they were on a private property owned by the local power generation company. The man apologized and said that they didn't know that. The man and the woman then put their clothes on and left."

"Only in America!" त्याने बातमी संपवत कॉमेंटरी केली. अशी प्रगती भारतात कधी होणे तरी शक्य आहे का? This is what makes America great." त्याने चिडवले आणि तो आणखी जवळ सरकला.

"लांब सरक बरे. अंगचटीला नाही यायचे सारखे सारखे. उगीच भटाला दिली ओसरी नको. Not unless you mean business."

हरिदासाची कथा मूळ पदावर यायला सुरुवात झाली होती.

"...एवढी वर्षे झाली लग्नाला... सगळे विचारत असतात... अजून मुले कशी नाहीत...."कालचे भाषण विसरलीस वाटते?" त्याने आर्ग्युमेंटची तयारी केली. आधी बऱ्याच वेळा ही चर्चा करुन झाली होती. "शाळा कॉलेजचे सोड. पण इतर किती प्रॉब्लेम्स आहेत. क्राईम, ड्रग्ज, इन्फ्लेशन, रिसेशन, डिप्रेशन. पुन्हा मुलांची कटकट सुरु झाली की कुठे जाणे नाही कुठे येणे नाही. साधी पिक्चरला जायची मारामार. आहे ते फ्रीडम सोडून उगीच नसत्या जबाबदाऱ्या कशाला? कालचे माझे ऐकायला होतीस कुठे तू? बाहेर लॉबीत काय करत होतीस?"

"सगळी पोरे मागे लागली होती. मावशी मावशी करत. देशमुखाची प्राची बघितलीस? इतकी क्यूट दिसते .." खिडकीतून बाहेर लांब बघत ती म्हणाली.

"चल शॉपिंगला जायचेय?" त्याने विषय बदलला.

शॉपिंग म्हणल्यावर तिची कळी खुलली.

"स्नोक्वाल्मीला आऊटलेट मॉल मधे जायचे?"

"Snoqualmie Falls लाही जाऊ. बऱ्याच दिवसात गेलो नाही आपण." आऊटलेट मॉल ऐकल्यावर उतरलेला त्याचा चेहरा बघून तिने आमिष दाखवले.

"Now you are talking."

"मग ऊठ आता. मी तयार होते."

तासाभराने त्याला जाग आली तेव्हा ती कपडे करून तयार झाली होती.

"अगदी अमेरिकन झाली आहेस आज." त्याने विचारले. गुडघ्यांच्या थोडा वर येणारा स्कर्ट आणि मॅचिंग टॉपमधे ती सुरेख दिसत होती. केस पोनीटेलमधे बांधून, हातात पर्स आणि गॉगल घातल्यावर मॉडेल म्हणून कुठेही खपली असती.

"भाषण चांगले झाले काल. बऱ्याच जणी म्हणाल्या" तिने कबूल केले. "पण त्यांना न आवडायला काय झाले. सगळ्यांची मुले आता मोठी होऊन शाळेत पण जायला लागली...."

"But what about more pollution.." त्याने सुरुवात करायच्या आधीच हात उगारून तिने त्याला गप्प केले.

"तुझी एक गोष्ट मात्र मला पटत नाही. पोल्यूशन कमी करायला हवे हे खरे. But nature can cope. Comets have come and destroyed the life on earth before. But we have oil and gas because of the same comets. Ice ages have had cataclysmic effects. But every ice age has rejuvenated life. Man creates problems. But he solves them too. If there are no children, who is going to clean up the problems created by the previous generations? Where would we be if Alexander Bell or Marconi or Lata Mangeshkar were never born?

Malthusian Economics, Population Bomb, Limits to Growth यांची उदाहरणे तू काल भाषणात देत होतास. पण आपले चौधरी सर काय सांगायचे ते विसरलास वाटते? When a child is born, it doesn't just bring one mouth in this world. It also brings two hands. माल्थस् चे म्हणणे जर बरोबर असते तर सध्याची चार बिलियन पॉप्युलेशन शक्यच नव्हती. भुकेनी ती नष्टच व्हायला हवी होती. अन्नासाठी महायुद्धे व्हायला हवी होती. तसे काहीच झाले नाही."

"अजून तरी.." त्याने शंका काढली. "आणि चौधरी सर असे काही म्हणल्याचे मला तरी आठवत नाही."

"कसे आठवणार? लक्ष होते का कधी वर्गात? सारखा माझ्याकडे टक लावून बघत बसायचास. मैत्रिणी किती चिडवायच्या मला" तिने जुनी तक्रार केली.

"उगीच सुखद गैरसमज करून घेऊ नकोस. टक लावून बघायला दुसऱ्या कुणी नव्हत्या का आपल्या क्लासमधे? चुकून कधी तरी तुझ्या पाठीकडे आणि मानेकडे कदाचित बघितले असेल तेवढेच." गाडी Snoqualmie Falls च्या पार्किंग लॉट मधे पार्क करत तो म्हणाला.

रमत गमत, दोन्ही बाजूंच्या झाडीकडे बघत, वाकून फुलझाडांच्या नावांच्या छोट्या पाट्या वाचत, हातात हात धरून घसट करत ते खाली फॉल्स पर्यंत येऊन पोहोचले.

धबधबा दिसत नव्हता तरी त्याच्या पाण्याचा गडगडाटासारखा आवाज होता. भीमसेन जोश्यांनी लावलेल्या संथ खर्जाची आठवण करून देत होता.

"DANGER Private Property" साईनकडे दुर्लक्ष करुन लहानशा कुंपणासारख्या बांधावरुन उड्या टाकून ते दोघे फॉल्सच्या पायथ्यापाशी गेले. एकदम त्यांच्या नजरेत पांढऱ्या शुभ्र पाण्याचा स्त्रोत आला. संथ गडगडाट करत होता. पाण्याच्या थेंबांच्या फवाऱ्यात मोठे इंद्रधनुष्य दिसत होते.

"Isn't it beautiful!" दोघे एकदमच म्हणाले.

तिने खडकांच्या पलिकडे लॉनवर ब्लँकेट पसरले. व दोघे धबधब्याकडे बघत बसले. थोड्या वेळाने तिने पिकनिक बास्केटमधून पेपर प्लेट्स आणि पेपर नॅपकिन्स काढले. चटणी सँडविचेस, बटाटे वडे आणि कोफ्त्यांची प्लेट

त्याच्या हातात दिली.

"हे सगळे कधी केलेस तू?" त्याने विचारले.

"तू झोपा काढत होतास दुपारी. तेव्हा."

"You are the best, Babe." खूष होऊन तो म्हणाला..

खाऊन झाल्यावर फोमच्या कपात थर्मासमधला चहा ओतून ते धबधब्याकडे बघत बसले. त्याचा संथ आवाज ऐकत. त्याच्या थेंबांचा हलका पाऊस अंगावर घेत.

"Ready to go back?" त्याने विचारले. "It's almost seven."

तिने वापरलेल्या प्लेट्स आणि कप प्लास्टिकच्या बॅगेत भरायला सुरुवात केली. "Recycle! Remember?" त्याला नाक मुरुडून जीभ काढून वाकडे दाखवत ती गमतीने म्हणाली.

"थांबू या जरा अजून. एकदा थंडी सुरु झाली की येता येणार नाही." वाऱ्याने विस्कटलेले ब्लँकेट नीट करत ती म्हणाली.

एकमेकांना चिकटून ते इंद्रधनुष्य बघत बसले. तो धबधबा आणि त्याचे ते संगीत हजारो वर्षे घुमत होते. आणि आणखी हजारो वर्षे घुमणार होते. मागचे आईस एज् जेव्हा संपले तेव्हा बर्फ वितळायला सुरुवात झाल्यावर हा स्नोक्वाल्मी फॉल्स तयार झाला. जवळ जवळ बारा हजार वर्षापूर्वी. पुन्हा हिमयुग आले तरी त्याला आणखी दहा हजार वर्षे लागणार. म्हणजे हे संगीत आणखी दहा हजार वर्षे चालूच राहणार. मनुष्याने काही केले, न केले तरी काय फरक पडणार आहे? पृथ्वीवरच्या ऊष्ण आणि हिमयुगांचा सूर्यावरच्या डागांशी संबध आहे असे म्हणतात. अकरा-साडे अकरा हजार वर्षांचे ते अर्धचक्र आहे. हिमयुगांच्या चक्रासारखेच. डायनॉसॉर पृथ्वीवरून नष्ट झाले. पण पृथ्वी काही ओस पडली नाही. नवीन जीवांनी, प्राणीमात्रांनी त्यांची जागा घेतली. माउंट सैंट हेलन्सच्या लाव्हाच्या राखेतून वर येणा-या अंकुरासारखे जग पुन्हा जगले. There were no answers. Just more questions.

डोके गरगरायला लागले म्हणून त्याने विचार करणे थांबवले आणि तिला जवळ ओढून घेतले. बराच वेळ ते दोघे एकमेकांना मिठीत घेऊन बसून राहिले. डोळे मिटून. धबधब्याचा आवाज ऐकत. ती हळू हळू सरकत ब्लँकेटवर आडवी झाली.


त्याला जवळ ओढून घेतले व त्याची आवेगाने चुंबने घ्यायला सुरुवात केली. लग्नाला इतकी वर्ष झाली होती तरी फ्लॅट पोट, बारीक कंबर, गोरे पाय. विस्कटलेले वाऱ्यात भुरु भुरु उडणारे केस. डोळ्यांवरचा मोठ्या फ्रेमचा गॉगल.

अजूनही ती मॉडेल सारखी दिसत होती. कॉलेजात पहिल्यांदा बघितल्यावर ती लगेच का मनात भरली होती याची पुन्हा आठवण करून देत होती.

प्रतिकार न करता तोही तिच्या शेजारी आडवा झाला. एकमेकांच्या मिठीत ते दोघे पडून राहिले. विवेक होता, तो पर्यंत. दम धरवत होता, तो पर्यंत.

त्या दोघांच्या मागे धबधब्याचे संगीत सुरु होते. आणि सुरुच राहणार होते. अनंतापर्यंत. Until the ice-age descended again. Slowly. Ever so slowly. But surely! त्या संगीतात त्यांच्या वर खाली होणाऱ्या शरिरांच्या संथ लयीचे ताल मिसळून गेले. त्याला साथ होती "नंदा..विंदा.. नंदा..विंदा.. नंदा..विंदा.." च्या त्यांच्या द्वंद्व गीताची. श्वासांची. छातीच्या ठोक्यांच्या द्रुतगती आरोहाची. आणि रुजू पाहणाऱ्या अंकुराच्या स्पंदनाची.

सारथी २०१२


mayuri
INDIAN CUISINE
BELLEVUE 425-641-4442
BOTHELL 425-481-6900
mayuri
FOODS
REDMOND 425-861-3800
BOTHELL 425-483-3000
ISSAQUAH 425-313-1983
mayuri
VIDEO
REDMOND 425-881-6925
mayuri
CHAT & SWEETS
REDMOND 425-881-6284
mayuri
BAKERY
REDMOND 425-881-6284
mayuri
TRAVEL
REDMOND 425-881-4202
mayuri
GIFTS
REDMOND 425-881-6925
mayuri
FAMILY
OF
BUSINESSES
THANK-YOU FOR
YOUR CONTINUOUS
PATRONAGE TO
OUR FAMILY OF
BUSINESSES
2560 152ND Ave. NE, Suite G - Redmond, WA 98052



## आमचे कलापूर्ण सियॅटल

*अनु आमलेकर*

(दर महिन्याला प्रकाशित होण्याऱ्या बृहन महाराष्ट्र वृत्तात "जावे त्याच्या गावा" असे एक सदर असते. त्या सदरात एकेका गावाची )शहराची) आणि त्यातील लोकांची माहिती तेथील मराठी मंडळ व त्यांच्या तर्फे इतर लोक लिहून पाठवतात. एप्रिल महिन्याच्या अंकात ह्या सदरांतर्गत "सियॅटल" ची निवड झाली होती. त्या संदर्भात लिहिलेला माझा हा लेख आणि कविता प्रकाशित झाली आहेत." सारथी" मध्ये आता पुनःप्रकाशित होत आहेत.)

बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या वाचकांना सियॅटलच्या निसर्गसौंदर्याची, सियॅटलच्या मराठी मंडळाची व त्याच्याशी संलग्न बहुगुणी कलाकारांची ओळख व माहिती झाली आहे. मी सियॅटलचे एक वेगळे रूप दाखवणार आहे. हे रूप मला अतिशय प्रिय आहे. मला आशा आहे कि हा लेख वाचल्यावर तुम्हालाही आवडेल. मी प्रामुख्याने फक्त सियॅटल डाउनटाउन मध्ये अनुभवलेल्या कलागुणांनबद्दल लिहिणार आहे तरीही शब्द, पाने व वेळ अपुरा पडणार आहे. आम्ही सियॅटल डाउनटाउन मध्ये राहयला काय आलो जणू काही अलिबाबाची गुहाच आमच्याकरता उघडली. नैसर्गिक सौंदर्य तर अवर्णनीय आहेच पण मला खरी खाण सापडली ती साहित्य, नाट्य, संगीत, नृत्य, चित्रकला, ललितकला ह्या वर्णनातीत धनाची. ही सगळी हिरे माणके मला एकाच जागी मिळाली. याआधी पण आम्ही मोठ्या शहरांमध्ये/ शहरांजवळ राहिलो होतो. उदा: ऑटोवा-कॅनडा; चॅण्डलर-ॲरीझोना; आणि व्हर्जिनिया-वाशिंग्टन. पण राहण्याची जागा व त्याच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या सोयी लक्षात घेता जे इथे शक्य झाले ते इतरत्र होऊ शकत नव्हते. सियॅटल डाउनटाउन सर्व शहरांचा मुकुट ठरले तर सियॅटल सेंटर हे मुकुटमणी आहे.

सियॅटल डाउनटाउन मध्ये जिथे आम्ही राहतो तिथून अर्ध्या तासाच्या आत आम्ही सर्व ऐच्छिक स्थळांना पायी पोचू शकतो. अमेरिकेत जी शहरे पायी चालण्याकरिता अत्यंत सोयीस्कर व सुखकर समजली जातात त्यात सियॅटलचा सहावा क्रमांक आहे. ह्या चालण्याच्या अंतरावर सद्ध्या पन्नास/साठ कलाविथी (आर्ट गॅलरीज), पस्तीस ते चाळीस लहान मोठी नाट्यगृहे/ कलागृहे, ४-५ खुली रंगमंदिरे (ओपन एयर थियेटर), ४-५ अतिभव्य क्रीडागारे (स्टेडीअम/ अरीनाज), सुप्रसिद्ध बेनारोया हॉल व इतर प्रेक्षागारे, प्रचंड बॅले आणि ऑपेरा प्रेक्षागृह आणि सार्वजनिक सभागृहे जेथे संगीताचे, वादनाचे, नृत्याचे, भाषणाचे, आणि अनेक कार्यक्रम केल्या जातात. केवळ आंतरराष्ट्रीय चित्रपटांकरिता बांधलेली चित्रपटगृहे आहेत. पॉल ॲलनच्या EMP Museum (formerly known as Experience Music Project and Science Fiction Museum and Hall of Fame or EMP|SFM) मध्ये मनोरंजक रॉक ॲण्ड रोल व पॉप देखावे आणि ऐकायला रंगतदार नाद आणि कॉनसर्ट्स आहेत आणि रॉक ॲण्ड रोल व पॉप संगीताचे कार्यक्रमही होतात. सियॅटलची कलासंग्रहालये(आर्ट म्युझियमस) आणि इतर संग्रहालये, बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन झाले ती भव्य जागा, अनेक चित्रपटगृहे, उत्सवांचे मैदान आणि पाण्यातले खेळ होतात त्या सर्व जागा आहेत. ह्यातली बरीचशी ठिकाणे सियॅटल सेंटरच्या परिसरात आहेत. ह्या वर्षी सियॅटल

सेंटरला आणि स्पेसनीडलला पन्नास वर्षे पूर्ण झाली आणि त्या  निमित्ताने बरीच नवी प्रदर्शने भरवण्यात आली. सहा महिने अगदी भरगच्च कार्यक्रम होते.

इथे एक गोष्ट ही लक्षात घेतली पाहिजे कि सियॅटल अमेरिकेतील इतर मोठ्या आणि प्रसिद्ध शहरांशी तुलना करता क्षेत्रफळात ११७वे आणि लोकसंख्येत फक्त २३वे आहे पण साहित्य आणि कला या बाबतीत मात्र याचा क्रमांक फार वरचा - ६/७ वा आहे आहे. सियॅटलने बरीच वर्षे संपूर्ण अमेरिकेत सर्वात उच्चशिक्षित म्हणून प्रथम क्रमांक पटकावला होता व अजूनही सातत्याने सियॅटलची सर्वोच्च तीन शहरात गणना होते. (आम्ही तर सुशिक्षितही म्हणू!) येथे सर्वात जास्त पुस्तकांची दुकाने आणि पुस्तक विक्रेते आहेत. दूरदर्शन वरील “जेपरडीचा” सर्वात मोठा विजेता,”केन जेनिंग्ज, साहजिकच सियॅटलमध्ये आहे. इथले "एलीयेट बे बुक कंपनी" इतके प्रसिद्ध आहे कि नुसते अमेरिकेतलेच काय पण आंतरराष्ट्रीय कीर्तीचे लेखक/कवी तिथे पुस्तक वाचनाकरिता हजेरी लाऊन जातात हे आमचे फारच मोठे भाग्य आहे. तेथे जवळजवळ रोज एक पुस्तक वाचन असते व शनिवार-रविवारी दोन असतात. इथेच आम्ही इतर भारतीय लेखकांमध्ये “नरेंद्र जाधवांचे” इंग्रजी पुस्तकवाचन ऐकले व त्यांना २००२ नंतर परत एकदा भेटलो. वाईट वाटले कि मराठी बांधव भेटले नाही.  आतापर्यंत काही स्थानिक अनिवासी-भारतीय लेखक-लेखिकांचे पुस्तकवाचन ऐकले पण अजूनतरी मराठी नावाचे ऐकायचे योग आले नाही. लवकरच येतील अशी आशा वाटते. इतर ठिकाणी व इतर बऱ्याच दुकानांतही पुस्तकवाचन असते. अलीकडे काही भारतीय/ मराठी पुस्तक विक्रेत्यांची नावेही कानावर आली आहेत. इथले अद्ययावत सार्वजनिक वाचनालय वास्तुशास्त्राचा देखणा नमुना तर आहेच पण दररोज (२००४ मध्ये उघडल्या पासून) साधारणपणे हजारोंनी लोक आल्याची नोंद आहे. अमेरिकेतल्या सर्वोच्च दहा वाचनालयात याची गणना होते. येथे पुस्तकवाचनाबरोबर अनेक सांस्कृतिक कार्यक्रमही होतात. इतर काही संस्थांमध्ये निवासी लेखक आहेत व ते एकत्रित वाचनाचे व काव्य गायनाचे कार्यक्रम करतात.

सियॅटल काचेच्या कलाकृतींबद्दल अतिशय प्रसिद्ध आहे. “डेल चीहुली” ह्या जगविख्यात, अत्यंत कुशल, एकाक्षी काच-कलाकाराच्या कलाकृती सियॅटल मध्ये आणि जगभर प्रदर्शित केलेल्या आहेत.  त्यांची येथे शाळा व कलागृहे (स्टुडीओज) आहेत.  ह्या वर्षी सियॅटल सेंटरमध्ये त्यांच्या कलाकृतीन्करिता भव्य दालने व बाग बांधण्यात आली आहेत हे प्रदर्शन सध्या फार मोठे आकर्षण ठरले आहे. सियॅटल पॉटरी करताही प्रसिद्ध आहे. नॉर्थवेस्ट पॉटरीला खूप मागणी असते. दर महिन्याच्या पहिल्या गुरुवारचा पन्नास/साठ कलाविथिंचा (आर्ट गॅलरीजचा) "**Art Walk**" अतिशय लोकप्रिय आहे. सियॅटलने अमेरीकेला ह्याचा परिचय करून दिला. पहिला "**Art Walk**"  पायोनीर स्क्वेयर येथे १९८१ मध्ये सुरु झाला आणि वणव्यासारखा अमेरिकाभर पसरला. आमचा पहिला **Art Walk** आम्ही Scottsdale,AZ येथे १९९७त अनुभवला आणि अगदी प्रेमात पडलो. त्यानंतर शोधून शोधून सगळी कलासंग्रहालये व प्रदर्शने पालथी घालण्याचा सतत प्रयत्न सुरु आहे. बहुतेक सगळ्या कलाविथी (आर्ट गॅलरीज) सायंकाळी स्वागत समारंभ ठेवतात. बहुधा नवीन प्रदर्शनाचे/ दालनाचे उद्घाटन होते. कलाकार स्वत: उपस्थित राहून येणाऱ्या जाण्याऱ्या लोकांना भेटतात.

स्थानिक कलाकार ज्यांचे स्थ्यायी संग्रहालय नसते ते पटांगणात तंबू टाकून प्रदर्शन मांडतात (हो! अगदी पाऊस असला तरी!) ह्या कलाकृतीत चित्र/रंगकला, शिल्पकला, छायाचित्रे, हस्तकला, कांचकला, दागिने, कपडे, असे विविध प्रकार असतात. खूप गर्दी होते. एरवी सगळ्या कलाविथी सायंकाळी उघड्या नसतात. याच गुरुवारी सगळी संग्रहालयेसुद्धा संध्याकाळी उशिरापर्यंत उघडी असतात व प्रवेश बहुधा विनामूल्य असतो. हे डाउनटाउन बाहेरच्या संग्रहालयांनाही लागू होते. आजकाल भारतीय नावे **व अधूनमधून मराठी कलाकारांची नावेही** चमकायला लागली आहेत ही फार अभिमानाची गोष्ट आहे. मध्यंतरी आर्थिक मंदीच्या काळात काही दुकाने बंद पडली होती पण आता “अॅमॅझॉन” कंपनीने आपली कार्यालये वाढवायला सुरुवात केल्यापासून त्यांच्या आसपास बऱ्याच नवीन Art Galleries उघडत आहेत. सियॅटलला आल्या आल्या आम्ही जेंव्हा सियॅटल आर्ट म्युझियम चे सदस्य होऊन तिथे गेलो मध्ये गेलो तेंव्हा समोर आम्हाला अॅमॅझॉनचे "जेफ बेझोस" भेटले व छान बोलले. तेही नवीन प्रदर्शन पाहयला आले होते. इथे कलाप्रिय लोकांची कमी नाही.

शंभर वर्षे पूर्ण केलेल्या सियॅटल सिंफनी ऑर्केस्ट्राचे संपूर्ण जगात सर्वात जास्त ध्वनिमुद्रणे (रेकॉर्डींग्ज) आहेत आणि मुख्यत: त्यांचा कार्यक्रम अप्रतिम अशा बेनारोया हॉल या जागीच होतो. आनंदाची गोष्ट ही आहे कि त्याला लहान-मोठे सर्वांची खूप गर्दी असते. तिथे बसून तो कार्यक्रम वा त्या वास्तूतच प्रतिष्ठापित असलेल्या ऑर्गनचे वादन ऐकण्याचा अनुभव स्वर्गीय आहे. सियॅटल सिंफनी ऑर्केस्ट्रा बरेचदा विनामूल्य वा कमी दराचे कार्यक्रम करतात. ऑर्गन वादन तर बहुतांशी विनामूल्य असते व त्या स्थळाच्या टूर बरोबर ऐकायला मिळते. सियॅटल चेम्बर म्युझिक सोसायटी उन्हाळ्यात व हिवाळ्यात दोन उत्सव करतात. ते मुख्य कार्यक्रमा आधी विनामूल्य ओपन कॉनसर्ट करतात. सियॅटल यूथ सिंफनी सियॅटल ऑर्केस्ट्रास ही अमेरिकेतील सर्वात मोठी संस्था आहे. त्याचप्रमाणे पॅसिफिक नॅशनल बॅले शाळा जी १९७४ मध्ये सुरु झाली तिचा क्रमांक पूर्ण अमेरिकेत पहिल्या तिनात लागतो. सियॅटल ऑपेरा आणि पॅसिफिक नॅशनल बॅले यांचे कार्यक्रम मॅक्कॉ हॉल (ज्याची बांधणी२००३मध्ये संपली)या भव्य प्रेक्षागारात होतात. इतर जागा म्हणजे आसपासची सुंदर मोठमोठी चर्चेस जिथे शास्त्रीय गायन वादनाचे कार्यक्रम होतात. सियॅटलचे कलाभंडार नृत्य संगीताने शिगोशिग भरले आहे.

अनेक नाट्यगृहांपैकी ३-४ ठिकाणी संगीत नाटके होतात. काही नाटके स्थानिक असतात आणि काही ब्रॉडवे व इतर मोठ्या शहरातून येतात. इथे पहिल्यांदा प्रयोग झालेल्या काही संगीतिकांना ब्रॉडवे वर"टोनी"पुरस्कार मिळाल्या नंतर बऱ्याच नाटककारांनी येथे संगीत नाटके बसवून ब्रॉडवे वर नाटके न्यायचा पायंडा पाडला आहे. काही नाट्यगृहे केवळ शीघ्ररचित किंवा उभ्या-उभ्या विनोदाकरिता (Improv or Stand-up comedy) उपयोगात आणली जातात. येथे जवळपास शंभर स्थानिक संस्था सियॅटल व आसपासच्या गावांत व बेटांवर नाटके करतात. ही नाटके प्रायोगिक व व्यावसायिक या दोन्ही प्रकारची असतात पण माझ्या मते दोन्हीं अत्यंत उच्च दर्जाची असतात.

मी बालकमंदिरात गेल्या गेल्या एकदम रंगमंचावर चढले अणि मंत्री ज्याप्रमाणे खुर्ची

सोडत नाही त्याप्रमाणे त्यानंतर मी ४०/४५ वर्षे मायक्रोफोन घट्ट धरून ठेवला. पडद्यासमोर व पडद्यामागे जमेल तितके वेळा नाच, गाणे, नाटक, कविता, निवेदन, स्पर्धा, परिक्षण या ना त्या कार्यक्रमाकरिता तो हातात ठेवला. घरी दारी सगळी कडे साहित्यिक, कलात्मक वातावरण असल्याने सगळे करायला, पहायला, ऐकायला मिळाले. त्यातून मी बहुभाषी शाळेत शिकल्याने (इंग्रजी व हिंदी पण मुख्यत: दाक्षिणात्य आणि मराठी आणि संस्कृत नाही) मला सर्वभाषीय कलांची आवड होती. मराठी व संस्कृत घरी व इतरत्र शिकले. तरी पण सगळ्यात जास्त सवय इंग्रजीची अणि हिंदीची होती. त्यामुळे मला इंग्रजी नाटके तेंव्हापासूनच आवडत आली. रंगमंचाचे वेड नेहमीच बाळगले. बॅले आणि ऑपेरा चित्रपटात पाहिले होते व "वॉईस ऑफ़ अमेरिका" अणि "बीबीसी" वर ऐकले होते. कॅनडात आल्यावर काही वर्षात मग पैसे जमवून "Bolshoi" बॅले आणि "Carmen"ऑपेरा पाहिला तेंव्हा अगदी धन्य वाटले. ऑटोवा शहर लहान असल्याने नाटके, म्युझिकल्स बघायला आम्हाला टोरॉंटो, न्यूयॉर्क, न्यूजर्सी असे फिरावे लागायचे. आंतरराष्ट्रीय चित्रपट मात्र अत्यल्प शुल्कात पाहीले. ॲरीझोना/व्हर्जिनियात मैलोन्मैल आणि तासंतास जावे लागायचे आणि पैसेही भरपूर लागायचे त्यामुळे सियॅटलला आल्यावर आनंदाश्चर्याचा धक्का बसला आणि आयुष्यच बदलले.

मी पस्तीस वर्षांपूर्वी भारत सोडल्यावर गेली ३० वर्षे जितकी जमतील तितकी नाटके पाहत आली आहे. मुख्यत: सर्व प्रकारची इंग्रजी आणि जेंव्हा संधी मिळेल तेंव्हा हिंदी, मराठी, संस्कृत, फ्रेंच, व इतर भाषीय. सियॅटलला आल्या पासून नाटके पाहण्याचे प्रमाण सप्ताहात एक किंवा एकापेक्षा जास्त असे झाले आहे. त्याला कारणही सोपे आहे. कोणे एकेकाळी जसा कलांना व कलाकारांना राजाश्रय मिळायचा तसा या काळात इथल्या कलाप्रेमी दानशूर व्यक्तींचा व मोठ्या कंपन्यांचा कलाश्रय मिळतो. त्यामुळे बहुतेक नाट्यगृहात एक किंवा दोन दिवस अगदी नाममात्र मूल्य देवून प्रवेश मिळतो (अक्षरशः किमान $२ ते कितीही). त्यामुळे आठवड्याला दोन नाटके सहज परवडतात आणि साधारणपणे १५-२० मिनिटे पायी चालावे लागते! नाट्य/नाटिका वाचन(Stage readings) बहुधा फुकट अथवा निमंत्रणाने असतात. मी जेंव्हा जमेल तेंव्हा समीक्षा करत व लिहित आले आहे - कधी छापण्याकरता मागितलेली व कधी न मागितलेली, तज्ञगटात भाग घेतला आहे. येथे एक अत्यंत महत्वाची गोष्ट नमूद करायची आहे. मला सतत फार खंत वाटत आली आहे कि इंग्रजी नाटकांना भारतीय चेहेरे मला फार कमी दिसले आणि त्यातून मराठी व्यक्ती अभावानेच भेटल्या. अगदी सहजा सहजी शक्य असलेल्या आणि विनामूल्य असलेल्या नाटकांना देखील असे घडले. **आता सियॅटल मध्ये हे चित्र बदलते आहे. गेल्या २-३ वर्षात भारतीय/मराठी प्रेक्षक (बहुतांशी तरुण व मध्यवयीन) तर असतातच पण अत्यंत आनंदाची गोष्ट ही आहे कि त्यांच्यापैकी काही रंगमंचावरही असतात.** एका मध्यवर्ती भारतीय बहुभाषी संस्थेने (नाट्य,नृत्य,संगीत,साहित्य असे विभाग असलेल्या) नियमितपणे विविध कार्यक्रम करायला सुरुवात केली आणि गेल्या २-३ वर्षात “mainstream” उपक्रमात भाग घ्यायला सुरुवात केली. वेगवेगळ्या नाट्यसंस्थांमधून व संस्थांबरोबर हे कलाकार काम करतात. हे सर्व कलाकार इथे जन्मलेले किंवा वाढलेले नाहीत. हे बहुतेक भारतातून आलेले आहेत आणि इंग्रजी,

हिंदी, मराठी व इतर भारतीय भाषांत निपुण आहेत. विविध रंगमंचांवर विविध भूमिकांमधून हे अभिनय व नृत्य-संगीत सादर करीत आहेत. ही अत्यंत समाधानाची बाब आहे. ऑक्टोबर महिन्यात खास “Arts Crush” नावाचा कला महोत्सव असतो. शंभरावर कला संस्था (नाट्य, संगीत, चित्रफीत, नृत्य,साहित्य,चित्र-रंगकला,खाद्यकला,जादू,सर्कस,..) एकत्र येऊन सियॅटल सेंटरमध्ये जत्रा भरवतात आणि आपापल्या कलांची माहिती व भेटीचे निमंत्रण आणि कूपन देतात. बरेच समारंभ आणि कार्यक्रम असतात आणि बहुतेक विनामूल्य असतात. खाण्या-पिण्याची चंगळ असते व विविध लोकांशी ओळखी होतात. कित्येकदा या दरम्यान भारतातून आलेले लेखक/नाटककार/इतर कलाकार भाग घेतात. हे सर्व कार्यक्रम वेगवेगळ्या ठिकाणी होतात त्यामुळे ती ठिकाणेही पहायला मिळतात. पूर्णत: आनंदोत्सव असतो. आमच्या कित्येक कलाकारांशी ओळखी झाल्या आहेत व सगळी प्रेक्षागृहे/ठिकाणे पहायला मिळाली आहेत.

सियॅटल मध्ये बरेच मोठमोठे महोत्सव होतात, मिरवणुकी निघतात, मेळे व जत्रा भरतात त्यापैकी एक मेळा असतो Northwest Folklife. तीन दिवस सियॅटल सेंटर मध्ये कार्यक्रमांची धमाल असते. नृत्य,गायन,वादन,काव्यवाचन, लघुचित्रपट, उभ्या उभ्या विनोद, आणि अनेक आणखी कार्यक्रम असतात. अनेक परगावचे आणि परदेशातले लोक भाग घ्यायला व पाहयला येतात. हे कार्यक्रम मुख्यत:खुल्या रंगमंचावर असतात. **त्यातही भारतीय/मराठी कलाकार आपली कला सादर करीत आहेत आणि त्यांना सगळ्यांकडून उत्तम दाद मिळते आहे.** दुसरा एक अत्यंत महत्वाचा आणि जगप्रसिद्ध महोत्सव म्हणजे सियॅटल आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव. हा महोत्सव २४ ते ३० दिवस चालतो व ह्यातही आजकाल भारतीय संस्था भाग घेताहेत. दक्षिण आशियाई चित्रपट महोत्सवाने देखील आता जोर धरला आहे.त्याहूनही अभिमानाची गोष्ट म्हणजे **मराठी नावे लेखिका, निर्माती, निर्देशिका व अभिनेत्री** म्हणून पुढे येत आहेत. मराठी नर्तिका-नर्तक; गायक-गायिका ही विविध ठिकाणी पण नेहमी पेक्षा अगदी वेगळ्या जागी उदाहरणार्थ जिथे बहुतेक प्रेक्षक/श्रोते अभारतीय असतात अशा जागी म्हणजे City Hall, Museums, Library, येथे आपली कला मग ते शास्त्रीय/सुगम संगीत असो वा वादन असो वा शास्त्रीय नृत्य असो सादर करीत आहेत आणि त्यांचे कौतुक होत आहे. हे सर्व मला पहायला ऐकायला मिळते आहे याचा मला फार आनंद आहे. ऑक्टोबर महिन्यात साधारणत: "रागमाला" संस्था “उत्सव"हा तीन दिवसांचा नृत्य संगीताचा उत्सव साजरा करते आणि बहुधा या उत्सवातील बरेचसे कार्यक्रम सियॅटल सेंटर मध्ये होतात. एकाचवेळेस चार पाच व्यासपीठांवर उत्तमोत्तम शास्त्रीय नृत्य-गायन-वादनाचे कार्यक्रम सुरु असतात व ते पहायला व ऐकायला नानाविध सियॅटल निवासी (सिआटलाइट्स) भारतीय जनते समवेत हजेरी लावतात.

सियॅटलने अतिशय उत्तम दर्जाचे गीटारिस्ट, रॉकस्टार,पॉपस्टार, जॅझ म्युझिशियन्स जगाला दिले आहेत. त्यामुळे इथे अनेक उत्तम रॉक आणि जॅझ क्लबज् आहेत आणि आम्हाला अतिशय गुंगवणारे मधुर संगीत ऐकायला मिळते. ह्या काही क्लबज् मध्ये भारतीय DJ ही लोकप्रिय आहेत.

आता आपण वळूया अमेरिकेतल्या सर्वोत्कृष्ट “Cocktail Bars” कडे. One for the road

किंवा nightcap घेऊया इतक्या मनोरंजना नंतर, खूप रात्र झाली असतांना घरी जायच्या आधी! सियॅटल मधले निदान तीन बार सातत्याने अमेरिकेतल्या दहा सर्वोत्कृष्ट बार मध्ये गणल्या जातात. हे लिहायचे कारण म्हणजे त्यापैकी एक आमच्या इमारतीमागे असलेला, "USA Today" ने गौरविलेला बार **एका मराठी तरुणीने** सुरु करून यशस्वी केला आहे. जागा विकत घेण्यापासून ते अत्यंत नाविन्यपूर्ण कल्पकतेने, आर्थिक मंदीच्या काळात, जबरदस्त स्पर्धा असतांना तिने हे सर्व घडवून आणले आहे. सियॅटलमधे अशाप्रकारे विविध आगळ्या वेगळ्या कला व्यवसायांमध्ये मराठी नावे झळकायला लागली आहेत. यापेक्षा आनंदाची गोष्ट आणखी काय असणार! तर असे आहे हे आमचे कलापूर्ण आणि भारतीय/ मराठी कलागुणांनी परिपूर्ण असलेले सियॅटल.

## आजचा दिवस असा जाईल

**ज्योतीर्विषारद डॉ. अरुण खेळकर**

नमस्कार. मी अरुण खेळकर. खगोल शास्त्राचा मी सखोल अभ्यास केलेला आहे. गणकशास्त्रात मला गति आहे. खगोलशास्त्र व गणित यांचा संगम ज्योतिषशास्त्रात होतो. हायस्कूलमधे असल्यापासून मला ज्योतीमधे इंटरेस्ट होता. मित्रमंडळीत मी ज्योतीर्विषारद, म्हणजे ज्योती या विषयाचा सध्या ज्याला SME किंवा subject matter expert म्हणतात तसा होतो. पण तिच्या दुर्दैवाने तिचे एका अमेरिकेत डॉक्टर असलेल्या NRI शी लग्न होऊन तिला देशांतर करावे लागले. तिचे भविष्य जरी मी बदलू शकलो नाही तरी खगोल, सांख्य आणि कुंडली शास्त्राचा उपयोग जनहितासाठी करावा असे ठरवून मी ज्योतीर्विषारद अरुण खेळकर, मु.पो. नगर, जिल्हा अहमदनगर असा ट्रस्ट स्थापन केला. काही लोक असूयेने त्याला मिस्ट्रस्ट म्हणतात. कुठेलेही चांगले काम करणाऱ्यांना अशा गोष्टींना तोंड द्यावेच लागते. सध्या मी अमेरिकेच्या दौऱ्यावर आहे व आपला आजचा दिवस कसा जाईल हे सांगण्याचा मान मला मिळाला आहे त्याबद्दल भास्कराचार्याला नमन करून आपले आभार मानतो.

मेष मेष म्हणजे एडका. एडके काय करतात? Butt heads. म्हणजे दुसऱ्या एडक्याशी डोक्याने मारामारी करतात. हात नसल्याने त्यांचाही नाईलाज आहे. इंग्रजी भाषा कशी चमत्कारिक आहे नाही? Butt. Head. शरिराचे हे अगदी वेगळे दक्षिणोत्तर भाग आहेत. त्यांची कसली लढाई? आपल्या मराठी भाषेत असे भलते प्रकार नाहीत याचा आपल्याला अभिमान हवा. ज्ञानेश्वरांनी म्हटलेच आहे. अमृताते पैजा जिंके. मेष राशीच्या व्यक्तींना आजचा दिवस नेहेमीसारखाच जाईल. कामावर साहेबांशी बट हेड न केलेलेच बरे. भगिनींनी स्वतःची काळजी घ्यावी. चार तास खपून facebook वर लावलेल्या फोटोंना "nice pic" अशी दाद मिळेल.

वृषभ बैलाला संस्कृतमधे वृषभ म्हणतात. संस्कृत भाषेचा कमी झालेला अभ्यास हेच भारतीय संस्कृतीच्या ऱ्हासाचे कारण आहे, असे कॅनडातल्या एका मराठी प्रोफेसरचे म्हणणे आहे. तुमची रास वृषभ आहे यात कमीपणा नाही. शाळेत असताना "काय बैलोबा, शिरले का नाही डोक्यात? " असे वारंवार विचारणाऱ्या मास्तरांना मायक्रोसॉफ्टच्या स्टेशनरीवर पत्र लिहून, खरा बैलोबा कोण हे कळवायला हरकत नाही. दारी ठीक आहे. पण घरी ओझ्याच्या बैलाप्रमाणे वागून बायकोच्या म्हणण्याला नंदीबैलासारखी मान हलवून गृहजीवनात शांतता आणावी. थंडीत सर्दी-पडशाचा त्रास होणाची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास केल्यास त्यांना यश येईल. शेतकरी बांधवांनी झापा आधीच करून घ्यावा म्हणजे बैल गेला आणि झापा केला अशी अवस्था होणार नाही.

मिथुन मिथुन हे बंगाली ऍक्टरचे नाव आहे असे वाटेल. पण मिथुन म्हणजे couple. मराठीत त्याला जोडी किंवा जोडपे म्हणतात. मैथुन या क्रियापदाची व्युत्पत्ती मिथुन या शब्दात आहे हे सुज्ञांच्या लक्षात येईलच. मर्ढेकरांनी म्हटलेच आहे. "पहा विचारुन त्यांना कसली, मैथुनात रे असते झिंग". पण तुकारामाने म्हटले आहे "सुख पहाता जवापाडे, दुःख पर्वताएवढे". एका हाताने टाळी वाजत नाही. पण चार हातांनी टाळ्याच टाळ्या वाजण्याची शक्यता असते. म्हणूनच नवविवाहितांना "नांदा सौख्यभरे" असा आशीर्वाद देतात. वैवाहिक जीवन जर सुखकर व्हायला हवे असेल तर तोंड उघडण्याऐवजी बंदच ठेवावे हे पुरुषबांधवांनी विसरू नये. Not tonight, I have a headache" ला टायलेनॉलची बाटली पुढे करून विनोद करायचा मोह आवरावा. भीक नको पण कुत्रे आवर अशी अवस्था होईल. नोकरदार मंडळींनी ऑफिसात वेब सर्फिंग करताना काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांनी Catcher In The Rye वाचण्याऐवजी त्या कादंबरीच्या क्लिफ्स नोट्स वाचल्या तर वेळेची बचत होईल. शेतकरी वर्गाने इलेक्ट्रिक मीटर बायपास करताना अत्यंत काळजी घ्यावी. विजेचा धक्का बसण्याची दाट शक्यता आहे. MSEB च्या इंजिनीअरला हुरडा चारून ही कामे करुन घेणे बरे पडेल. भगिनींनी दोन ऍस्पिरिन घेऊन पडून राहिल्यास विश्रांती मिळेलच आणि strong message दिल्यासारखेही होईल.

कर्क कुणीस म्हटलय. वंदे मातरम, शेंडी कातरम. कर्क म्हणजे खेकडा. "बी. जी. जडे।हातात कडे।भाजतात पापडे।खातात खेकडे।आणि म्हणतात आम्ही ह्रि-- ।" वर्गाच्या हस्तकिखितासाठी ऊत्स्फूर्तपणे लिहिलेली ही माझी कविता सरांनी फाडून फेकून दिली होती. जडे त्यांच्या नात्यातले होते हे मला माहीत नव्हते. साहित्य क्षेत्रात सगळी वशिलेबाजी आहे हे मला तेव्हाच कळले. पण अशा अडचणींचा माझ्यावर फारसा परिणाम झाला नाही हे उघड आहे. असाध्य ते साध्य करता सायास. तुम्हा कर्क राशीच्या मंडळीचा स्वभाव जरा चावरा असल्यामुळे आणि तुमच्या खेकड्यासारख्या आडव्या चालीमुळे "उगीचच वाकड्यात शिरत असतात" अशा गैरसमजूतींना तुम्हाला तोंड द्यावे लागते. कुणी "आमचे वडिल कलेक्टर कचेरीत मोठ्या हुद्यावर होते" अशी बढाई मारल्यास "कलेक्टरचे पट्टेवाले होते का?" किंवा कुणाच्या मुलाला मेडिकल कॉलेजात ऍडमिशन मिळाली तर "म्हणजे काम्पाउंडरची नोकरी मिळायची तरी खात्री झाली" असा आपला चावरा विनोद सामान्य मंडळींना न समजून भांडण तंटा होण्याची शक्यता आहे. खुर्चीवर बसताना काळजी घ्यावी. थमटॅक्स पडल्या असल्यास ईजा होईल.

सिंह सिंह हा जंगलाचा राजा. त्याला कोणाचीही भीति नसते तशी तुम्हा सिंह राशीच्या मंडळींना कुणाचेही भय नसते. तुमच्या या धीटपणाची "fools rush in where angels dare not" अशी हेटाळणी बऱ्याचवेळा होते. पण त्यात जळण्याचा भागच जास्त असतो. जलजलसे मरेंगे तो फिकर नही है. सिंह जसा शिकारीची कष्टाची सारी कामे आपल्या सिंहिणींकडून करुन घेतो तसे तुम्हीही घरच्या आर्यस्त्रियांच्या कष्टाळुपणाचा फायदा घेता. "इकडची काडी तिकडे करता येत नाही, खायला काळ भुईला भार, freeloader" असे अपशब्द तुम्हाला ऐकावे लागतात. घरी जरी सिंहासारखे वागलात तरी इंडियन ग्रोसरीच्या दुकानात "आपके यहॉ फेटा चीज नही है क्या?" असा प्रश्न सरदारजी मालकाला विचारु नये. कारण तो फेट्यात कधी राख घालेल हे सांगता येत नाही. महिलांना शेरे पंजाब मधे जेवणाचे योग आहेत.

कन्या आपल्या भारतीय समाजात मुलांना जास्त महत्त्व असते असा चुकीचा गैरसमज आहे. गैरसमज हा चुकीचा असणे हे कसे शक्य आहे हे माहीत नाही. पण आहे खरा. आपल्या बारा राशींच्या राशीचक्रात कन्या रास आहे, पण पुत्र रास नाही. यावरून कन्येचे महत्त्व सिद्ध होते. नाहीतर "पहिली बेटी आणि धनाची पेटी", "पहली बेटी आणि तूप रोटी" असे वाक्प्रचार आले असते का? माधुरी दिक्षित आणि ऐश्वर्या राय ही कन्यारत्ने चांगली की संजय दत्त आणि सलमान खान सारखे दिवटे चिरंजीव? पुरुषमंडळींना आपली रास कन्या असल्याचे मनाला लावून घ्यायचे कारण नाही. सहचारिणी महिनाभरासाठी भारतात गेली असल्याने रिकामे घर खायला उठेल आणि त्यामुळे इंडियन कसिनो, स्पोर्ट्सबार इ. ठिकाणी वेळ काढावा लागेल. व्हेगासच्या ट्रिपचाही योग आहे. व्यावसायिकांनी उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करावी. महिलांना खरेदीची संधी आहे.

तूळ तूळ राशीचे चिह्न म्हणजे तराजू. हल्ली जे work-life balance थोतांड माजलेले आहे त्याचा समतोल दाखवणारी रास तूला. मायक्रोसॉफ्टमधे काम करणाऱ्यांना get a life आणि बोईंगमधे काम करणाऱ्यांना get some real work done असा उपदेश करण्यासाठीच ऋषीमुनींनी तूला हे चिह्न दिले असावे. तूला राशीच्या लोकांना सर्व गोष्टींचा समतोल करायची किंवा ज्याला analysis paralysis म्हणतात तशी सवय असल्याने त्यांना निर्णय घेता येत नाहीत. Buridan's Ass जसा गवताचे दोन अगदी सारखे ढीग बघून हा खाऊ का तो हे ठरवता न आल्याने भुकेने मरतो, तसे तूला राशीचे तरूण दोन सुंदर मुलींपैकी कुणाशी लग्न करावे हे ठरवता न आल्याने आयुष्यभर ब्रह्मचारी राहिल्याची उदाहरणे आहेत. तुमचे तसे होऊ देऊ नका. विवाहोत्सुकांना विवाहाचे योग आहेत. पण तसे झाल्यास life balance ची वाट लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. But hey, there is no such thing as free lunch. महिलांनी आज वजन बघण्याच्या नाद सोडावा. कारण वजनाचा मार्ग भलत्याच काट्यातून जातो. व्यापारी मंडळींनी दिडदांडीच्या तराजूचा वापर केल्यास धंद्यास बरकत येईल.

वृश्चिक वृश्चिक म्हणजे विंचू. हिन्दीत त्याला बिचुवा म्हणतात. वैजयंतीमालाने म्हटलेच आहे. चढ गया पापी बिचुवा. भारतीय वांङ्मयात विंचवाचे उल्लेख खूप आहेत. नाथांच्या भारुडातही "विंचू चावला, विंचू

चावला" असते. विंचवांना ऊष्ण हवामान आवडते हे ऍरिझोनात रिटायर होण्याच्या बाता करणाऱ्यांनी विसरू नये. रास वृश्चिक असली तरी नंतर तंतरायला नको. "चढ गया पापी बिचुवा" नंतर "सैंयाको देखके उतर गया बिचुवा" ची कल्पना खूप रोमँटिक वाटली तरी सौभाग्यवतीसमोर नांगी टाकून वागण्याची काळजी घ्यावी. कंटाळा आल्यामुळे आज चाटभांडारात भेळपुरी, दही बटाटा पुरी खावी लागणार अशी सुवार्ता कळेल. पण ती ऐकून आनंदाने उडी मारायचा मोह आवरावा. नाहीतर सूप, सॅलड मानगुटीवर बसेल व रसमलाईच्या ऐवजी झी टीव्हीवरच्या करिना कपूरला डिझर्ट मानावे लागेल. शेतकरी मंडळींनी शेतावर जाताना किंवा शेताला जाताना विंचू काट्याची काळजी घ्यावी व  कोल्हापुरी जवळ ठेवावी. महिलांना मानसिक समाधान मिळेल.

धनु धनु राशीचा बऱ्याच वेळा धन असा उल्लेख केला जातो. एकदा पैशाची चटक लागली की सगळीकडे धनच दिसायला लागते हे बरे नाही. बऱ्याच वेळा माझ्या जोतिषकार्याच्या समाजसेवेची "पैसे दिले तर काय हवे ते सांगतात" अशी टीका केली जाते. पण मी त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. धनु म्हणजे धनुष्य. भारतीय संस्कृतीत धनुष्याचे महत्त्व फार आहे. पुराणात धनुष्याचा उपयोग फक्त शिकारीसाठी न होता मुली पटवण्यासाठीही होत असे. सीता, द्रौपदी यांच्या स्वयंवरात the real hero was धनुष्य. सीता, द्रौपदी सारख्या सुंदरी जवळ असल्यातरी distract न होऊन पण जिंकणाऱ्या पुरुषोत्तमांना माझे नमन असो. Then again you have to wonder about their priorities. सर्वसामान्य पुरुषांचे "who cares about the eyebrows" (Seinfeld, episode 33) असे मत असले तरी धनुष्याकृती सुंदर भुवया असलेल्या नायिका पुरातन वांङ्मयातही नेहेमी दिसतात. शाकुंतलाच्या पहिल्याच अंकात, धनुष्याकृती भुवया असलेली शकुंतला प्रियंवदेला "तू माझ्या कंचुकीची गाठ आज फारच घट्ट बांधली आहेस" अशी तक्रार करते. आता शकुंतलेच्या भुवया धनुष्याकृती आणि सुंदर होत्या असे कालिदासाला सरळ सांगता आले असते. त्यात तिची घट्ट कंचुकी कशाला काढायची? च्यायला, हे लेखक फार चालू असतात. धनु राशींच्या पुरुषमंडळींना आजचा दिवस risky आहे. निष्काळजीपणे मेसीजच्या आश्चर्यकारक -कंचुकीच्या जाहिराती न्याहाळत बसलात तर घरात भांड्याला भांडे लागायची शक्यता आहे. जेवणाचे वांदे झाले तरी risk management म्हणून फूड चॅनलवर जियाडा बघण्याऐवजी बेअरफुट कॉंटेसा बघावा. बागवानमधली ड्रीम ग्रँडमा बघत बसलेल्या आजोबांना मुलांनी डिस्टर्ब करु नये.

मकर मगरमिठी ही काही साधीसुधी मिठी नसते. आणि आपल्या नेहेमीच्या मिठी सारखी ती मीठिही नसते. मगरमिठी is a life and death situation. आपणा मकर राशीकरांनी एखादी गोष्ट करायची ठरवली म्हणजे तिला मगरमिठी घालून तडीस न्यावी. म्हणजे महलोंने छीन लिया बचपनका प्यार मेरा म्हणायची वेळ येणार नाही. आला दिवस seize the day करून काम केल्यास तुम्ही कृतीशील बनाल. कामानिमित्त प्रवास होईल. त्यामुळे खाण्या, विशेषतः पिण्याकडे लक्ष ठेवावे. तुमच्या आशा पल्लवीत करणारे ग्रहमान आहे. पण अशा वेळीही रविवारच्या जपात खंड पडू देऊ नका. जप जप जप रे. जप रे प्रीतकी माला. राजकपूरला मीनाकुमारी मिळाली नाही तरी तुम्हाला एखादी ब्रह्मकुमारी मिळेल. महिलांना नॉर्डस्ट्रॉमचे गिफ्ट सर्टिफिकेट मिळायची शक्यता आहे.

कुंभ फिरत्या चाकावरती देशी तू मातीला आकार, विठ्ठला तू वेडा कुंभार. आकार देणारा तो कुंभार. आणि आकार दिलेला तो कुंभ. माठ. पण तुमची रास कुंभ आहे म्हणजे तुम्ही माठ आहात असे नाही. "Life is like water dripping from earthen pot. You only know when it has seeped away", आल्ड्स हक्स्ले म्हणाले आहेत. एकंदरीत कुंभ रास फारच brittle, fragile समजली जाते. त्यांची निश्चयशक्ती कमकुवत असते. कुंभ रास आणि कुंभ लग्न असले की डाएटचा नाद सोडावा. डॉक्टरांनी सांगितलेला डाएट जेवायच्या आधी खायचा का नंतर असा त्यांना प्रश्न पडतो हा कुंभ रास असलेल्यांचा दोष नाही. शाळेत सारखा "शुंभ आहेस" असा नकारात्मक उल्लेख झाल्याचे हे परिणाम. मॉटेसरीचे सगळे तज्ञ  भारत सोडून येथे आल्याने ब्रेनड्रेन झाल्याचा दुष्परिणाम. कुंभ राशीला सद्ध्या साडेसाती सुरु आहे. त्यावर उतारा म्हणून "कोंबडी पळाली" साडेसात वेळा ऐकावे. त्या गाण्यापुढे शनीचाच काय पण कुठल्याच ग्रहाचा टिकाव लागणार नाही. दशमग्रह included.

मीन मोठा मासा छोट्या माशाला खातो. त्यामुळे तुमच्यासारख्या मीन राशीच्या व्यक्ती सर्वांशी जुळवून घेण्याचे प्रयत्न करतात. मनुमाशाचा जलप्रलयात जगाला तारणारा मोठेपणाही आपल्यात आढळतो. "पाण्यामधे मासा झोप घेई कैसा" तुकारामाने म्हटले आहे. तुम्हाला जात्याच कमी झोप लागते. हल्लीच्या केबल टीव्ही, डिश नेटवर्क, इंटरनेट, आयफोन, ट्विटर, सोशल नेटवर्क इ. नॉनस्टॉप स्टिम्युलेशनमुळे झोपेचे खोबरे होऊन निद्रानाशाचा त्रास होण्याची शक्यता आहे. पण त्यावर आता नवीन उपाय आहे. माझे "मी पाहिलेला अमेरिका" (जादूगार रघुवीरांच्या "मी पाहिलेला रशिया" सारखे) नवीन पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. त्याचा वापर करुन बघावा. माझ्या कुजकट टिकाकारांनी त्यावर "निद्रानाशावर रामबाण उपाय" अशी अवास्तव टीका केली आहे. अमेरिकेचे अंतरंग कळले नाही तरी झोप चांगली होईल. दहा डॉलर पाठविल्यास घरपोच मिळण्याची व्यवस्था होईल. शनी कुंभ राशीत असल्याने मीन राशीला साडेसाती सुरु होणार आहे. त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी पूर्वजन्मीच्या पातकांचे प्रायश्चित घ्यायला हवे. मीन रास बारावी असल्याने "अहो जाऊ द्या ना घरी, वाजले की बारा" हे गीत बारा वेळा ऐकत जावे. म्हणजे त्या कटकटीपुढे साडेसाती काहीच नाही असे वाटायला लागेल. सॅमन खाण्याचे योग आहेत.

आजचे विषेश

नगरच्या अरविंद निसरडे यांचे पत्र आले आहे. त्यांची रास मीन आहे व लग्नही मीन आहे. ते लिहितात, "खेळकरसर, मी काही वर्षापूर्वी तुम्हाला पत्र लिहून भविष्य विचारले होते. आज नवीन प्रश्न आहे. तुम्ही त्याचे उत्तर द्याल अशी आशा आहे."

"अरविंदराव, मला सर वगैरे म्हणलेले आवडत नाही. अशा औपचारिकपणाची गरज नाही. मला फक्त डॉ. खेळकर म्हणावे. दहा बारा वर्षापूर्वी तुम्ही मला "माधुरी दिक्षितला मंगळ आहे का?" असे विचारल्याचे आठवते. तेव्हा तुम्हाला कडक साडेसाती चालू होती, त्यामुळे तुम्हाला हवा तसा योग येणे अवघड होते. शिवाय मी सांगितल्याप्रमाणे दर शनिवारी शनिमहात्म्य वाचण्याऐवजी तुम्ही रोज रुक्मिणीस्वयंवर वाचले. त्याचा परिणाम उलटाच झाला. तुमचा शनी वक्री झाला आणि डॉ. नेन्यांचे उखळ पांढरे झाले. उपरवाला देता है तो छप्पर फाडके देता है, असे यालाच म्हणतात. रुक्मिणीस्वयंवर वाचायची घाई

सारथी २०१२

केल्याने सातार्‍याच्या छबीशी तुम्ही विवाहबद्ध झालात. तुमची छोटी आता सात-आठ वर्षाची झाली यात आम्हाला आनंदच आहे.

छोटीला तुम्हाला होता तसा मंगळ नाही ही गोष्ट उत्तम झाली. नेन्यांशी व्याहीसंबंधाबद्दलचा तुमचा प्रश्न अप्रस्तुत मुळीच नाही. आपल्याकडून होईल ते प्रयत्न करायला काहीच हरकत नाही. प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलही गळे. हल्ली फ्रॅकिंग करतात तसे. छबीच्या कुंडलीत चान्द्रबळ कमी आहे. ते वाढवण्यासाठी आमचे काही खास मंत्र आहेत. १००१ रु.च्या नॉमिनल फीमधे ते उलट टपाली पाठवण्यात येतील. त्याची व्यवस्था होईपर्यंत छोटीसकट सहकुटुंब "झलक दिखला जा" नेमाने बघायला सुरुवात करावी. त्यामुळे तुम्हा बाप-लेकीचा, दोघांचाही फायदा होईल. छोटीला डान्स क्लासमधे घालून "धक धक करने लगा" पासून "चोलीके पिछे क्या है" पर्यंत प्रगती झाल्यावर तिला माधुरी दिक्षित यांच्याच डान्स क्लासमधे दाखल केल्यास योग येण्याची शक्यता वाढेल. आमच्या गुरूंनी दिलेल्या सप्तकन्यकांच्या खालील मंत्रसप्तकांचा आमच्या सप्तपदीला जरी उपयोग झाला नाही तरी नेमाने स्मरण केल्यास तुम्हाला नक्कीच होईल.

छोटीच्या बाशिंगबळात स्टार पॉवर यावे म्हणून "मधुबाला, मधुबाला, जय जय वैजयंतीमाला" हा आपल्या वाडवडिलांनी दिलेला मंत्र आम्ही तुम्हाला विनामूल्य देतो. त्यानंतरचे रेखा, जयाभादुरी (या पैकी फक्त एकच मंत्र म्हणावा. कारण उघड आहे), शर्मिला, राखी, हेमा मालिनी, श्रीदेवी, ऐश्वर्या राय आणि सातवा, Seventh Heaven किंवा कुंडलिनी-करिना यांचा मंत्र प्रत्येकी १००१ रु.त घरपोच मिळेल. कळावे. लोभ असावा.

आपला नम्र
ज्योतीर्विषारद डॉ. अरुण खेळकर





**पुणे तिथे काय उणे!**

**अभय बिंदुमाधव जोशी**

मला एकदम दचकून जाग आली. घर अगदी शांत शांत होते. खिडकीतून लख्ख उजाडलेले दिसत होते. एरवी दार जरा कुरकुरले तरी उठणारे आपण, इतका वेळ झोपून कसे राहिलो याचा मला अचंबा वाटला. नाही म्हणजे दूधवाला, पेपरवाला, भांडी घासायला अगदी पहाटे पहाटे येणारी रुक्मिणी या सगळ्यांचे आवाज अजिबात कसे ऐकू नाही आले आपल्याला?

बेडरूमचे दार उघडून मी जिन्याने खाली गेलो तर आई बाबा शांत पेपर वाचत सोफ्यावर बसले होते. एरवी माझा आवाज ऐकताच पेपर टाकून उठणारी आई पेपर बाजूला न करता म्हणाली, "दिनकर, उठलास का बाळ? जा आपला आपण उपमा खाऊन घे. की आज पण ब्रेकफास्ट मिटींग आहे?"

मी चकित झालो. आई आणि आपलं आपण खा म्हणतेय?

"आई, आज काही संप वगैरे आहे का गं? दूधवाला, रुक्मिणी कुणीच कसे आले नाहीत?"

"असं का म्हणतोस? येऊन गेले सगळे आपापली कामे करून." आई पेपर बाजूला करीत माझ्याकडे आश्चर्याने पहात म्हणाली.

"काय सांगतेस? मला काहीच आवाज नाही आला."

"अरे दिनकर, आवाज करायला ते काय जत्रेतले गोसावी आहेत का? नेहमीप्रमाणे शांतपणे कामे करून गेले ते!" बाबांनी त्यांचे विनोदी पिल्लू सोडले.

नंदीबैलासारखी मान हलवीत मी परत वर गेलो. १५-२० मिनिटांत तयार होऊन परत खाली आलो व आईला म्हणालो, "ओके आई मी निघालो. ग्रूप मिटींग आहे माझी वाडेश्वरमधे."

"सांभाळून जा. गाडी फार जोरात चालवू नकोस रस्ते चांगले आहेत म्हणून. दंड करतील तुला." आई म्हणाली व स्वैपाकघरात नुकत्याच आलेल्या शांताबाईंशी जेवायला काय काय करायचे याची चर्चा करू लागली.

आईच्या या चमत्कारीक वाक्यावर विचार करत मी माझी वॅगन-आर गाडी सुरू केली. आज काहीतरी गडबड आहे खास!

पुष्पलता सोसायटीच्या गेटपाशी बसलेल्या हेमंत वॉचमनला (आजकाल वॉचमन लोकांची नावे पण अशी भारीतली असतात) हात करत मी बाहेर पडलो व कमिशनर गल्लीतून गाडी हाकत विद्यापीठ रस्त्याकडे निघालो. उजवीकडे चित्तरंजन वाटिकेत बरेच लोक वेगवेगळ्या वेगाने चालत होते आणि धावत होते. आज मला थोडी गर्दी जास्तच वाटली. अचानक सगळ्यांनाच व्यायामाची आवड लागली की काय?

"हाय दिनकर!", मंजूळ आवाजात हाक आली. प्रिया तिच्या २० फेऱ्या मारायला लगबगीने वाटिकेकडे निघाली होती.

"हाय प्रिया," असे म्हणत मी रस्त्यात मधेच गाडी थांबवू लागलो, तर ती लगेच ओरडली, "अरे कुठेही काय थांबवतोस? नंतर भेटू ना आपण." असे म्हणून ती गेलीदेखील.

नाईलाजाने मी गाडी चालवत राहिलो. पण ती असे का म्हणाली - "कुठेही काय थांबवतोस?" आज काय नियम न मोडण्याचा दिवस आहे की काय?

विद्यापीठ रस्त्यापाशी सिग्नलपाशी मी थांबलो. रस्त्यांवर गर्दी फारच कमी वाटत होती. चौक

रिकामाच वाटत होता. हिरवा दिवा लागल्याबरोबर लगेच माझ्यापुढे थांबलेल्या गाडीला उजवीकडून ओव्हरटेक करून पुढे जाण्याचा प्रयत्न करतो तो समोर काळा-पिवळा फूटभर उंच जाडजूड रस्ता दुभाजक दिसला. वेळेत ब्रेक मारला म्हणून बरं नाहीतर आज वॅगन-आरचे दात पडण्याची वेळ आली होती. हा दुभाजक केव्हा बांधला बुवा? नाईलाजाने मी शिस्तीत पुढच्या वाहनाच्या मागोमाग गेलो.

विद्यापीठ रस्त्यावर ३ लेन्समध्ये वाहतुक छान शिस्तीत चालली होती. लेन्सच्या पांढऱ्या रेषा अगदी काल रात्रीच रंगवल्याप्रमाणे चमकत होत्या. कुणीच दोन लेन्सच्या मध्ये गाडी घुसवून एकमेकावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत नव्हते. कुणाला पुढे जायची घाई दिसत नाही! काय गांधींची पुण्यतिथी आहे की काय आज?

अशी सगळी नवनवीन आश्चर्ये बघत मी जंगली महाराज रस्त्यावर आलो. तिथेही परिस्थिती तीच. सगळे शांत शिस्तीत चालले होते. रस्त्यावर कुठेही खड्डे खणून काम चालू नव्हते. वाऱ्याची एक जोराची झुळूक आल्याने मी चमकलो आणि माझ्या लक्षात आले की मी गाडीची खिडकी इतका वेळ उघडीच ठेवली होती. 'अरे बाप रे! मेलो आता इतका वेळ प्रदूषित हवा खाऊन.' असा विचार करून मी पटकन खिडकी वर करणार तेव्हढ्यात लक्षात आले की हवा तर खूपच स्वच्छ, उबदार, आल्हाददायक, आणि सुगंधी अशी वाटत होती. रस्त्याच्या दोहों बाजूला बसलेले फुलवाले गुलाब, झेंडू, चाफा, अशी नाना प्रकारची फुले विकत होते, त्यांचाच सुवास हवेवर तरंगत येत होता. आणि नेहमी खिडक्या बंद करून एसी लावूनदेखील येणाऱ्या पेट्रोल, डिझेल, व्हॅसलिन असल्या वासांचा अजिबात पत्ता नव्हता. उलट फुलांच्या सुगंधात इतर तऱ्हेतऱ्हेचे वास मिसळत होते - जागोजाग असलेल्या स्टॉलवर बनणारे वडापाव, मिसळ, अमृततुल्य चहा अशा सगळ्यांचे. खिडकी तशीच उघडी ठेवून मी ती मस्त धुंद हवा हुंगत राहिलो.

डेक्कनच्या पादचारी क्रॉसिंगपाशी लाल सिग्नल होता. पण मी नेहमीप्रमाणे पादचारी आपले आपण बघून घेतील असा विचार करत तमा न बाळगता तसाच पुढे गेलो. तर काय! पोलीसमामा वाटच पाहात होता माझी. लगेच तो पुढे आडवा होत मला गाडी साईडला घ्या अशी मंद हसत खूण करू लागला. "च्यायला. गेले दोनशे रूपये!" मी स्वतःशीच चडफडलो.

"काय साहेब! रस्ता फक्त गाड्यांसाठी नाही. चालणाऱ्यांनी काय करायचे तुम्ही असे केल्यावर?" मामा खिडकीवर दोन्ही हात ठेवीत म्हणाला.

"सॉरी, अहो मला दिवा दिसलाच नाही." मी थाप ठोकत जमेल तितका अपराधी चेहरा केला. "किती दंड द्यावा लागेल?"

"अहो दंड कसला? फक्त वॉर्निंग द्यायला थांबवले तुम्हाला!" मामाने हात काढून घेत म्हटले. "जा आता सावकाश."

मी आ वासून त्याच्याकडे पाहातच राहिलो. पुण्याचा पोलीस आणि काही पैसे न घेता सोडून देतोय, आणि तेही असे सभ्य माणसासारखे बोलून? पण मग लगेच गाडी सुरू करून मी चालता झालो. न जाणो आपण थांबायचे आणि त्याचे मन बदलायचे!

वाडेश्वरला पोहोचेपर्यंत मला एकदाही गाडीचा हॉर्न वाजवावा लागला नाही, किंवा मला चाटून जाणाऱ्या मोटरसायकल चालकांना शिव्या हासडाव्या लागल्या नाहीत. वाडेश्वरपाशी अजून एक आश्चर्य माझी वाट पाहात होते. तिथे चक्क व्हॅले गाडी पार्क करण्यासाठी उभा होता. त्याने माझ्याकडून अदबीने किल्ली घेतली व आत जाण्याचा इशारा केला.

वाडेश्वरमधे आत मात्र नेहमीचेच चित्र होते. लोकांचा गप्पा-गोंधळ चालला होता. डोश्या-इडल्यांसाठी लोक वेटर्सना हाका मारत होते. कुणी ओळखीचे दिसले की लोक बिनधास्त त्या टेबलापाशी जाऊन हात टेकून

विचारपूस करीत होते. मला हे दृश्य पाहून हायसे वाटले. सकाळी उठल्यापासून घेतलेले विचित्र अनुभव बहुतेक स्वप्नच असावेत किंवा मी अर्धवट झोपेत असल्यामुळे तसे वेगळे दिसले असावेत अशी माझी खात्री पटली.

माझ्या मित्रांची नेहमीची टोळी आत आधीच एका टेबलापाशी गप्पा मारीत बसली होती. "दिन्या लेका, काय किती वेळ लावलास? रात्री झोपायला उशीर झाला काय?" डोळे मिचकावीत बिप्या ऊर्फ बिपीन विचारता झाला. बिप्याला सर्वांच्या नाईट लाईफमध्ये भलताच इंटरेस्ट. त्याच्या प्रश्नाला फक्त हसून उत्तर देत मी एक दूरची रिकामी खुर्ची ओढत बसलो, व काय गप्पा चालल्या आहेत याचा अंदाज घेऊ लागलो.

"पण डिबेटमध्ये मनमोहन फारच कमी पडला. किती सोपा प्रश्न टाकला होता लालूप्रसादने!" ढिग्या ऊर्फ गिरीश म्हणाला.

"डिबेट? आणि मनमोहन आणि लालूची? काय चाललेय काय?" मी जवळजवळ ओरडलोच.

सगळे माझ्याकडे चकित होऊन पाहू लागले. "दिन्या तू असे म्हणतोस? काल दूरदर्शनवर नाही पाहिलीस दुसरी डिबेट? आणि आज आयपीआर वर केव्हढी छान चर्चा सुरू आहे सकाळपासून!" पक्या ऊर्फ परीक्षित म्हणाला.

तोंडात मारल्याप्रमाणे मी गप्प बसलो. मला खरे म्हणजे राजकारणात खूपच इंटरेस्ट. पण हे सगळे काहीतरी भलतेच चालले होते, आणि मला काहीच समजत नव्हते. थोडावेळ त्यांच्या गप्पा ऐकल्यावर माझ्या ध्यानात आले की काल पंतप्रधान होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची नॅशनल टीव्हीवर दुसरी डिबेट झाली होती, व त्यात लालूप्रसादने (विरोधी पार्टीचा उमेदवार) कॉंग्रेसच्या मनमोहनसिंगला आतंकवात या मुद्यावर चांगलेच पिळले होते. आणि सकाळपासून आयपीआर म्हणजे इंडियन पब्लिक रेडिओ नावाच्या चॅनेलवर अनेक प्रोफेसर लोक व इतर तज्ञ व नामांकित लोक या विषयावर चर्चा करीत होते.

हे सर्व अमेरिकन प्रकार इथे कधी आले? मी खूप वर्षे झोपून होतो की काय? माझी मती गुंग झाली. काय करावे अशा विवंचनेत असताना वेटर टोमॅटो उत्ताप्पा घेऊन आला व स्मित करीत ठेवून गेला. मी नेहमीच उत्ताप्पा घेतो हे त्याला ठाऊक झाले होते. मुकाट्याने मी समोर आलेल्या टोमॅटो उत्ताप्प्यावर तुटून पडलो. किमान बर्गर डोसा तरी खायची पाळी नव्हती आली अजून!

"तरी बरं. इकॉनॉमीच्या चर्चेत त्या ग्रीसच्या प्रश्नावर मनमोहनने लालूची बोलतीच बंद केली," पक्या म्हणाला.

"मग लालूने खुर्ची फेकून मारली की नाही?" मी न राहवून खोचक पृच्छा केली.

सगळे पुन्हा एकदा माझ्याकडे चकित चेहरे करून बघायला लागले.

"दिनकरराव! विनोद असेल तर चांगला आहे. पण अहो तसले प्रकार आपल्या लोकशाहीत होत नाहीत!"

थोड्या वेळाने फोन वाजला म्हणून नंबर पाहिला तर प्रिया होती.

"हां हॅलो!" मी हिरवे बटन दाबत बोललो.

"अरे हां हॅलो काय? एका कोणत्या तरी भाषेत बोल ना!" प्रियाला मला चिडवायची भारी हौस.

मी काहीच न बोलल्यावर ती म्हणाली, "बरं, पब्लिक लायब्ररीत भेटूया का? नाही तर जवळचे अमृततुल्य आहेच चहा प्यायला."

मी एकदम जागा होऊन म्हणालो, "पब्लिक लायब्ररी?

आता ही कुठनं आली पुण्यात?"

"झोपेत आहेस की काय अजून? अरे आपली सेनापती बापट रोडवरची. नाही का नुकतीच नव्या इमारतीत शिफ्ट झाली ती?" प्रिया मला समजावीत म्हणाली.

मी आता वेडाच व्हायचे बाकी होते.

"तू इथे मला घ्यायला आलीस तरच येईन मी. ड्रायव्हिंगचा कंटाळा आलाय मला." मी प्रियाला तक्रारीच्या सुरात म्हटले. मला ती लायब्ररी कुठे आहे हे माहित नसल्याचे दाखवायचे नव्हते म्हणून ही सबब.

"ओके. आलेच थोड्या वेळात. वाडेश्वर ना?" प्रियाने यायचे कबूल करत फोन ठेवला.

"ए तू लायब्ररीत चाललायस का? मला ते सरकारचे शिवाजी पुस्तक आणशील का?" दिप्या ऊर्फ दीपांकर मला म्हणाला.

"सरकारचे? आता सरकारी कारकुनांनी पण शिवाजीवर पुस्तके लिहायला घेतली की काय?" मी वैतागून म्हटले.

"अरे बाबा. त्या यदुनाथ सरकारचे," दिप्या माझ्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाला. त्याला माझा भांग मोडायची वाईट खोड होती. केस विस्कटले की मी जाम वैतागतो, विशेषतः प्रियाला भेटायचे असेल तेव्हा, हे त्याला माहित होते.

१०-१५ मिनिटांनी प्रिया तिच्या गर्द हिरव्या ड्रेसमध्ये अवतरली. तिला पाहाताच माझा मूड काहीसा वधारला. तसे माझ्या मूडला काही झाले नव्हते, पण डोके सॉलिड भणभणले होते.

"चल तू मला घेऊन लगेच. हे लोक काय ते डिबेट आणि आयपीआर वरून मला फार छळताहेत." मी प्रियाला विनवले.

कमरेवर हात ठेवीत लगेच प्रिया आमच्या कंपूला उद्देशून म्हणाली, "अरे मरीज़ला जरा थंड घेऊ द्या. तब्येत जरा नरम आहे." आणि असे म्हणून सर्वांच्याबरोबर खळखळून हसली. म्हणजे तिलाही हा जोकच वाटत होता तर!

प्रियाच्या मारूतीत बसून आम्ही निघालो. प्रिया कमालीच्या सफाईने गाडी चालवू लागली. फर्ग्युसनवरून बीएमसीसी रोड व तिथून लॉ कॉलेज रोड असे करीत ती अंतर सपासप कापू लागली. आश्चर्य म्हणजे तिला कुणीच सायकलवाले, फेरीवाले, किंवा चालणारे देखील आडवे आले नाहीत! अर्थात या आश्चर्याला आता मी सरावलो होतो. मला आश्चर्य याचे वाटले की प्रियाला या प्रकाराचे काहीच वाटत नव्हते! जणू काही हे तिला नेहमीचेच होते.

आम्ही "महात्मा गांधी पब्लिक लायब्ररी" च्या भव्य इमारतीसमोर थांबलो. मुबलक पार्किंगची जागा, स्कूटर आणि गाड्यांची गर्दी, आतबाहेर करणाऱ्या आया-मुलांची भाऊगर्दी, पण सगळे काही शांत धक्काबुक्की न करता चाललेले. हे सगळे पाहून माझ्या जबड्याचा 'आ' कायमचा वासतो की काय असे मला वाटू लागले.

"प्रिया, तुला आठवतेय? आपण फ्रीमॉन्टच्या लायब्ररीत असे बऱ्याचदा जायचो ते? अशीच होती नाही ती?" मी म्हटले.

"ऑफ कोर्स आठवतेय. तू पुस्तकांच्याऐवजी माझ्याच कडे पाहात असायचास कायम," प्रिया हसत उद्गारली.

"हो! पण, पुण्यात अशी लायब्ररी ..." मी वाक्य अर्धवट सोडून दिले व म्हटले, "इथे नको, आपण चहा पिऊ चल."

"हरकत नाही. जबरेश्वर अमृततुल्यमध्ये जाऊ. आतल्या दरवाजानं जाऊ आपण. मला एक-दोन

पुस्तकं परत करायचीत." प्रिया गाडीचे दार उघडून बाहेर पडलीदेखील. प्रिया माझ्या अगदी उलट स्वभावाची होती. मी विचारी (इतरांच्या मते "संथ") तर ती एकदम डायनॅमिक. मी मुकाट्याने तिच्या मागोमाग गेलो.

पुस्तकं परत करण्याच्या मशीनच्या घशात पुस्तकं ढकलल्यावर प्रिया माझा हात धरून मला आत घेऊन गेली. मला लहान मुलासारखे बोट धरून न्यायची गरज आहे हे तिने अचूक (intuitively) ओळखले होते. म्हणूनच प्रिया मला इतकी आवडायची. मला काय हवे हे तिला न सांगता कळायचे.

खरोखरंच एखाद्या लहान मुलासारखा तिच्या पाठोपाठ चालत मी आतले प्रचंड बुकशेल्फ पाहू लागलो. "ब्रिटिशकालीन साहित्य", "निनावी लेखन", "भाषांतरे", अशा अनेक पाट्या मला दिसल्या. "बाबा कदमांचा" आख्खा सेक्शन दिसला. मग पुढे इंग्लिश पुस्तकांचे डोंगरही दिसले. "अरे काय तेच तेच परत पाहात बसशील" असे म्हणत प्रिया मला ओढतच "जबरेश्वर अमृततुल्य" अशी नक्षीदार पाटी लावलेल्या दाराकडे घेऊन गेली. मी पाहातच राहिलो. लायब्ररीला लागूनच (किंबहुना तिच्यात परिसरात) "स्टारबक्स"ला लाजवेल अशा मोठ्या अलिशान आणि सुशोभित दालनात लहानथोर चहा पीत बसले होते. चहाचा भला थोरला मेनू सर्व भिंतींवर लावला होता त्यात अमृततुल्य चहाचे वेगवेगळे फ्लेवर्स दिले होते.

"दोन इलायची अमृततुल्य. कटींग. आणि एक बटाटेवडा." असे प्रिया काऊंटरपाशी म्हणाली. 'कटींग आणि अशा दुकानात? आता काऊंटरवाला नक्की हिला हसणार' असे वाटून मी शरमेने खाली पाहू लागलो. पण कुठले काय. तिथे उभ्या असलेल्या तरूण पोराने "हो नक्की. हा घ्या बिल्ला. आणि कुठेही बसा. चहा येईलच ५ मिनिटांत," असे म्हणून खण्ण असा कॅश रजिस्टरचा आवाज करीत प्रियाचे पैसे ठेवून दिले.

एका आरामशीर सोफ्यावर विराजमान झाल्यावर मी प्रियाला म्हटले, "अगं ही सगळी कॉफीची दुकाने कुठे गेली? बरिस्टा, सिसिडी?"

"आहेत की ती पण. पण अमृततुल्यला पर्याय नाही. आजकाल ओस पडलीयत ती दुकाने."

गरमगरम आणि खरोखर अमृततुल्य असा तो चहा मी घुटके घेत बसलो व प्रिया वड्याचे तुकडे खात मला न्याहाळत राहिली. तिच्या नजरेत स्नेह तर होताच, थोडी काळजी पण दिसली. अचानक एका चालत जाणाऱ्या इसमाचा धक्का लागून माझ्या कपातले एक -दोन थेंब खाली सांडले. "दिसत नाही काय रे" अशी मी शिवी घालणार तेव्हढ्यात तोच प्राणी म्हणाला, "ओ आयॅम सो सॉरी! माफ करा चुकून झाले". आणि चक्क तो धावत गेला व एकदोन पेपर नॅपकिन आणून ते थेंब पुसू लागला. मी निरखून पाहिले की कोणी परदेशी प्राणी तर नाही ना. पण छे. चांगला मिशीवाला अस्सल भारतीय बंधू होता.

"प्रिया, पाहिलेस? एव्हढी कर्टसी. अजब माणूस आहे यार! अनबिलिव्हेबल!"

"अरे दिनकर, त्यात काय एवढे. त्याने बरोबरच केले. आणि त्याच्या जागी कुणीही असेच केले असते." प्रिया हताश होऊन माझ्याकडे पाहात म्हणाली.

चहा झाल्यावर प्रिया मला प्रभात रोडच्या गार्डन वॉकवर घेऊन गेली. गाडी पार्क करून (हो तिथे चक्क पे पार्कींगची सोय होती) प्रिया माझे बोट धरून मला त्या माझ्या अत्यंत आवडीच्या सुरम्य शांत ठिकाणी घेऊन गेली. आमच्यासारखी अनेक जोडपी तिथे हातात हात घेऊन बागडत होती. थोडे अंतर गेल्यावर प्रिया थांबली व माझ्याकडे वळून पाहात म्हणाली, "दिनकर, तू ठीक आहेस ना? असा गोंधळलेला का आहेस?"

आणि मी तिच्या टपोऱ्या डोळ्यांकडे पाहात तिच्या खोल नजरेचा वेध घेऊ लागलो. प्रिया जवळपास

सारथी २०१२

माझ्याच उंचीची होती. माझ्याविषयीचे प्रेम, आपुलकी, मैत्री असे सर्व भाव तिच्या गोल रेखीव चेहऱ्यावर दाटून आले होते. तिच्या नाजूक त्वचेवर अगदी सूक्ष्म थरथरणारे घर्मबिंदू जमा झाले होते. मला काही कळायच्या आतच तिने माझा चेहरा जवळ खेचला व तिचे ओठ माझ्या ओठांजवळ आणले. 'प्रिया? आणि आपणहून माझे चुंबन घेतेय? ते देखील एका पब्लिक पार्कमध्ये?' असे विचारांचे वादळ माझ्या डोक्यात घुमू लागले व मी चमकून थोडा मागे सरकलो. "अरे लाजतोस काय असा? इथे कोण पाहतेय तुझ्याकडे? सर्वांनाच कामे आहेत आपापली," प्रिया मिश्किलपणे म्हणाली.

मी इकडेतिकडे पाहिले. खरोखरच अनेक जोडपी एकमेकांच्या कवेत उभी राहून गप्पा मारत होती. कसेबसे धैर्य गोळा करून मी प्रियाच्या मिठीत शिरलो आणि अचानक मला "दिनू, ए दिनू. अरे दिनकर!" अशी आईची हाक ऐकू येऊ लागली. आधी अस्पष्ट व मग अधिकाधिक स्पष्ट. इथे आई कशी काय आली असे वाटून मी प्रियाला दूर ढकलले व आवाजाच्या दिशेने पाहू लागलो. तर काय!

मी दूर ढकललेले पांघरूण गोळा करीत आई म्हणत होती, "अरे दिनू ऊठ. आज जायचे नाही का मित्रांना भेटायला?"

मी जरा भानावर आल्याचे दिसताच ती पुढे म्हणाली, "गिरीशचा फोन येऊन गेला. आणि बरं का. तो जंगली महाराज रस्ता सगळा खणून ठेवलाय. दुसऱ्या वाटेने जा."

आणि मग मला इतर नाना प्रकारचे आवाज ऐकू येऊ लागले - खाली भांड्यांचा आवाज, शेजारी भांडणाचा आवाज, आणि कुठूनतरी रेडिओ मिर्चीवरचे भंडावून सोडणारे संगीत!



दिवाळी अशी खास,
तिच्यात लक्ष्मीचा निवास,
फराळाचा सुंगधी वास,
दिव्यांची आरास
मनाचा वाढवी उल्हास,





ही दिवाळी तुम्हा सर्वांना
सुखासमाधानाची,समृध्दीची, भरभराटाची व
आनंदाची जावो.

# सियॅटल् महाराष्ट्र मंडळ






Rasika Bhalerao
President


Sanchita Galgalikar
Secretary


Sanjana Galgalikar
Vice President





Treasurer


Web Master































**YUVA MANDAL SPECIAL HEALPERS**










# SMM YUVA MANDAL

**Wishes you a very happy diwali**



**&**



**A very prosperous new year**

# SWARA-SADHANA SANGEET ACADEMY







*North Indian Classical 1-on-1 Vocal Music Lessons*

**with Smt. Kumudini Nagarkar**
(formerly known as Usha Vartak)



- ***Teaching & Performing in the Northwest over 25 years***
- ***Master of Arts in Music, S.N.D.T. University, Mumbai***
- ***Student of Hridaynath Mangeshkar, Prabha Atre, Narayanrao Vyas, & Venkatesh Pai***
- ***Teaching Children & Adults***
- ***One-on-One 1 hour Lessons***
- ***$35/hour***
- ***Located in Bellevue/Redmond Near Crossroads Mall***

*For More Information*
*Please Call: 206-406-8514*

**Wishing You a Happy Diwali and Prosperous New Year !!!**





